पुणे, शनिवार, ९ नोव्हेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 327 • वर्ष ३ रे, अंक ३२७ • किंमत ₹ ६ • पाने : १२

राष्ट्रसंचार
@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

## एकनाथ शिंदेचा घणाघात



# भगवे वादळ

- उद्धव ठाकरे यांची मशाल क्रांतीची नसून घराघरांत आग लावणारी
- मशालसुद्धा आता दुसऱ्याच्या हातात देऊन टाकली
- धनुष्यबाणाची आण बान शान नियतीने आपल्यावर सोपवली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माझ्या लाडका बहिण्याच्या खात्यात हप्ते भरणारे आमचे सरकार आहे. आमच्या लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी या योजनांचा नक्कीच फायदा मिळेल. महायुती राज्यात पुन्हा बहुमताने सत्तेत येईल, आमच्याच योजनांची कॉपी करून काँग्रेस, महाविकास आघाडीने जाहीरनामा प्रसिद्ध केला, मात्र जनता त्यांना भुलणार नसल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पुण्यात जाहीर सभा आयोजित केली होती. यावेळी हजारो जनसमुदाय उसळला होता. जणू या ठिकाणी भगवे वादळच निर्माण झाल्याचे पहावयास मिळाले. ना. शिंदे यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार केला. पुढे बोलताना शिंदे म्हणाले की, मला पुण्याचा चेहरा मोहरा बदलायचा आहे.

» पान ७ वर

- सख्खे भाऊ नाही हे तर लाडक्या बहिणीचे सावत्र भाऊ
- जनसामान्यांना रोटी- कपडा- मकान- देण्याचा प्रयत्न
- दहा लाख युवकांना रोजगार
- शहराच्या विकासाप्रमाणे गावचा विकास
- सरकार स्थापन झाल्यावर व्हिजन २०२९ डोळ्यासमोर
- बळीराजासाठी विशेष योजना

» पान ७ वर

# दिवस मोजणार..!




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाशिक येथील सभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना आव्हान दिले. मोदींनी संपूर्ण भाषणात उद्धव ठाकरेंचे नाव न घेता त्यांना उद्देशून निशाणा साधला. पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसचे लोक वीर सावरकारांना शिव्या देतात. महाराष्ट्रात येऊन सावरकरांना अपमान करतात. मी ऐकलंय की आघाडीतील काही नेत्यांनी काँग्रेसच्या युवराजाला सांगितले, निवडणूक जिंकायचे असेल तर सावरकरांवर बोलू नका, असे सांगितले. त्यांच्या तोंडाला कुलूप लावले. सर्वात मोठे दुर्दैव हे आहे की, सावरकरांचा वारसा सांगणारे आज आघाडीत काँग्रेसच्या सोबत उभे आहेत, असे म्हणत मोदींनी उद्धव ठाकरेंचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली. माझे काँग्रेसच्या महाआघाडीतील साथीदारांना आव्हान आहे, या पक्षांनी काँग्रेसच्या युवराजाच्या, नेत्यांच्या तोंडून सावरकरांविषयी १५ मिनिट रोज आपल्या » पान ७ वर

## सामूहिक बलात्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील स्वारगेट येथे एका विवाहित महिलेवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. याप्रकरणी स्वारगेट पोलिसांनी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी महिलेच्या मुलांना जीवे मारण्याची धमकी देऊन तिच्यावर बलात्कार केल्याचा तिने दावा केला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे. सोहेल सबीक खान (वय, २०), कालू आबन खान (वय, ५०) आणि दिलदार खाजू खान (वय, २७) अशी आरोपींची नावे आहेत. पीडिता आणि आरोपी मूळचे राजस्थान येथील » पान ७ वर

## वैद्यकीय महाविद्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील भारती विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयाला बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ई-मेल आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी माहिती मिळताच पोलिसांनी हा ई-मेल गांभीर्याने घेऊन संपूर्ण महाविद्यालय बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या (बीडीडीएस) मदतीने तपासले.

» धक्कादायक

परंतु, संशयास्पद असे काहीही आढळून आले नाही.या प्रकरणी भारती विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.मंदार दत्तात्रय करमरकर (वय-55, रा. पर्वती दर्शन) यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात अज्ञात ई-मेल धारकाविरुद्ध तक्रार दिली आहे.

या प्रकरणी पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, भारती विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या ई-मेल आयडीवर एका व्यक्तीने दोन वेळा ई-मेल पाठवण्यात आला आहे. त्या ई-मेलमध्ये तामिळनाडूतील एका घटनेचा संदर्भ देत महाविद्यालय आणि वसतिगृह परिसरात बॉम्बस्फोट होणार असल्याच्या माहितीचा उल्लेख करण्यात आला. या प्रकरणाची माहिती » पान ७ वर

## वर्षानुवर्षे सत्ता पण कुठे विकासाचा पत्ता ?




**अश्विनी कदम यांच्याशी खास संवाद**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पर्वती मतदारसंघात वर्षानुवर्षे एकाच लोकप्रतिनिधींनी सत्ता उबवली , तरीही येथे विकासाचा पत्ता दिसत नाही. माधुरी मिसाळ यांनी पक्ष भावनेचा अनादर केलाच परंतु लोक भावनेचा देखील अनादर करून चुकीच्या पद्धतीने सत्ता राबवली त्यामुळे या निष्क्रिय लोकप्रतिनिधीला आता पर्वतीची जनता यंदा घरी बसवेल असा विश्वास पर्वती विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीच्या उमेदवार अश्विनी कदम यांनी राष्ट्र संचारशी बोलताना व्यक्त केला.

» विस्तृत मुलाखत पान २ वर



## अजितदादांचे कार्यकर्त्यांना आवाहन

# आता जोमाने कामाला लागा

वडगाव शेरी



> राज्य सरकारनं सुरू केलेल्या तमाम शासकीय योजना जशा की, माझी लाडकी बहीण योजना, वीजबिल माफी, मुलींना मोफत शिक्षण, प्रशिक्षण भत्ता, एक रुपयात पीक विमा आदी योजना आपल्याला पुढची पाच वर्षे सुरूच ठेवायच्या आहेत. या योजना विरोधक बंद पाडू पाहत आहेत. आपल्याला शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांवर चालणाऱ्या महाराष्ट्राला पुढे न्यायचं आहे. केंद्र सरकार आपल्या विचारांचं असल्यानं राज्याला बळकट करण्याचं काम आम्ही करत आलो आहोत."
> — अजितदादा पवार

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तथा महायुतीचे विधानसभा निवडणुकीचे अधिकृत उमेदवार सुनिल टिंगरे यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत उपस्थितांना संबोधित केलं. दिवाळीचा सण आपण सगळ्यांनी उत्साहात साजरा केला. आता मात्र तमाम पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी जोमानं कामाला लागावं, असे आवाहन त्यांनी केले.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत गाफिल राहून अजिबात चालणार नाही. सर्वांनी एक जीवानं कामं करायची आहेत. काहीजण दमदाटी करू पाहत आहेत. परंतु वस्तुस्थिती ही आहे की, या लोकांना विधिमंडळाचा दरवाजा मी दाखवला. मात्र माझे एकच सांगणे आहे की, कुणाकडे लक्ष देऊ नका. आपल्याला आपल्या मतदारसंघाचा विकास करायचा आहे. कामाच्या बाबतीत आम्ही सगळ्यांना समान न्याय देण्याचा प्रयत्न करत आहोत.

## आम्ही व्यापारी ग्राहकांनाही मतदानासाठी आवाहन करणार- गहलोत

# पुणे शहर राजस्थानी समाजाचा भाजपाला पाठिंबा

कोथरूड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे शहर राजस्थानी समाजाने भारतीय जनता पक्षाला आपला जाहीर पाठिंबा दिला आहे. दिवाळीनिमित्त समस्त राजस्थानी समाज पुणे शहराच्या वतीने बाणेर मध्ये दिवाळी सस्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संघटनेच्या वतीने एकमताने भाजपा आणि कोथरुड विधानसभेचे महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांना पाठिंबा जाहीर केला.

यावेळी अध्यक्ष सुनिल गहलोत, महाराष्ट्र प्रदेश निमंत्रित उमेश चौधरी, रामलाल चौधरी, चंदुलालजी भायल, जयप्रकाश पुरोहित, दिनेश चौधरी (सिवासी), लक्ष्मणराव परिहार, प्रल्हाद सायकर, गणेश कळमकर, प्रकाश बालवडकर, लहुजी बालवडकर यांच्या सह भाजपचे पदाधिकारी, राजस्थानी समाज बांधव उपस्थित होते.

गहलोत म्हणाले की, राजस्थानी समाज भाजपा वर प्रेम करणारा आहे. आम्ही तर मतदान करणारच आहोत, पण आम्ही आमच्या ग्राहकांनाही भाजपाला मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करणार आहोत, अशी ग्वाही दिली.

> राजस्थानी समाज हा व्यापारी समाज आहे. व्यापाराच्या निमित्ताने तो जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात जातो, तिथे आपलं स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करतो. माननीय नरेंद्र मोदीजी यांच्यावरही समाजाने भरभरून प्रेम केले आहे. समाजाच्या मागणीनुसार माननीय मोदीजींनी एलबीटीतून व्यापाऱ्यांची सुटका केली. त्यामुळे भविष्यात ही समाजाचे प्रेम भाजपावर कायम राहो."
> — चंद्रकांत पाटील

### समाजाच्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता

- स्वातंत्र्य काळापासून राजस्थानी बांधवांचं भाजपावर प्रेम राहिलेलं आहे.
- भैरवसिंह शेखावत हे तीनदा राजस्थानचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर ते उपराष्ट्रपती झाले. त्यानंतरही वसुंधरा राजे, राजस्थानचे विद्यमान मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या पाठिशी राजस्थानी समाज उभा राहिला आहे.

# निवडणुकीसाठी विशेष मतदान केंद्र

खडकवासला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खडकवासला विधानसभा मतदारसंघातील २०२४ निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाच्या RO (रिटर्निंग ऑफिसर) हँडबुकमध्ये नमूद असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे अनुसरण करून निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार किरण सुरवसे आणि नायब तहसीलदार सचिन आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध गटांसाठी विशेष मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. अशी माहिती मनुष्यबळ कक्षाचे नोडल अधिकारी सहा. आयुक्त विजय नायकल , सहा. महसूल अधिकारी प्रमोद भांड, साहीर सय्यद, धम्मदीप सातकर, भूमेश मसराम यांनी दिली.

### मतदारांना सुविधा : विविध उपाययोजना

- १. महिला (Pink) मतदान केंद्र: महिलांना सुरक्षित आणि आरामदायी वातावरणात मतदानाची सुविधा मिळावी यासाठी हे केंद्र फक्त महिलांसाठी बनवले गेले आहे. येथे महिला निवडणूक अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त केले आहेत, ज्यामुळे महिला मतदारांचा सहभाग वाढेल.
  पत्ता: शिवसागर सोसायटी क्लब हाऊस हॉल क्र.१, वडगाव बु
  मतदार संख्या: ११०२
- २. PWD मतदान केंद्र: दिव्यांग मतदारांसाठी आवश्यक सुविधा असलेल्या या केंद्रांवर रॅम्प, व्हीलचेअर, आणि मदतनीसांची सोय केली जाते. दिव्यांग मतदारांना सहजतेने मतदान करता यावे, हा या केंद्राचा मुख्य उद्देश आहे. येथे दिव्यांग कर्मचारी देखील असतात.
  पत्ता: नांदेड सिटी पब्लिक स्कूल, नांदेड सीटी
  मतदार संख्या: ७१८
- ३. युवा (Youth) मतदान केंद्र: युवा मतदारांचा अधिकाधिक सहभाग मिळवण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हे केंद्र तयार करण्यात आले आहे. त्यांना मतदान प्रक्रियेबद्दल जाणीव वाढवण्यास मदत करणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे.
  पत्ता: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बहुली
  मतदार संख्या: ७३३
- ४. Unique मतदान केंद्र: RO हँडबुकनुसार, विशिष्ट स्थानिक वैशिष्ट्ये जपण्यासाठी unique मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे. यामुळे मतदारांना त्यांच्या स्थानिक संस्कृतीचा अनुभव घेता येतो.
  पत्ता: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डोणजे
  मतदार संख्या: १४८६
- ५. Pardanashin मतदान केंद्र: पारंपारिक संस्कृती पाळणाऱ्या महिलांसाठी हे विशेष केंद्र त्यांना गोपनीय आणि सुरक्षित वातावरणात मतदान करण्याची सुविधा देते.
  पत्ता: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोंढवे धावडे
  मतदार संख्या: १४१४

# ‘महागाईला नियंत्रणात आणण्यासाठी वचनबद्ध : खा. सुप्रिया सुळे

शिवाजीनगर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**खडकी :** महागाई पूर्णतः नियंत्रणात आणून जनतेला दिलासा देण्याचे वचन महाविकास आघाडीने दिले आहे. त्यासाठी कठोर पावले उचलण्याचा निर्धारही केला आहे, असे सांगून, जनतेने २० नोव्हेंबर रोजी शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी, इंडिया फ्रंट व मित्रपक्षांचे काँग्रेसचे उमेदवार दत्ता बहिरट यांच्यासारख्या जबाबदार, पारदर्शक, कर्तव्यदक्ष व अनुभवी उमेदवारास मतदानावेळी ‘पंजा’ या चिन्हापुढील बटण दाबून विजयी करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या खा. सुप्रिया सुळे यांनी केले.

दत्ता बहिरट यांच्या प्रचारार्थ आयोजित जीप यात्रेत ठिकठिकाणी नागरिकांशी त्या बोलत होत्या. ही जीप यात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक (खडकी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, गोपी चौक, हुले रोड, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महात्मा गांधी चौक, खडकी बस स्टॉप, टी. जे. कॉलेज रोड, छाजेड पेट्रोल पंप, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (बोपोडी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे समाप्त झाली.

### वेळेला चहा

- सध्या प्रचाराचा धुमधडाका सुरू आहे. दिवसातील १३ -१४ तास प्रमुख नेते प्रचार करीत आहेत. शुक्रवारी चंदननगर, खराडी येथे अजित पवार यांनी तब्बल नऊ तास सलग प्रचारामध्ये वेळ दिला. यावेळी एका चहाच्या टपरीवर त्यांनी चहा घेत आपली तल्लफ भागवली. यावेळी त्यांच्या समवेत महायुतीचे उमेदवार आमदार सुनिल टिंगरे यांच्यासह कार्यकर्त्यांनीही चहा पिण्याचा आनंद लुटला






## अजितदादांच्या जाहीरनाम्यात सर्वसामान्यांसाठी काय?

# दादांचा वादा !

१. लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना २१०० रुपये देणार
२. महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांना पोलिस दलात समावेश करणार
३. धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये देण्यात येणार
४. ग्रामीण भागात ४५००० पाणंद रस्त्यांच्या . निर्मिती करण्याचे आश्वासन
५. शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेती पिकांच्या किंमतीवर २०% अनुदान
६. वृद्ध पेन्शन धारकांना १५०० ऐवजी महिन्याला २१०० रुपये देणार
७. दहा लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षणातून महिन्याला दहा हजार रुपये विद्यावेतन देणार
८. २५ लाख रोजगार निर्मितीचे आश्वासन
९. वीज बिलात ३०% कपात करून सौर व अक्षय ऊर्जेला प्राधान्य देणार

## महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्याआधीच

# उद्धव ठाकरेंच्या ५ घोषणा



१. मुलीसह मुलांनाही मोफत उच्च शिक्षण देणार
२. महिला पोलिसांची भरती, स्वतंत्र पोलीस ठाणे उभारणार
३. मुंबईतील 'अदानी प्रकल्प 'रद्द करुन धारावीकरांना उद्योग- धंद्यासह घरे देणार
४. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, तसेच सुरतमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर उभारणार
५. डाळी, खाद्यतेल यांसह पाच जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवणार, शेतीमालाला हमीभाव देणार



## निवडणुकीपूर्वी

# एकनाथ शिंदेंच्या १० घोषणा

१. लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दर महिन्याला २१०० दिले जाणार. पोलीस दलात २५,००० महिलांची भरती करणार.
२. शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १५,००० रुपये मिळणार.
३. प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा दिला जाणार.
४. वृद्ध पेन्शन धारकांना १५०० वरुन २१०० रुपये मिळणार.
५. राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवल्या जाणार.
६. २५ लाख रोजगार निमिर्ती, तसेच १० लाख विद्यार्थ्यांना ₹१०,००० विद्यावेतन मिळणार.
७. राज्यातील ग्रामीण भागात ४५,००० गावांत पाणंद रस्ते बांधले जाणार.
८. अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला ₹१५,००० वेतन मिळणार.
९. वीज बिलात ३०% कपात करुन सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर दिला जाणार.
१०. सरकार स्थापनेनंतर 'व्हिजन महाराष्ट्र @२०२९' १०० दिवसांच्या आत सादर केला जाणार.

## अश्विनी कदम यांचा आशावाद

# निष्क्रिय कारकिर्दीचा होणार अंत

पर्वती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** गेल्या अनेक वर्षांपासून माधुरी मिसाळ या येथील लोकप्रतिनित्व करीत आहेत. परंतु आज रस्ते, पाणी, आरोग्य या मूलभूत सुविधांपासून देखील पर्वती मतदारसंघ वंचित आहे. येथील झोपडपट्ट्यांचे हाल अतोनात आहेत. विशेषतः देशाच्या केंद्रस्थानी राज्यांमध्ये आणि पुणे महापालिकेमध्ये सत्ता असताना देखील या विधानसभेचा विकास झाला नाही. हा खरोखर संशोधन करण्याचा विषय आहे, असा आरोप अश्विनी कदम यांनी केला.

धनशक्तीच्या जोरावर मते खेचायची पक्षाच्या, आश्वासनाच्या सहानुभूती वरती मते मिळवायची आणि वर्षानुवर्षी निवडून जायचे हा एकमेव त्यांचा अजेंडा आहे. पाच वर्षासाठी निवडून गेल्यानंतर त्या कुठेही दिसत नाही. ही निवडणूक आता कोणत्याही पक्षाची राहिली नसून लोकांनी ती हातात घेतली आहे. त्यामुळे पंधरा वर्षाचे निष्क्रियतेच्या विरोधामध्ये ही लढाई आहे.


महाराष्ट्रभर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आशादायक वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्येकाने तुतारी वाजविण्याचा दृढ आत्मविश्वास ठेवला आहे. त्यामुळे येथे देखील बदल घडणार आणि ही निष्क्रिय राजवट संपून एका नव्या विकासाचा उदय पर्वती मतदार संघात होणार असा आशावाद ही शेवटी कदम यांनी व्यक्त केला.

शुक्रवारी त्यांनी आंबेडकर वसाहत लक्ष्मीनारायण पाठीमागील परिसर हमराज मित्र मंडळ सुवर्णयोग मित्र मंडळ पंचशील चौक सदाबहार मित्र मंडळ या भागामध्ये पदयात्रा केली.

## आजच्या प्रचार सभा



### राज ठाकरे यांच्या जाहीर सभा



- **दिनांक :** ०९ नोव्हेंबर
- **वेळ :** सायंकाळी ५ वाजता
- **ठिकाण :** फडके हौद चौक कसबा पेठ पुणे

- **दिनांक :** ०९ नोव्हेंबर
- **वेळ :** सायंकाळी ६ वाजता
- **ठिकाण :** छत्रपती शिवाजी महाराज स्मारक कोथरूड गावठाण पुणे

### मविआच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्यभर वारकरी रथाद्वारे दिंडी

- **दिनांक :** ०९ नोव्हेंबर
- **वेळ :** दुपारी १२ वाजता
- **ठिकाण :** पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रवादी अध्यात्मिक व वारकरी आघाडीच्या वतीने महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्यभर वारकरी रथाद्वारे दिंडी निघणार आहे. यामध्ये प्रचाररथ, वारकरी, टाळकरी, मृदूंग वादक सहभागी होणार आहेत. 'रामकृष्ण हरी'चा जयघोष करीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना निवडून देण्यासाठी अध्यात्मिक व वारकरी आघाडीच्या माध्यमातून प्रचार केला जाणार आहे.







# वडगांवशेरीत 'बसपा' चा हत्ती कोणती 'चाल' खेळणार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरी आणि ग्रामीण भागाचा मिलाप असलेल्या वडगांवशेरी मतदारसंघाला आतापर्यंत प्रत्येक विधानसभा निवडणुकीत नवीन आमदार मिळत गेला आहे. मराठ्यासह ओबीसी आणि दलित मतदारांचा पगडा असलेल्या या मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही पक्षांनी मराठा उमेदवारांना संधी दिली आहे, त्यामुळे या मतदारसंघातील दलित आणि अन्य समाजाची मते निर्णायक ठरणार आहे, विशेष म्हणजे दरवेळी विजयी उमेदवारांच्या विजयाला नेहमीच बसपाच्या हत्तीचा आधार मिळाला असून यावर्षीच्या निवडणुकीत बसपाचा हत्ती कोणती 'चाल' खेळणार यासंदर्भात उलटसुलट चर्चा सुरू आहे.या मतदारसंघात मराठा मतदारांची संख्या सर्वाधिक असली तरी नागपूर चाळ, येरवडा, विश्रांतवाडी,खराडी, चंदननगर, वडगावशेरी, कळस या भागात दलित मतदारही मोठ्या प्रमाणावर आहेत. तरीही या मतदारसंघातून आतापर्यंतच्या तीन निवडणुकात सर्वच पक्षांनी मराठा उमेदवारालाच संधी दिली आहे, विशेष म्हणजे या मतदारसंघातून आतापर्यंत नेहमीच मराठा उमेदवार विजयी होत आला आहे.

पूर्वी हवेली आणि बोपोडी मतदारसंघाचे विभाजन करुन २००९ मध्ये वडगावशेरी हा मतदारसंघ अस्तित्वात आला, त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने बापूसाहेब पठारे यांना उमेदवारी देण्यात आली होती. या निवडणुकीत त्यांनी त्यावेळी युतीमध्ये असलेल्या शिवसेनेच्या अजय भोसले यांचा पराभव केला होता, त्यानंतर झालेल्या २०१४ च्या निवडणुकीत मोदी लाटेत भाजपाचे जगदीश मुळीक मोठ्या फरकाने विजयी झाले होते. धक्कादायक बाब म्हणजे त्यावेळचे विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे हे तीन नंबरवर फेकले होते, त्यावेळी शिवसेनेच्या वतीने निवडणूक लढविलेले सुनिल टिंगरे हे दोन नंबरवर राहिले होते.

त्यानंतरच्या २०१९ च्या निवडणुकीत युतीने जगदीश मुळीक यांना उमेदवारी दिली होती, तर राष्ट्रवादीने सुनिल टिंगरे यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकीचा प्रचार सुरू असतानाच बापूसाहेब पठारे यांना उमेदवारी डावलल्याने त्यांनी प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात भाजपात प्रवेश केला होता, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची डोकेदुखी वाढली होती. मात्र; तरीही राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सुनिल टिंगरे यांनी जगदीश मुळीक यांचा निसटता पराभव केला होता.

यापूर्वी झालेल्या तीनही निवडणुकात दलित आणि अन्य समाजाची मते निर्णायक ठरली होती, २०१९ च्या निवडणुकीत रिपाइचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपमहापौर डॉ. सिध्दार्थ धेंडे यांनी बंडखोरी करत मैदान गाजाविले होते. विशेष म्हणजे त्यांना या निवडणुकीत १४ हजारांपेक्षाही जास्त मते मिळाली होती, त्यांनी घेतलेली हीच मते मुळीक यांच्या पराभवाला कारणीभूत ठरली होती.

यंदाच्या निवडणुकीतही नेमका हाच ट्विस्ट निर्माण झाला आहे, बहुजन समाज पक्षाच्या वतीने डॉ. हुलगेश चलवादी यांना उमेदवारी देण्यात आली आहे, डॉ. चलवादी यांचा दलित वसाहत आणि आंबेडकरी चळवळीतील नेते तसेच कार्यकर्त्यांशी निकटचा संबध आहे. त्याशिवाय काँग्रेससह अन्य पक्षातील नेत्यांचेही त्यांचे मैत्रीपूर्ण संबध राहिले आहेत, त्यामुळे या सर्व स्तरातून त्यांना मदत होण्याची शक्यता सर्वाधिक आहे. हीच बाब ध्यानात घेऊन प्रमुख पक्षाच्या दोन्ही उमेदवारांनी दलित आणि अन्य समाजाच्या मतदारावर सर्वाधिक लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे हीच दलित मते निर्णायक ठरणार आहे, त्याशिवाय यंदा बसपाचा हत्ती कोणती चाल खेळणार आणि कोणत्या उमेदवाराच्या विजयाला हातभार लावणार यासंदर्भात मतदारसंघात उलटसुलट चर्चा सुरू आहे.

### आंबेडकरी चळवळीचा एल्गार कोणाच्या पथ्यावर

● रिपाइच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या बळावरच महायुतीला गल्ली ते दिल्लीपर्यंत सत्ता मिळाली आहे. मात्र; हे वास्तव असतानाही सत्तेची फळे चाखताना दलित कार्यकर्त्यांकडे जाणुनबुजुन दुर्लक्ष करण्यात आले असा आरोप रिपाइच्या एका गटाने केला आहे. त्यातूनच बंडाचे निशाण फडकावत माजी उपमहापौर डॉ. सिध्दार्थ धेंडे आणि महापालिकेतील रिपाइच्या माजी गटनेत्या फरजाना आय्युब शेख यांनी ' आमचे मत निळा झेंडा, आंबेडकरी विचारांना आणि स्वाभिमानाला!' असा एल्गार दिला आहे. त्यामुळे आंबेडकरी चळवळीतील नेते आणि कार्यकर्त्यांनी दिलेला हा एल्गार कोणत्या उमेदवाराच्या पथ्यावर पडणार याकडे राजकीय तज्ञांचे लक्ष लागून राहिले आहे.

---

## राष्ट्रसंचार off the Record

### कॅन्टोन्मेंटचा बळी ?

कॅन्टोन्मेंटमध्ये सध्या महायुतीच्या उमेदवाराची पोझिशन ही नाजूक सांगितली जात आहे. भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस आरपीआय आणि मित्र पक्षांच्या माध्यमातून सुनील कांबळे यांची उमेदवारी येथे देण्यात आली. भाजपकडे येथे कोणीच उमेदवारीसाठी माघार घ्यायला तयार नव्हते. जुजबी आणि तोंड देखलेपण करायचे किंवा आपली दावेदारी होती म्हणून सांगायचे यासाठी काही कार्यकर्त्यांनी इथून तिकीट मागितले. परंतु सुनील कांबळे यांच्याशिवाय तेथे कोणीही आग्रही नव्हते. यंदा माजी मंत्री रमेश बागवे हे तेथे प्रभावी ठरत आहेत. हरायला कोणीतरी द्यायचेच आहे तर सुनील कांबळे यांचीच उमेदवारी द्या, असे म्हणत तेथे कांबळे यांची उमेदवारी दिल्याचे आता काही पक्ष कार्यकर्तेच सांगत आहेत

### दादांचा ओव्हर कॉन्फिडन्स पण कोथरूड सेफ

कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार चंद्रकांत पाटील हे सध्या दररोज सकाळी उठलं की कार्यकर्त्यांच्या बैठका घेत आहेत. दिवसभर काय काय करायचे आणि कालचा रिपोर्ट काय हे त्यांचे दोन कळीचे प्रश्न आहेत. परंतु या सगळ्या बैठकांमध्ये दादांचा ओव्हर कॉन्फिडन्स दिसून येतो. दररोजच्या बैठकांमध्ये त्यांचे अतिविश्वास पूर्ण बोलणे ऐकून या मीटिंग घेता तरी कशाकरिता असा प्रश्न आता कार्यकर्त्यांना पडला आहे. अर्थात चंद्रकांत दादांनी कोथरूड अत्यंत सेफ केले असल्याची देखील चर्चा आहे उच्चभ्रू वसाहतीपासून ते झोपडपट्टीपर्यंत संपूर्ण मतदारसंघात दादांचा प्रभाव दिसत आहे. त्यामानाने राहुल मोकाटे यांची प्रचार यंत्रणा आणि एकूणच वकूब कमी पडत आहे.

### पाच वर्षे वाटणारा आमदार

निवडणुका आल्या की उमेदवार काही ना काही तरी वाटप करत बसतात आणि मतदारांना प्रलोभने देत असतात. परंतु सलग पाच वर्ष वाटप करणारा आमदार म्हणून चंद्रकांत दादा यांची ख्याती आहे. शाळेतील पाटी - पेन्सिल पासून ते रिक्षावाल्यांना छत्र्यापर्यंत, गरजूंना धान्याच्या पिशव्यांपासून ते मोलकरणींना जॅकेट, उबदार कपडे इथपर्यंत सातत्याने त्यांचा वाटप कार्यक्रम चालू असतो. तरी यंदाच्या दिवाळीला त्यांचा विशेष दिवाळी फराळ घरपोच झाला नाही. यावर काही कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. याबाबत दादांना विचारले असता, त्यांनी आचारसंहितेचे यथोचित कारण सांगितले. परंतु सातत्याच्या या वाटपामुळे सतत घेण्याची सवय झालेल्या कार्यकर्त्यांना मात्र कसे-नुसे झाले अर्थात दिवाळी भेटीच्या माध्यमातून दादांनी ही कसर भरून काढली असेलच.

### मेव्हण्याची नाराजी

पर्वती मतदारसंघ अनेक घडामोडींनी गाजला. श्रीनाथ भिमाले, शिळीमकर यांनी बंडाचे निशांण फडकवले. अखेर दोघांनीही बंडशमविले. त्यानंतर श्रीनाथ भिमले हे कमालीचे ॲक्टिव्ह झाले आणि भाजपाच्या उमेदवार माधुरी मिसाळ यांच्यासाठी कार्यरत झाले. तर शिळीमकर हे आपले प्रभागापुरतेच संकुचित होऊन काम करीत आहे. त्यांनी गेल्या काही वर्षांपासून आपलेच नातेवाईक असलेल्या मिसाळ यांच्या विरोधात निनावी पत्रे, तक्रारी अशा अनेक कुरकुरी केल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यामुळेच माधुरी ताईंनी सगळ्यांची नाराजी दूर करण्यासाठी पुढाकार घेत असताना शिळीमकर यांच्याकडे स्वतः जाऊन त्याची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला नाही.

---

खासदार सुप्रिया सुळे यांच्या जीप यात्रेने

## कसब्यातील वातावरण ' रवी' मय!

कसबा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कसबा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी, इंडिया फ्रंट आणि मित्रपक्षांचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या सध्या झंझावाती पदयात्रा सुरू आहेत. आज सकाळी या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांची जीप यात्रा झाली. या जीप यात्रेत महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते दुचाकींवरून सहभागी झाले होते. या झंजावाती प्रचारामुळे कसबा विधानसभा मतदारसंघातील सगळेच वातावरण 'रवी' मय झाल्याचा अनुभव पाहायला मिळत आहे.

खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सूर्या हॉस्पिटलपासून जीप यात्रेला प्रारंभ केला. त्यानंतर ही यात्रा पवळे चौक, कुंभारवाडा, गावकोस मारुती, हमजे खान चौक, अशोक चौक, रामोशी गेट, गोकुळ वस्ताद तालीम, घसेटी पूल या मार्गावर काढण्यात आली. जीप यात्रेत खा. सुप्रिया सुळे आणि उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यासह शहर काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष मोहन जोशी, प्रदेश काँग्रेस सरचिटणीस अभय छाजेड,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रभारी शहराध्यक्ष अंकुश काकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संजय मोरे, विशाल धनवडे, राजेंद्र शिंदे, गणेश नलावडे, संदीप गायकवाड सहभागी झाले होते. सर्व कार्यकर्त्यांनी कसबा विधानसभा मतदारसंघात एकजूट दाखवून विजय खेचून आणावा आणि धंगेकर यांना विजयी करावे.

---

पुनर्वसनाला मिळणार गती : आमदार माधुरी मिसाळ

## मीनाताई ठाकरे वसाहतदारांना मिळणार पक्की घरे

पर्वती



"गुलटेकडीतील नेहरू रस्ता आणि महर्षीनगरमध्ये तब्बल १२ एकर जागेवर मीनाताई ठाकरे इंदिरानगर ही मोठी वसाहत आहे. जागेची मोजणी, डिमार्केशन आदी तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सर्वेक्षण सुरू केले आहे. यामध्ये दोन हजार ५५४ झोपड्या आढळून आल्या असून, त्यांचे पुनर्वसन होणार आहे. शहरात ४८६ झोपडपट्ट्या आहेत. ७० ऐवजी ५० टक्केच झोपडीधारकांची मान्यता, पाच किलोमीटरच्या परिसरातील दोन झोपडपट्ट्यांचे एकत्रित पुनर्वसन करण्याची मुभा यांसह सुधारित नियमावलीतील सुधारित तरतुदींमुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती मिळाली आहे. सुधारित नियमावली लागू झाल्याने मोठ्या संख्येने पुनर्वसनाचे प्रकल्प दाखल होत आहेत. त्यामुळे पुनर्वसन गतिमान होईल असा विश्वास वाटतो."

— माधुरी मिसाळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गुलटेकडी परिसरातील मीनाताई ठाकरे वसाहत इंदिरानगरमधील महापालिकेच्या जागेवरील झोपडपट्टीचे एसआरए अंतर्गत त्याच जागेवर पुनर्वसन करण्यात येणार असल्याची माहिती भाजप महायुतीच्या उमेदवारआमदार माधुरी मिसाळ यांनी दिली.

मीनाताई ठाकरे वसाहत, मुकुंदनगर, महर्षीनगर, प्रेमनगर परिसरात मिसाळ यांच्या प्रचारार्थ पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मिसाळ बोलत होत्या. माजी सभागृहनेते श्रीनाथ भिमाले, प्रविण चोरबेले, राजश्री शिळीमकर, निखिल शिळीमकर, गणेश शेरला, रेणुका पाठक, श्रीकांत पुजारी, राहुल गुंड, श्वेता होनराव, बाळासाहेब शेलार यांचा प्रमुख सहभाग होता.

---

कट्टर दुश्मन झाले जीवलग मित्र

## मुळीक झाले टिंगरे यांच्या प्रचारात सक्रिय

वडगाव शेरी



"'वडगाव शेरीला टिंगरे यांच्या रूपाने विधानसभेत एक आमदार मिळणार आहे. तसेच, मीसुद्धा विधान परिषदेवर जाणार आहे. त्यामुळे वडगाव शेरीला दोन आमदार मिळणार असून, या मतदारसंघाला विकासाच्या उंचीवर नेऊ."

— जगदीश मुळीक, माजी आमदार वडगावशेरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यापूर्वी एकमेकांवर टीकेची झोड उठविणारे आमदार सुनिल टिंगरे आणि माजी आमदार जगदीश मुळीक या कट्टर दुश्मनामध्ये दिलजमाई करण्यात महायुतीच्या नेत्यांना अखेर यश आले आहे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेचा 'शब्द' दिल्यानंतर मुळीक टिंगरे यांच्या प्रचारात सक्रीय झाले आहेत. विशेष म्हणजे ही दिलजमाई महायुतीतील जागावाटपात हा मतदारसंघ राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या वाट्याला आला. या मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे सुनील टिंगरे विद्यमान आमदार असल्याने तेच विधानसभा निवडणूक लढविणार, हे जवळपास निश्चित झाले होते. मात्र, भाजपचे माजी आमदार आणि माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी, 'मुळीक उमेदवार नसतील, तर महायुतीचे काम करणार नाही,' असा थेट इशाराच दिला होता.

उमेदवारी भरण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत टिंगरे आणि मुळीक दोघांकडेही पक्षाने दिलेले 'एबी' फॉर्म होते. अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन मुळीक यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय गाठले होते. अर्ज भरण्यासाठी शेवटची काही मिनिटे बाकी असताना फडणवीस यांनी त्यांना फोन करून अर्ज दाखल न करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल न करता मुळीक घरी परतले. त्यांचे कार्यकर्ते आणि वडगाव शेरीमधील भाजप पदाधिकारी यावर नाराज होते. मुळीक यांना उमेदवारी न दिल्याने टिंगरे यांचा प्रचार न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता.

दरम्यान, दिवाळीच्या काळात फडणवीस यांनी पुण्यात येऊन सर्व नाराज पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. मुळीक यांच्या घरी जाऊनदेखील फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन नाराजी दूर केली. 'पक्षाच्या वतीने तुम्हाला विधान परिषदेची आमदारकी दिली जाईल,' असा शब्द फडणवीस यांनी मुळीक यांना दिला. हा 'शब्द' मिळाल्याने मुळीक यांची नाराजी दूर झाली.

---

## कानोसा कार्यकर्त्यांचा

### तापकीर विक्रमी मताधिक्याने विजयी होणार

खडकवासला

-अमित गोजमगुंडे,
कलाकार व चित्रपट आघाडी,
भाजपा



**पुणे :** खडकवासला विधानसभेसह पुण्यातील सर्वच भाजपा महायुतीचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील याबद्दल माझ्या मनात कोणताही संदेह नाही. भीमराव तापकीर यांना आम्ही विक्रमी मताधिक्याने विजयी करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. मागील निवडणुकीमध्ये थोडी गणिते चुकली यंदा व्याजासह भरपाई करत तापकीर अण्णांना एक लाखाहून अधिक मते देत आम्ही महाराष्ट्रामध्ये विक्रम घडविणार आहोत.

महायुतीच्या माध्यमातून लाडकी बहीण योजनेसह स्थानिक पातळीवरती अनेकविध योजना, सवलती भेटीगाठीतून समस्या निराकरण यामध्ये तापकीर अण्णा यांनी फार पूर्वीपासून आघाडी घेतली आहे. केवळ निवडणूक आली म्हणून नव्हे तर दररोज काही ना काहीतरी कार्यक्रम करत वर्षभर सातत्यपूर्ण उपक्रमातून अण्णा प्रत्येकाला भेटत असतात. त्यामुळे त्यांची आणि या मतदार संघाची नाळ घट्ट जुळली आहे. वर्षभर सतत उपक्रम घेणारा एकमेव आमदार म्हणून आमदार तापकीर यांचा यांचा लौकिक आहे. महायुतीचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सह सर्व घटक पक्षांच्या सर्व कार्यकर्त्यांसह आम्ही या प्रचारामध्ये सक्रिय सहभाग घेतला असून, भाजपा मित्रपक्ष युतीच्या सर्व उमेदवारांना निवडून देण्यासाठी होम टू होम आणि डोअर टू डोअर प्रचार सुरू आहे. भीमराव अण्णा तापकीर यांच्या लोकप्रियतेमुळे खडकवासला हा मतदारसंघ सोपा आहे.

---

पुणे विभागाच्या विधानसभा पूर्वतयारी आढावा बैठकीत निर्देश

## मतदार चिठ्ठ्यांचे १०० टक्के आणि वेळेत वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विशेष प्रयत्न करावेत; या दृष्टीने स्वीप अंतर्गत मतदान जागृती उपक्रमांवर भर द्यावा, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे उप निवडणूकआयुक्त हिरदेश कुमार यांनी विभागातील निवडणूक यंत्रणांना दिले. मतदारांना मतदान केंद्रावर किमान आश्वासित सुविधा योग्यरित्या पुरविल्या जातील यासाठी योग्य व्यवस्थापन करावे, अशाही सूचना त्यांनी दिल्या.

शहरी भागात मतदानाच्या टक्केवारीत वाढ होण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत, असे सांगण्यात आले. यासाठी मतदारांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले.





### काही सूचना :

- सर्व मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, रॅम्प, विद्युत पुरवठा, सावली, दिव्यांग मतदार व ज्येष्ठ मतदारांसाठी व्हीलचेअर आदी सुविधा उपब्ध करुन द्याव्यात
- मतदान केंद्रांवर पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवावी.
- आपल्या जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था चांगल्या प्रकारे राहील याची दक्षता घ्यावी.
- निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस विभागाने वाहनांची कसून तपासणी करावी.
- अवैध मद्य, अंमली पदार्थ, रोकड, मौल्यवान वस्तू आदींच्या वाहतुकीवर नजर ठेऊन आवश्यक तेथे ताब्यात घेण्याची, जप्तीची कारवाई करावी.



"मतदारांना आपल्या मतदान केंद्राची माहिती व्हावी यासाठी सर्व साधनांचा अवलंब करावा. मतदार चिठ्ठ्यांचे १०० टक्के आणि वेळेत वाटप करावे. पुणे जिल्ह्यात 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या- नो युवर पोलींग स्टेशन' उपक्रम चांगल्या प्रकारे राबविला जात असून त्याप्रमाणे विभागातील इतर जिल्ह्यातही राबविला जावा. मतदारांना मोबाईल ॲपद्वारे मतदान केंद्रांची माहिती कशा प्रकारे पहावी याबाबत प्रचार प्रसिद्धी करावी."

— हिरदेश कुमार

#रा

# बेताल वक्तव्ये!

निवडणुकांचा प्रचार सुरू झाला की, नेत्यांना कंठ फुटतो आणि त्यांचे बरळणे सुरू होते. एखाद्याला का निवडून द्यायचे, त्यांनी कोणती चांगली कामे केली आहेत ते सांगणे राहिले बाजूलाच पण एकमेकांबद्दल आरोप-प्रत्यारोप करणे, उणी-दुणी काढणे सुरू होते, नव्हे त्याला अक्षरश: पेव फुटते. नेत्यांनी प्रचार भाषणात जाहीर वक्तव्ये करताना संयम बाळगणे आवश्यक आहे. हयात नसलेल्या, कधीकाळी साथीदार सहकारी असलेल्या व्यक्तींबद्दल किंवा ज्यांचे धडे अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत, अशा महनीय व्यक्तींबद्दल आताच उपरती आल्यासारखी विधाने करून नको ते वाद निर्माण केले जाऊ नयेत, परंतु आज तसे होताना दिसत नाही. मतदारावर आघात होतील आणि तो संभ्रमित होईल, अशी परिस्थिती निर्माण करून त्यालाच राजकारणाचा एक डाव मानणे ही आजच्या नेत्यांची खेळी. राज्याराज्यात, माणसा-माणसात अशांतता निर्माण करण्याचे काम सुरू आहे. ७० हजार कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीच्या फाईलवर तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी सही केली होती. त्यांनी माझा केसाने गळा कापला, असा खळबळजनक आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला. या आरोपामध्ये आर. आर. पाटलांना सही करण्यास शरद पवार यांनीच सांगितले असा छुपा आरोपही आहे. आर. आर. आबांना जाऊन ९ वर्षे झाली. नऊ वर्षांनंतर अजित पवारांना आपल्या मनातील मळमळ का ओकावीशी वाटली? गेलेल्या व्यक्तीबद्दल काही बोलायचे नसते हे अजित पवारांना माहीत नाही काय? दुसरे म्हणजे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना आपल्या निवासस्थानी बोलावून त्यासंबंधीची गोपनीय फाईल दाखवली होती म्हणे. गोपनीय फाईल दाखवण्याचा फडणवीसांना काय अधिकार होता? राजकीय महत्त्वाकांक्षेपोटीच अजित पवारांचे बरळणे सुरू आहे. अजित पवार घड्याळ चोरणारे पाकीटमार आहेत, अशी टीका शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. अजित पवारांनी घड्याळ चोरले पण त्यांना पोलिस पकडत नाहीत. पोलिस म्हणजे मुख्य निवडणूक आयुक्त, ते त्यांच्याबरोबर आहेत, असेही आव्हाड म्हणाले. आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे अरविंद सावंत अडचणीत आले. शिवसेना शिंदे गटाच्या मुंबादेवीतील उमेदवार शायना एनसी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी खासदार अरविंद सावंत यांच्याविरोधात नागपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अरविंद सावंत यांनी शायना एनसी यांच्याबद्दल बोलताना 'इम्पोर्टेड माल' अशी टिप्पणी केली होती. जी व्यक्ती एका महिलेचा सन्मान करू शकत नाही, 'माल'या शब्दाचा वापर करते, तिच्याबद्दल शरद पवार, उद्धव ठाकरे, संजय राऊत, नाना पटोले यांनी बोलणे गरजेचे आहे असे शायना म्हणाल्या. या प्रकरणी विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गो-हे यांनी निवडणूक आयोगाला कारवाईची मागणी करणारे पत्र लिहिले आहे. शायना एनसी यांच्याबाबत बोलताना उबाठा खासदार अरविंद सावंत यांनी मुंबादेवीत 'आयात माल' चालणार नाही असे विधान केले आहे. मराठीत 'माल' या शब्दाचा वापर महिलांचा अपमान करण्यासाठी केला जातो. अरविंद सावंत यांनी केलेले वक्तव्य अत्यंत चुकीचे असल्याचे मत राष्ट्रीय महिला आयोगाने व्यक्त केले आहे. शायना एनसी या मुंबईचे माजी शेरीफ नाना चुडासामा यांच्या कन्या आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार अमिन पटेल यांच्या प्रचारादरम्यान अरविंद सावंत यांनी शायना एनसी यांच्यावर टीका करताना 'इथे इम्पोर्टेड चालत नाही, ओरिजनल माल चालतो' असे वक्तव्य केले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर अरविंद सावंत यांनी पत्रकार परिषद घेऊन दिलगिरी व्यक्त करताना म्हटले की, कोणाच्याही भावना दुखवाव्यात, कोणत्याही भगिनीचा अवमान व्हावा, असे माझ्या आयुष्यात मी कधी काही केले नाही. मी कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर दिलगिरी व्यक्त करतो. प्रेमात आणि युद्धात सारे काही माफ असते असे म्हणतात. त्यात आता राजकारणातील युद्धाचाही समावेश करावा लागेल. राजकारणात कोण किती खालच्या पातळीवर जायचे, हे ज्याच्या त्याच्या नीतिमत्तेवर अवलंबून राहील. सध्या राजकारण इतक्या खालच्या थराला गेले आहे की, सर्वसामान्यांना सुद्धा त्याची घृणा वाटू लागली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वातावरण आधीच तापलेले असताना संगमनेर तालुक्यात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्येबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते वसंतराव देशमुख यांनी आपल्या भाषणात जी अश्लाघ्य विधाने केली ती अत्यंत संतापजनक आणि निषेधार्ह आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे देशमुख यांना असे वक्तव्य करण्यापासून कोणीही रोखले नाही. उलट व्यासपीठावरील नेते, पदाधिकारी आणि समोर बसलेले कार्यकर्ते टाळ्या पिटत होते. डॉ. जयश्री थोरात गत काही काळापासून राजकारणात सक्रिय झाल्या आहेत. पुरुषी अहंकारातून राजकारणात उतरू इच्छित असलेल्या महिलेबद्दल अनुचित उद्गार काढणे म्हणजे कोत्या आणि हिडीस राजकारणाचा भाग म्हटला पाहिजे. लाडकी बहीण योजना सुरू करणा-या महायुती सरकारची यामुळे चांगलीच अडचण झाली आहे. राजकीय कार्यकर्ते महिलांबाबतची अशी मानसिकता बाळगून आपल्या पक्षाची टिमकी वाजवणार असतील तर ही परिस्थिती अतिशय कठीण म्हणावी लागेल. विशेष म्हणजे अशा कार्यकर्त्यांना राजकीय पक्ष पाठीशी घालतात हे सर्वांत धोकादायक आहे. भाजप एकीकडे महिला सबलीकरणाचा नारा देत आहे आणि दुसरीकडे महिलांचा अपमान करत आहे. एकीकडे राजकीय पक्ष न्यायाची चर्चा करतात आणि दुसरीकडे गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना राजकीय आखाड्यात उतरवतात. हे राजकीय पक्षांचे ढोंग म्हणावे लागेल. देशात महिलांवरील अत्याचाराचे प्रकार थांबण्याचे नाव घेत नाही आणि महिला सुरक्षेवरून गंभीर चर्चा सुरू असताना असे लोकप्रतिनिधी निवडून येत आहेत. सत्तेत राहणाऱ्या अशा लोकप्रतिधींकडून न्यायाची अपेक्षा कशी करता येईल? गत काही वर्षांपासून अशा गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे. असे आरोप असलेल्यांना खड्यासारखे वेचून बाजूला काढत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यास सर्वच पक्षांनी प्राधान्य दिले पाहिजे.

**भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवर घटसर्पबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. कोरोना काळात लसीकरण न झाल्याने मुलांत घटसर्पाचा आजार बळावत आहे. उत्तर प्रदेशातील संभल जिल्ह्यात दहा ऑक्टोबर रोजी घटसर्पाचे ३९ रुग्ण रुग्णालयात दाखल झाले. पैकी आठ जणांचा मृत्यू झाला.घटसर्प हा श्वसनसंस्थेच्या वरच्या भागाला म्हणजे घशाला होणारा तीव्र संसर्गजन्य रोग आहे. कॉरिनेबॅक्टेरियम डिफ्थेरी या जीवाणूमुळे हा रोग होतो. या रोगात श्वसनसंस्थेच्या वरच्या भागात विशेषत: टॉन्सिल अणि घसा याचे श्लेष्मपटल बाधित होते. त्यामुळे श्वास घेता येत नाही. काहीवेळा त्वचेच्या मार्गाने आणि जखमेतून घटसर्पाचा संसर्ग पसरतो.घटसर्पावरील उपचारासाठी अँटीबायोटिक पेनिसिलीसह डिफ्थिरिया सीरम (एडीएस) औषध दिले जाते. औषध नसल्यास मुलांचे आरोग्य संकटात सापडू शकते.**

# घटसर्पाचे वाढते आव्हान

डॉ. संजय गायकवाड

भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवर घटसर्पबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. कोरोना काळात लसीकरण न झाल्याने मुलांत घटसर्पाचा आजार बळावत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कराचीत मुलांसाठी घटसर्पापासून बचाव करण्यासाठी लस उपलब्ध नाही. परिणामी तेथे शंभरापेक्षा अधिक मुलांना जीव गमवावा लागला. मागच्यावर्षी पाकिस्तानच्या सिंध प्रांतात संसर्गजन्य घटसर्पाचे १४० रुग्ण नोंदले गेले. पैकी ५२ मुलांचा मृत्यू झाला. त्याचवेळी यावर्षी शंभरापेक्षा अधिक मुलांचा मृत्यु झाला आहे. यामागचे कारण म्हणजे संपूर्ण सिंध प्रांतात अँटीटॉक्सिनचे एकही औषध नसणे.

भारतात देखील घटसर्पाचे रुग्ण वाढत आहेत. उत्तर प्रदेशातील संभल जिल्ह्यात दहा ऑक्टोबर रोजी घटसर्पाचे ३९ रुग्ण रुग्णालयात दाखल झाले. पैकी आठ जणांचा मृत्यू झाला. संभलच्या जिल्हा रुग्णालयात दाखल झालेल्या २०० पैकी दोन मुलांत घटसर्पाचे लक्षणे आढळून आले. त्यांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात भरती केले. तत्पूर्वी ऑक्टोबरच्या प्रारंभी उरई येथे घटसर्पाचे २९ रुग्ण आढळून आले आणि त्यापैकी तीन जणांचा मृत्यू झाला. सहा ऑक्टोबर रोजी जालंधरच्या फिरोजपूर येथे तीन वर्षाच्या मुलीत घटसर्पाचे लक्षण आढळून आले. तिला रुग्णालयात दाखल केले असता दोन दिवसांनंतर उपचारादरम्यान तिचा मृत्यु झाला. मुलीच्या मृत्युनंतर फिरोजपूरमध्ये घटसर्पाच्या प्रकरणांची तपासणी करण्यासाठी सर्वे केला जात आहे आणि त्यात जागतिक आरोग्य संघटनेचे पथक देखील सामील आहे. उत्तर प्रदेश आणि पंजाबव्यतिरिक्त राजस्थानच्या डीग जिल्ह्यातही चौदा सप्टेंबरपासून ते आतापर्यंत घटसर्पामुळे सात मुलांचा मृत्यु झाला. जिल्ह्यातील आरोग्य विभागाला सजग राहण्याचे निर्देश दिले असून संशयित रुग्णांची तपासणी केली जात आहे.

**घटसर्प हा गंभीर आजार**

घटसर्प हा श्वसनसंस्थेच्या वरच्या भागाला म्हणजे घशाला होणारा तीव्र संसर्गजन्य रोग आहे. कॉरिनेबॅक्टेरियम डिफ्थेरी या जीवाणूमुळे हा रोग होतो. या रोगात श्वसनसंस्थेच्या वरच्या भागात विशेषत: टॉन्सिल अणि घसा याचे श्लेष्मपटल बाधित होते. त्यामुळे श्वास घेता येत नाही. काहीवेळा त्वचेच्या मार्गाने आणि जखमेतून घटसर्पाचा संसर्ग पसरतो. नाक वाहणे, घसा दुखणे, ताप येणे आणि अस्वस्थ वाटणे ही घटसर्पाची लक्षणे आहेत. या आजाराचे वेळीच निदान न झाल्यास तीस टक्के प्रकरणात रुग्णांची स्थिती गंभीर होऊ शकते.

**बुस्टर डोस देखील गरजेचा**

नॅशनल इम्युनायजेशन शेड्यूलच्या मते, घटससर्प प्रतिबंधक लस डीपीटीचा (डिफ्थिरिया, पटुसिस आणि टेटनस) पहिला डोस जन्माच्या सहा आठवड्यात, दुसरा डोस दहा आठवड्यांत आणि तिसरा डोस चौदा आठवड्यानंतर बाळाला दिला जातो. त्यानंतर २४ ते ३६ महिने म्हणजे दोन ते तीन वर्षाच्या कालावधीत पहिला बुस्टर डोस आणि सहाव्या वर्षी दुसरा आणि दहाव्या वर्षी तिसरा बुस्टर डोस द्यावा लागतो. यात निष्काळजीपणा दाखविल्यास बाळाचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. या संसर्गाला लसीकरणाच्या मदतीनेच रोखता येणे शक्य आहे. लस दिली नाही तर हा आजार एवढा गंभीर होतो की, पीडित मुलास प्रसंगी व्हेंटिलेटरवर ठेवण्याची नामुष्की येते. अर्थात तीन ते पाच वर्षापर्यंत मुलांचे लसीकरण पूर्ण करण्यात येते. मात्र सहा आणि दहाव्या वर्षी देण्यात येणारा बुस्टर डोस पालक विसरतात किंवा दुर्लक्ष करतात. घटसर्पामुळे मृत्युदर चिंताजनक आहे. कारण त्याचे लक्षण सामान्य असतात आणि तपासणी केल्याशिवाय हा आजार कळत नाही. घटसर्पबाधित रुग्ण गंभीर झाल्यास फुफ्फुस, हृदय, मेंदू, घसा अणि यकृतात गुंतागुंत निर्माण होते. श्वास घेता येत नाही. मुलाला वाचविण्यासाठी ट्रेकियोस्टॉमी (घशाची सर्जरी) देखील करावी लागते. हा आजार चोवीस तासात रुग्णांना गंभीर स्थितीत नेणारा आहे.

**कोरोनामुळे लसीकरण अर्धवट**

कोरोना काळात मुलांच्या लसीकरणापासून नागरिक दूर राहिले आणि त्याचे दुष्परिणाम बाळांना सहन करावा लागत आहेत.२०२० अणि २०२१ मध्ये जन्मलेल्या काही मुलांचे लसीकरण अर्धवट राहिले. म्हणून ही लस न दिल्याने मुलांत हा संसर्गजन्य रोग बळावल्याचे निदर्शनास आले. लखनौत मोठ्या संख्येने मुले रुग्णालयात दाखल होत आहेत आणि त्यांना घटसर्प झाल्याचे कळाल्यानंतर त्यांना भरती केले जात आहे. या काळात मुलांना वाचविणे खूपच कठीण राहते. कारण हा आजार काही तासांतच गंभीर रुप धारण करतो आणि त्याचा थांगपत्ताही पालकांना, नातेवाईकांना लागत नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये जगभरात ८४ टक्के मुलांना घटसर्प प्रतिबंधकाचे तीन आवश्यक डोस मिळाले. पण उर्वरित १६ टक्के मुलांचे लसीकरण झाले नाही किंवा अर्ध्यावरच राहिले.

जगभरातील लसीकरणाबाबत आरोग्य संघटनेचा अहवाल सांगतो की, २०१५ ते २०१७ या काळात डीपीटीच्या लसीकरणाची व्याप्ती ही ८९ टक्क्यांवरून ८३ टक्क्यांवर आली. लसीकरणात घट झाल्याने घटसर्प रुग्णांची संख्या वाढत असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे व्यापक लसीकरण आणि लसीकरणात सातत्य राखणे गरजेचे असल्याचे स्पष्ट होते. या आधारावर गंभीर आजारापासून मुलांचा बचाव होतो. जर्मनीत देखील चौदा ऑक्टोबर रोजी घटसर्पाचा एक रुग्ण आढळून आला. पीडित मुलाचे वय दहा आहे. २७ सप्टेंबर रोजी 'टॉन्सिलायटिस'मुळे त्याला बर्लिनजवळील ब्रॅडनबर्गच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांना घटसर्पचा संशय आला. तपासणी अहवालात घटसर्प झाल्याचे उघड झाले. बर्लिनच्या एका रुग्णालयात त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. ज्या भागात मुलाचे घर आहे, त्या परिसरात आरोग्य विभागाचे पथक तपासणी करत आहे. जर्मनीत १८९२ मध्ये घटसर्पाचा उद्रेक झाला होता. या उद्रेकात ५० हजारांपेक्षा अधिक जणांचे बळी गेले. १९१३ मध्ये लसीकरण सुरू झाल्यानंतर संसर्गाचे प्रमाण कमी झाले. गेल्या वीस वर्षापासून या आजाराचे जर्मनीतून उच्चाटन झालेले होते. पण यावर्षी आतापर्यंत ३७ जणांना घटसर्प झाल्याचे निष्पन्न झाले.

**उपचारानंतरही लस**

डॉक्टरांच्या मते, मुलांत घटसर्पाची लक्षणे दिसताच त्याला वेगळ्या खोलीत ठेवणे हिताचे आहे. घरातील नागरिकांनी मास्कचा वापर करावा आणि दुसऱ्या मुलांना पीडित मुलांपासून दुर ठेवावे. रुग्णास पातळ पदार्थ द्यावेत. वेळेवर उपचार मिळाले तर रुग्णाचा जीव वाचू शकतो. आजारातून बरे झाल्यानंतरही लसीकरण पुन्हा करता येऊ शकते. कारण एकदाच लस दिल्याने आयुष्यभरासाठी रोगप्रतिकारक शक्ती निर्माण हेत नाही. डोस अर्धवट राहिल्याने घटसर्पाचा आजार पुन्हा होऊ शकतो.

**घटसर्प वेगाने का पसरतो**

अहमदाबादच्या आशियायी चिल्ड्रन रुग्णालयाचे संस्थापक डॉ. इम्रान पटेल म्हणतात, मुले ही एकत्र खेळतात आणि राहतात. एक बाधित मुलगा शिंकल्याने किंवा त्याला खोकला आल्याने एरोसॉल (नाकातील किंवा तोंडातील द्रव) हे चांगल्या मुलांच्या शरीरात जावून त्याला आजारी पाडू शकतात. याशिवाय पेन्सिल किंवा अन्य वस्तू तोंडात घातल्याने तसेच दुसऱ्या मुलाने त्याचा वापर केल्याने देखील संसर्गाचा प्रसार होऊ शकतो. पाकिस्तानात या आजाराच्या उद्रेकाबाबत ते म्हणतात, कोरोना काळातील स्वॅब टेस्टप्रमाणेच आताही चाचणी केली जात असून यावरून आजाराचे गांभीर्य कळते. घटसर्पावरील उपचारासाठी अँटीबायोटिक पेनिसिलीसह डिफ्थिरिया सीरम (एडीएस) औषध दिले जाते. औषध नसल्यास मुलांचे आरोग्य संकटात सापडू शकते.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**शनिवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२४**
कार्तिक शु. ८, श्रवण
श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१,अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू
**नक्षत्र** : श्रवण, योग : गंड वृद्धि, करण : विष्टि
दुर्गाष्टमी, गोपाष्टमी, श्री शंकर महाराज प्रकट दिन, पुणे
**सूर्योदय :** स.०६.२३ सूर्यास्त : सायं.०६.३२ वा.
**राहू काळ :** सकाळी : ९:०० ते १०:३०

**दिनविशेष**

▶१८७७: कवी मोहंमद इक्बाल जन्मदिन. 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा' म्हणणारा हा कवी फाळणीनंतर पाकिस्तानात वास्तव्यास गेला. ▶१९०४: भारतीय वनस्पती शास्त्रज्ञ पंचानन माहेश्वरी यांचा जन्म. ▶१९४०: हीटलर सुधारेल, असे म्हणत जर्मनीचा अनुनय करणारे ब्रिटिश पंतप्रधान नेव्हिल चेबर्लेन यांचे निधन. ▶१९५२: इस्त्राईलचे जन्मदाते व पहिले राष्ट्राध्यक्ष शेम वाईझमन या रसायनशास्त्रज्ञाचे निधन. ▶१९६२: महर्षी धोंडो केशव कर्वे स्मृतिदिन. ▶१९६५: ग्रीड खराब झाल्याने न्यूयॉर्क शहरासह पूर्व अमेरिकेत १२ तास वीजपुरवठा खंडित. ▶१९६७: मराठी चित्रपट व रंगभूमीवरचे गाजलेले खलनायक बाबूराव पेंढारकर यांचे निधन. ▶१९७७: मराठीतील सुप्रसिद्ध संगीत समीक्षक, संगीतकार, संगीत दिग्दर्शक व नाट्य, चित्रपट व क्रिकेटवर अभ्यासपूर्वक लेखन करणारे केशवराव भोळे यांचे निधन. ▶१९८८: मुंबईत भारत पेट्रोलियम शुद्धीकरण संकुलात स्फोट, भीषण आगीत बारा जण मरण पावले. ▶१९९७: ज्येष्ठ साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार प्रदान.

**राशीभविष्य**

▲ **मेष** : थकवा जाणवेल. ▲ **वृषभ** : विनाकारण पैसा खर्च होईल. ▲ **मिथुन** : दूरचे प्रवास होतील. ▲ **कर्क** : रागावर नियंत्रण ठेवा. ▲ **सिंह** : वाहन जपून चालवा. ▲ **कन्या** : कुटुंबासाठी खर्च कराल.▲ **तुळ** : मित्रमैत्रीणी भेटतील. ▲ **वृश्चिक** : घरात मंगलकार्ये घडतील. ▲ **धनु** : मनोबल कमी राहिल. ▲ **मकर** : तब्यत सांभाळा. ▲ **कुंभ** : धार्मिक कार्ये कराल. ▲ **मीन** : चांगला दिवस.

**चिंतन**

ज्याप्रमाणे तुम्ही एखादे रोपटे वाढवू शकत नाही. त्याप्रमाणे तुम्ही एखाद्या लहान मुलाला शिकवू शकत नाही. तुम्ही फक्त मदत करू शकता. ज्ञान हे आतूनच प्रकट होत असते. लहान मूल आपल्या स्वभावानुसार स्वत:चा विकास करून घेत असते. आपण फक्त विकासाच्या मार्गातील अडथळे दूर करू शकतो. – **स्वामी विवेकानंद**

**व्यक्तीविशेष**

### नटवर्य बाबुराव गोपाळ पेंढारकर

नटवर्य बाबुराव गोपाळ पेंढारकर यांचा आज स्मृतीदिन. कोल्हापूरच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीचे व्यवस्थापक म्हणून त्यांची कारकीर्द सुरू झाली. १९२९ मध्ये प्रभात फिल्म सुरू झाल्यावर तिचे व्यवस्थापक म्हणून त्यांचा 'प्रभात'मध्ये प्रवेश झाला. 'अयोध्येचा राजा' या प्रभातच्या चित्रपटातून त्यांच्या भूमिकेची चुणूक दिसून आली. त्यानंतर अग्नीकंकण, सिंहगड, विलासी ईश्वर, धर्मवीर, सुखाचा शोध आदी अनेक चित्रपटांतून त्यांनी कामे केली. 'देवता' चित्रपटात त्यांनी प्रथमच नायकाची भूमिका केली. तत्पूर्वी त्यांनी खलनायक म्हणून आपला ठसा उमटवला होता. १९३३ मध्ये ते सिनेटोनचे व्यवस्थापक झाले. पुढे स्वत:ची 'हंस पिक्चर्स' ही कंपनी काढली. मराठी चित्रपट सृष्टीत ते गाजले. मात्र चरित्र नायक म्हणूनच!

**बोधकथा**

### खरी मैत्री

राज आणि रमण दोघे खूप चांगले मित्र होते. एके दिवशी ते समुद्रसफरीचा आनंद घेण्यासाठी बोटीने फिरायला निघाले. तसा तो शांत दिवस होता. दोघेजण गप्पा मारत आनंदाने समुद्रसफरीचा आनंद घेत होते. गप्पा मारता मारता ते दोघे किनाऱ्यापासून बऱ्याच दूर अंतरापर्यंत आले. त्याचेवेळी रमण राजला म्हणाला,'चल राज आपण पुन्हा घराकडे वळूया.' राजने तात्काळ होकार दिला आणि ते दोघे वळून पुन्हा किनाऱ्याकडे मार्गस्थ झाले. पण अचानक आकाशात काळे ढग जमू लागले. सोसाट्याचा वारा सुटला आणि मोठमोठ्या लाटा उसळू लागल्या. बोट जोरजोरत हेलकावे खाऊ लागली. या दोघा मित्रांना बोटीतून उडी मारण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. त्याक्षणी तेथून एक लाकडाची फळी वाहताना दिसली. दोघा मित्रांनी उडी मारून ती फळी पकडली. पण लगेचच त्यांच्या लक्षात आले की, फळी वजनाने खूप हलकी आहे आणि दोघेजण तिला धरू शकत नाहीत. दोघांनी धरले तर दोघेही बुडू शकतात. म्हणजे एकच व्यक्ती यातून वाचू शकणार होती. त्यावर रमण म्हणाला, 'तू ही फळी पकड, मी सोडतो. तुझा विवाह झाला आहे. एक कुटुंब तुझ्यावर अवलंबून आहे.' त्यावर राज म्हणाला,'नाही रमण, तुला आई आणि बहीण आहे. तूच ही फळी पकड.'
(पूर्वार्ध)

**जिज्ञासा**

### असामान्य पॉलिंग

रसायनशास्त्र, जीवरसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, प्रतिरक्षा विज्ञान अशा निरनिराळ्या विषयात मोलाचे संशोधन करणाऱ्या लिनस पॉलिंग यांचे नाव विज्ञान क्षेत्रात मोठ्या आदराने घेतले जाते. विसाव्या शतकातील एक महान शास्त्रज्ञ म्हणून त्यांची ओळख आहे. २८ फेब्रुवारी १९०१ मध्ये लीनस पॉलींग यांचा जन्म झाला. लहानपाणापासूनच पॉलींग यांना वाचनाची खूप आवड होती. नवव्या वर्षापार्यंत त्यांनी डार्विनचा ओरिजन ऑफ स्पेसिज हा ग्रंथ वाचून काढला होता. तसेच बायबलही पाठ केले जाते. पॉलिंग यांनी भौतिक रसायनशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. नंतर कॅलिफोर्निया इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे ते प्राध्यापक म्हणून रुजू झाले. रसायन शास्त्रात त्यांनी मूलभूत संशोधन केले. रेणवीय रचना आणि रासायनिक बंध या संदर्भात त्यांचे संशोधन आहे. त्यासाठी त्यांनी क्ष किरण विवर्तन तंत्राचा वापर केला. क्ष किरण पदार्थांच्या रेणूंवर पडल्यावर रेणूतून ते आरपार जाताना त्यांच्या मार्गातील रेणूंमधून अणू किंवा अणूंचा समूह यामुळे क्ष किरणांचा मार्ग बदलला जातो म्हणजेच ते विवर्तीत होतात. तसेच पदार्थांच्या रेणूतून इलेक्ट्रॉन सोडले तर तेही विवर्तीत होतात. यालाच इलेक्ट्रॉन विवर्तन असे म्हणतात. **(पूर्वार्ध)**

**सामान्यज्ञान**

### अणुभट्टीत वापरता येणारी इंधनं

ते अल्पशा प्रमाणात किरणोत्सर्गी असून याचे अणु मात्र विखंडनक्षम नाहीत. थोरियमच्या अणुंवर न्युट्रॉन कणांचा मारा झाल्यास त्याचं रुपांतर अस्थिर थोरियममध्ये होतं. याच्या अणुंच रुपांतर किर्णोत्सर्गी क्रियांद्वारे काही काळातच प्रथम प्रोटॅक्टीनियम या मुलद्रव्याच्या आणि नंतर युरेनियमच्या अणुत होते. हे अणु मात्र विखंडनक्षम असून ते नैसर्गिक युरेनियममधील विखंडनक्षम अणुंपेक्षाही कमी वजनाचे असतात. थोरियमच रुपांतर विखंडनक्षम युरेनियममध्ये करण्यासाठी सुरुवातीला थोरियमचा वापर इतर अणुइंधनाच्या बरोबरीने अणुभट्टीतच करावा लागतो. (क्रमश:)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४९३**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | | 1 | |
| | | | |
| | | | |
| | 3 | | 1 |

**क्रमांक ४९२ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 1 |
| 1 | 4 | 3 | 2 |
| 4 | 2 | 1 | 3 |
| 3 | 1 | 2 | 4 |

**दोस्ती संगणकाशी**

### नेटवरच्या शॉर्टकीज्

इंटरनेटवरील वेबपेजेसच्या लिंक स्टोअर करण्यासाठी आपण बुकमार्क किंवा फेवरटिज्चा वापर करतो. यासाठी बुकमार्क किंवा फेव्हरटीजमध्ये जावे लागते. त्यासाठी माऊसने बुकमार्क मेन्यूवर क्लिक करावं लागतं. पण यासाठी एक शॉर्ट की आहे.

तुम्ही इंटरनेट एक्स्प्लोअर अथवा फायरफॉक्स दोन्हीपैकी काहीही वापरत असाल आणि तुम्हाला वेबपेज 'स्टोअर' करायचं असे कंट्रोल डी' चा वापर करा. आपोआप तुमच्यासमोर बुकमार्क किंवा फेव्हरटीजची विंडो ओपन होईल. याचप्रमाणे वेबसाईटचे नाव बदलण्यासाठी अॅड्रेस बारमध्ये जावे लागते. यासाठीही 'कंट्रोल+एल' ही शॉटकी वापरून थेट अॅड्रेस बारमध्ये जाता येईल.

**महिलायन**

### स्वयंपाकघरातील सोबती

स्वयंपाकघरात अलीकडच्या काळात इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मिक्सर, फूड प्रोसेसर, मायक्रोवेव्ह, ओव्हन, फ्रीज, वॉशिंगमशीन यांसारख्या वस्तू महिलांना खूप उपयुक्त ठरणाऱ्या आहेत. खास करून नोकरदार महिलांना तर या वस्तू



म्हणजे जवळच्या मदतनीसच ठरल्या आहेत. कमी वेळेत उत्तम काम करणाऱ्या या वस्तूंना म्हणूनच मोठी मागणी असल्याचे दिसते. अलीकडे बाजारात उपलब्ध असणारे मायक्रोव्हेव अत्याधुनिक आहेत. तो घेताना काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. शक्यतो ओटीजी म्हणजे ओव्हन, टोस्टर आणि ग्रील्ड या तिन्ही सुविधा असणारा मायक्रोव्हेव घ्यावा. म्हणजे त्यासाठी वेगळे टोस्टर अथवा ओव्हन घेण्याची गरज राहत नाही. बहुतेक मायक्रोवेव्हमध्ये ही सुविधा असतेच. मायक्रोवेव्हची निवड करताना त्याची क्षमता सर्वप्रथम बघावी. म्हणजे एका ओव्हनमध्ये एका वेळी किती जणांसाठी पदार्थ तयार होऊ शकतो हे बघावे. जास्त माणसं असतील तर अधिक क्षमतेचा मायक्रोवेव्ह घ्यावा. अन्न शिजताना व्हॅटची क्षमता तपासून घ्यावी. चटकन गरम अथवा थंड होणारा मायक्रोव्हेव निवडीस प्राधान्य द्यावे. त्यामुळे विजेच्या बिलात बरीचशी बचत होऊ शकते.
(पूर्वार्ध)

**बालांगण**

### दोस्ती संगणकाशी

इंटरनेटवरील 'डॉट कॉम' अॅड्रेस असणाऱ्या साईट्स ओपन करण्यासाठी प्रत्येक वेळी डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू टाईप करून साईटचं नाव टाईप करून पुढे डॉट कॉम टाईप करायची गरज नाही. फक्त साईटचं नाव लिहा आणि कंट्रोल आणि एण्टर (Ctrl + Enter) दाबा. म्हणजे तुम्हाला गुगल ओपन करायचे असेल तर डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू गुगल डॉट कॉम असे टाईप करायची गरज नाही. फक्त गुगल टाईप करा आणि कंट्रोल+एण्टर दाबा. याचप्रमाणे 'डॉट नेट' असलेल्या साईटसाठी शिफ्ट + एण्टर दाबा. 'डॉट ओआरजी' साईट ओपन करण्यासाठी कंट्रोल+शिफ्ट+एण्टर दाबा.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## १५० इंधनावरील स्वमालकीच्या बस दाखल होणार

# नव्या 'लालपरी' चा प्रवास जानेवारीपासूनच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** खेड्यापाड्यातील प्रवाशांच्या प्रवासासाठी सर्वाधिक सोयीची असलेली आणि सर्वसामान्यांसाठी ' लालपरी' अशी ओळख असलेली एसटी महामंडळाची एसटी बसने आता कात टाकायला सुरुवात केली आहे. विविध प्रकारच्या नव्या अत्याधुनिक यंत्रणा असलेल्या गाड्या महामंडळाच्या ताफ्यात दाखल होत आहेत. त्यामुळे एसटी प्रवासाकडे प्रवाशांचे पुन्हा आकर्षण वाढले आहे. मात्र, या नव्या गाड्यांसाठी प्रवाशांना किमान नव्या वर्षाची वाट पाहावी लागणार आहे.

**» लक्षवेधी**

पूर्वी लांब पल्ल्याचा प्रवास म्हटला की, प्रवासी एसटीच्या लालपरीला पसंती देत. मात्र, मध्यंतरीच्या काळात एसटीच्या गाड्यांची अवस्था खूपच दयनीय झाली होती. अनेक ठिकाणी बस जुन्या झाल्याने त्यांची संख्या कमी झाली. त्यामुळे प्रवाशांना तासंतास वेटिंग करायला लागायचे. त्यामुळे प्रवासी इतर पर्यायांकडे वळले. त्यातच खासगी बसचा पर्यायदेखील निवडला होता. परंतु, एसटीच्या ताफ्यात येत असलेल्या नव्या बसमुळे कमी झालेले प्रवासी पुन्हा एसटीकडे वळले आहेत. लांबपल्ल्याचा प्रवास म्हटले की, पुन्हा एसटी प्रवासाला प्रवासी पसंती देत आहेत.

एसटीच्या पुणे विभागाच्या ताफ्यात आगामी दोन महिन्यांच्या काळात १५० नव्या इंधनावरील स्वमालकीच्या बस दाखल होणार आहेत. या बसमुळे प्रवाशांचे वेटिंग, गर्दीतून होणारा कसरतीचा प्रवास टळणार असून, त्यांना दिलासा मिळणार. एसटीच्या पुणे विभागात १४ आगार आहेत. त्या आगारांना त्यांच्या मागणीनुसार नव्या बस गाड्यांचे वाटप होण्याची शक्यता आहे. यात इंदापूर, तळेगाव, राजगुरुनगर, पिंपरी-चिंचवड, मंचर, शिवाजीनगर (वाकडेवाडी), शिरूर, भोर, दौंड, स्वारगेट, नारायणगाव, बारामती आणि बारामती एमआयडीसी, सासवड या आगारांना नव्या गाड्यांचे वाटप होण्याची शक्यता आहे.

या बसेस दाखल झाल्यानंतर महामंडळाच्या कारभारात आणि उत्पन्नात निश्चितच सुधारणा होणार आहे. तसेच प्रवाशानाही या बसेसचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार असून ते इच्छित स्थळी वेळेवर पोहोचू शकणार आहेत.

### प्रशासनाला तारेवरची कसरत

- एसटीच्या ताफ्यातील बहुतेक बसचे आयुर्मान संपले आहे. त्यातूनच प्रवाशांची संख्या वाढत असल्याने उपलब्ध बस आणि प्रवाशांची संख्या याचा ताळमेळ बसविताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे शासन-प्रशासन पातळीवरून एसटी महामंडळासाठी नव्या गाड्या खरेदी केल्या जात आहेत. या नव्या गाड्या एसटीच्या ताफ्यात दाखल व्हायला सुरुवात झाली आहे. एसटीच्या पुणे विभागाच्या ताफ्यात काही दिवसांपूर्वी १५० इलेक्ट्रिक शिवाई, ई-शिवनेरी बस दाखल झाल्या आहेत.

"नव्या स्वमालकीच्या दीडशे बस पुणे विभागाच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. या तमिळनाडूस्थित कारखान्यात बनवलेल्या अशोक लेलँड कंपनीच्या इंधनावरील बस असतील. या बस आगामी दीड ते दोन महिन्यांच्या कालावधीत एसटीच्या पुणे विभागात दाखल होतील. यापूर्वी नवीन इलेक्ट्रिकवरील शिवाई आणि शिवनेरी अशा एकूण १५० बस पुणे विभागाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत."

— **प्रमोद नेहूल,** विभाग नियंत्रक, एसटी, पुणे विभाग

**» Selected**

### ज्येष्ठ माध्यम सल्लागार अमित राठोड यांच्या नूतन निवासस्थानाच्या वास्तुशांती निमित्त त्यांना शुभेच्छा देताना राष्ट्रसंचार चे संपादक अनिरुद्ध बडवे



### आगामी काही दिवस आकाश निरभ्र राहणार; पुण्यात गुलाबी थंडीला सुरुवात



**पुणे :** पुणे आणि परिसरात थंडीला सुरुवात झाली असून, अनेक भागात गारठा वाढला आहे. गुरुवारी शहराचा पारा १५.२ अंश सेल्सिअस होता. तर, एनडीए येथे किमान तापमान १३.७ अंश सेल्सिअस इतके नीचांकी नोंदविले आहे. त्यामुळे पुण्यात गुलाबी थंडीला सुरुवात झाली आहे. दरम्यान, आगामी काही दिवस आकाश निरभ्र राहणार असून, सकाळी धुके पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

सध्या आकाश निरभ्र झाले असून हवामान कोरडे आहे. तसेच सूर्याचे दक्षिणायन सुरू झाले आहे. शहरात कमाल तापमानात चढ-उतार सुरू आहे. दुपारी उन्हाचा चटका कायम असला तरी तो कमी झाला आहे. येत्या ८ ते १३ नोव्हेंबरदरम्यान आकाश मुख्यतः निरभ्र राहणार आहे. तर, सकाळी धुके पडण्याची शक्यता आहे. तर, कमाल तापमान ३१ ते ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १५ ते १८ अंश सेल्सिअस दरम्यान राहणार आहे.

**राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा**

## आता 'टीईटी' परीक्षेवर राहणार 'एआय'ची नजर


**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) रविवारी (ता. १०) होणार आहे. तुम्ही ही 'टीईटी'ची परीक्षा देणार असाल!!, तर इकडे लक्ष द्या. या परीक्षेत कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत, म्हणून आता तुमच्यावर कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) नजर असणार आहे. टीईटी परीक्षेच्या सर्व वर्गखोल्यांमध्ये तब्बल १८ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांचे थेट प्रक्षेपण परीक्षा परिषदेच्या नियंत्रण कक्षात (वॉर रूम) होईल. सर्व कॅमेऱ्यांना 'एआय'वर आधारित अत्याधुनिक सेवा कार्यान्वित केल्याने वर्गखोल्यांमधील प्रत्येक हालचालींवर बारकाईने लक्ष दिले जाणार आहे. राज्य परीक्षा परिषदेतर्फे टीईटी २०२४ ची परीक्षा एकूण एक हजार २३ केंद्रांवर होईल. परीक्षेतील एकूण तीन लाख ५३ हजार ९५२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यात पेपर एकसाठी एक लाख ५२ हजार ६०५, पेपर दोनसाठी दोन लाख एक हजार ३४७ आणि दोन्ही पेपरसाठी ७५ हजार ९९६ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे.

टीईटी परीक्षा संवेदनशील असल्याने यंदा प्रथमच परीक्षा परिषदेने फ्रिस्किंग, परीक्षार्थींची बायोमेट्रिक हजेरी (फेस रिकग्निशन) आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे एआयची वापर करण्यात आल्याची माहिती परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे आणि आयुक्त अनुराधा ओक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

| पेपर | विद्यार्थी | विद्यार्थिनी | तृतीयपंथी | एकूण |
|---|---|---|---|---|
| पेपर एक | ४७,००४ | १,०५,५९५ | ०६ | १,५२,६०५ |
| पेपर दोन | ६९,५२२ | १,३१,८२२ | ०३ | २,०१,३४७ |
| **एकूण** | १,१६,५२६ | २,३७,४१७ | ०९ | ३,५३,९५२ |

### टीईटी' परीक्षेचा कालावधी ...

- तारीख : रविवारी (ता. १०)
- पेपर एक : सकाळी १०.३० ते दुपारी १
- पेपर दोन : दुपारी २.३० ते सायंकाळी ५.३०



## पोलिसांच्या मदतीला तिसरा डोळा !

# पोलिसांच्या मदतीला धावले चंद्रकांतदादा पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरूड :** शहर वाढले की समस्या वाढतात आणि गर्दी वाढली की गुन्हेगारी. वाढलेल्या शहरात किरकोळ गुन्हेगारी रोखणे हे पोलिसांसमोरचे मोठे आव्हानच असते. राज्याच्या अनेक शहरात ही समस्या उद्भवली आहे. पुणे आणि कोथरूड तरी त्याला कसे अपवाद असेल? पण गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कोथरूड पोलिसांच्या मदतीला धावले आहेत, कोथरूडचे लाडके आमदार चंद्रकांतदादा पाटील.



वाढती गुन्हेगारी पोलिसांची मोठी डोकेदुखी आहे. गुन्हा करायचा आणि शेजारच्या राज्यात पळून जायचे हा नवा गुन्हेगारी फंडा आहे. कोणताच पुरावा नसल्यामुळे गुन्हेगार मोकाट सुटतात आणि त्यांना जेरबंद करणे पोलिसांना अशक्य होऊन बसते. पण कोथरूडच्या गुन्हेगारीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि पोलिसांना सहकार्यासाठी चंद्रकांत दादा पाटील यांच्या माध्यमातून ठीकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.


### कॅमेऱ्याच्या करड्या नजरेने कोथरुडकर निर्धास्त

- आता 24 तास कॅमेऱ्यांचे बारीक लक्ष कोथरूडच्या प्रत्येक घडामोडीवर असते. त्यामुळेच पोलिसांना तर मदत झाली आहेच पण त्याशिवाय गुन्हेगारी घटनांनाही मोठ्या प्रमाणात पायबंद बसला आहे. सामान्य कोथरूडकर त्यामुळेच निर्धास्तपणे रस्त्यावर वावरतो आहे.



## रोड रोमियोंना पोलिसांचा इंगा; मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** बेशिस्त वाहनचालकांना वाहतूक पोलिसांनी चांगलाच इंगा दाखविला आहे. शहरातील वाढते अपघात, तसेच, मद्य पिऊन वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी दररोज रात्री नाकाबंदी करण्यात येत असून, वाहतूक नियमभंग, तसेच मद्य पिऊन वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई तीव्र करण्यात आली आहे. मागील चार महिन्यांत मद्य पिऊन अडीच हजार वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, ५०० जणांचे वाहतूक परवाने रद्द करण्यात यावेत, असा प्रस्ताव वाहतूक पोलिसांनी प्रादेशिक परिवहन विभागाकडे सादर केला.

शहरात मद्य पिऊन वाहने चालविण्याचे प्रमाण खूप आहे. मद्य पिऊन भरधाव वेगाने वाहने चालविण्यात येत असल्याने गंभीर स्वरूपाचे अपघात घडतात. कल्याणीनगर भागात १९ मे रोजी एका बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुण-तरुणीला धडक दिली होती. अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी मद्य पिऊन भरधाव वेगाने वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले होते. शहरात आता दररोज रात्री नाकाबंदी करून मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. त्यासाठी वाहतूक पोलिसांनी २७ ठिकाणे निश्चित केली आहेत.

### शुक्रवारी सरोदवादन आणि 'वैकुंठनायक' स्वराविष्कार; कार्यक्रम सर्वांसाठी खुला



**पुणे :** अभिजात शास्त्रीय संगीत क्षेत्रात मोलाची भूमिका बजावत असलेल्या अल्फा इव्हेंटस्‌तर्फे शुक्रवारी युवा पिढीतील आश्वासक कलाकार इंद्रयुद्ध मजुमदार यांच्या सरोद वादनाच्या मैफलीसह महाराष्ट्रातील संतांच्या अभंग रचनांचा स्वराविष्कार असलेल्या आणि संगीत विश्वातील दिग्गज घराण्यांमधील कलाकारांचा सहभाग असलेल्या 'वैकुंठनायक' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संत रचना नव्या स्वराविष्कारात ऐकावयास मिळणार आहेत. पुणेकर रसिकांसाठी पर्वणी ठरणारा वादन आणि गायनाचा कार्यक्रम शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मयूर कॉलनीतील बाल शिक्षण मंदिरातील ऑडिटोरियममध्ये आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अल्फा इव्हेंटस्‌चे संचालक निखिल जोशी आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायिका अपर्णा पणशीकर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रमाचे निरूपण श्री संत सेवा संघाच्या विश्वस्त स्वर्णिमा करणार असून कलाकारांना भरत कामत (तबला), प्रसाद जोशी (पखवाज), उद्धव कुंभार (तालवाद्य), शुभदा आठवले (संवादिनी) यांची साथसंगत असणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## एमआयटीच्या विद्यार्थ्याकडून कोळ्याच्या नवीन प्रजातीचा शोध

# पुण्याच्या समृद्ध नैसर्गिक वारशात भर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यातील जैवविविधतेचा प्रत्यय देणारे संशोधन एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या संशोधकांनी केले आहे. बाणेर टेकडी येथे उडी मारणाऱ्या कोळ्याची नवीन प्रजाती शोधण्यात आली असून, 'ओकिनाविसियस टेकडी' असे या प्रजातीचे नामकरण करण्यात आले आहे.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा विद्यार्थी अथर्व कुलकर्णी, केरळमधील ख्राईस्ट कॉलेजच्या ऋषिकेश त्रिपाठी यांनी हे संशोधन केले. त्यांना एमआयटीतील डॉ. पंकज कोपर्डे, ख्राइस्ट कॉलेजचे डॉ. ए. व्ही. सुधिकुमार यांनी मार्गदर्शन केले. युनायटेड किंग्डम मधील अराक्नोलॉजी या संशोधन पत्रिका या बाबतचे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. बाणेर टेकडीवरील चारा, वड-पिंपळ अशा झाडांवर या कोळ्याचा अभ्यास केल्यानंतर ही नवी प्रजाती असल्याचे निदर्शनास आले. ही प्रजाती टेकडीवर आढळल्याने त्याचे नामकरण करताना त्यात टेकडीचा समावेश करण्यात आला. 'ओकिनाविसियस टेकडी' आणि इतर स्थानिक प्रजातींची त्यांच्या परिसंस्थेत काय भूमिका आहे या दृष्टीने अधिक अभ्यास करण्यात येत आहे.

- ओकिनाविसियस टेकडी ही प्रजाती बाणेर टेकडी आणि पुण्यातील इतर तत्सम जागांसाठी एक प्रतीक होऊ शकते.
- या शोधामुळे शहरी टेकड्यांकडे आणि जंगलांकडे जबाबदारीच्या भावनेने पाहणे गरजेचे आहे.
- हा शोध शहरी जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठीची धोरणात्मक गरज अधोरेखित करतो.
- स्थानिक पातळीवर संरक्षणासाठी त्वरित पावले उचलण्याची आवश्यकता : डॉ. कोपर्डे

"कोळ्याच्या 'ओकिनाविसियस टेकडी' या प्रजातीच्या शोधाचा अतिशय आनंद आहे. ही प्रजाती 'ओटाकरेंसिस' या प्रजातीच्या जवळची आहे. मात्र यात आकाराचा फरक आहे. हे कोळी जाड फांद्या आणि घनदाट झाडांवर विशेषतः चाफा, फायकस म्हणजे वड, पिंपळ अशा झाडांवर आढळले. राम-मुळा संगम क्षेत्रात ही प्रजाती आढळली आहे. तेथे त्याच्यासाठी योग्य पर्यावरणीय व्यवस्था आहे."

— **अथर्व कुलकर्णी**

## मोटारीचा 'जॅमर' काढण्यासाठी मागितली लाच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नो पार्किंगमध्ये लावलेल्या मोटारीच्या चाकाला लावलेला जॅमर काढण्यासाठी एक हजारांची लाच मागणाऱ्या वाहतूक शाखेतील वॉर्डनसह हायक फौजदाराविरुद्ध समर्थ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघेही समर्थ वाहतूक विभागात कार्यरत आहेत. सहायक पोलीस फौजदार किरण दत्तात्रय रोटे (वय ५१), ट्रॅफिक वॉर्डन अनिस कासम आगा (वय ४८, रा. कोंढवा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

याबाबत एका मोटरचालकाने फिर्याद दिली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ही कारवाई केली. समर्थ वाहतूक विभागांतर्गत येणाऱ्या एका रस्त्यावरील नो पार्किंगमध्ये तक्रारदाराने त्यांची मोटार लावली होती. त्यामुळे वाहतूक विभागाने त्यांच्या मोटारीला जॅमर लावला. जॅमर काढण्यासाठी समर्थ वाहतूक विभागातील ट्रफिक वॉर्डन (वाहतूक मदतनीस) अनिस आगा याने तक्रारदाराकडे १ हजार रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दिली होती. सर्वांसाठी खुला आहे.

## आता एका क्लिकवर समस्येचे निराकरण

# पाण्यासंबंधी तक्रारी साठी पालिकेचा ई-मेल आयडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



- पीएमआरडीए च्या हद्दीत असलेल्या भागात सुविधा देण्याचे काम पीएमआरडीएचे आहे. मात्र या भागातील नागरिकांना अनेक सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे. आवश्यक आणि पुरेसा दाबाने पाणीपुरवठा देखील या भागात होत नाही. पुणे शहराचा वाढता विस्तार पाहता हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये टोलेजंग इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. तेथे मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. या सर्वांना पायाभूत सुविधा पुरविणे हे बंधनकारक आहे. मात्र यामध्ये अनेक अडचणी येत असल्याचे समोर आले आहे.

**पुणे :** पालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांबरोबरच पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील गावांमध्ये होत असलेल्या पाणीपुरवठ्याबाबत वाघोली हाउसिंग सोसायटी असोसिएशन व इतरांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच पीएमआरडीएकडून पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे या भागातील नागरिकांना पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे या याचिकेत म्हटले आहे.

या अनुषंगाने न्यायालयाच्या आदेशाने विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पुणे व पिंपरी महापालिकांचे आयुक्त तसेच पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यांची समिती नेमण्यात आली आहे.

या समितीच्या बैठकीत या गावातील नागरिकांकडून पाणी प्रश्नाबाबत येणाऱ्या तक्रारींसाठी स्वतंत्र ई मेल आयडी उपलब्ध करून द्यावा, असा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार महापालिकेने हा ई मेल आयडी तयार केला आहे. नागरिकांनी पाणीपुरवठ्यासंदर्भातील तक्रारी **waterpil126@punecorporation.org**

या ई मेल आयडीवर नोंदवाव्यात, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी केले आहे. महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांना आवश्यक त्या पायाभूत सोयी सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही पालिकेची आहे. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील पाणी प्रश्नाबाबत तक्रारी करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र 'ई-मेल' आयडी तयार केला आहे. या भागातील नागरिकांनी पाण्याबाबतच्या तक्रारी या ई-मेलवर पाठवाव्यात, असे आवाहन पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे. #रा

# महाविकास आघाडीची याला पाडा, त्याला गाडा ही कुठली संस्कृती - पंकजा मुंडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी गेल्या १० वर्षांत समाविष्ट गावांमध्ये अनेक कामे करून दाखवली आहेत. ही कामं केल्यानंतरही केवळ विरोधाला विरोध आणि राजकारणात टिकायचे म्हणून टीका करायची. "याला पाडा त्याला गाडा ही कुठली संस्कृती? असा सवाल भाजपाच्या राष्ट्रीय सचिव तथा आमदार पंकजा मुंडे यांनी उपस्थित केला. "अरे जो काम करतो त्याला निवडून आणण्याचा सर्वस्वी अधिकार नागरिकांचा आहे". काम करणाऱ्या माणसाला राजकारणात टिकून ठेवण्याची जबाबदारी जनतेची नाही का? असे सवालही त्यांनी यावेळी नागरिकांना उद्देशून केला. महायुतीच्या भोसरी विधानसभा मतदार संघाचे भाजपाचे उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ दिघी येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पंकजा मुंडे बोलत होत्या. आमदार पंकजा मुंडे म्हणाल्या की या सभेला येण्यापूर्वी मी या मतदारसंघाची माहिती घेत होते. माहिती घेत असताना सध्या विरोधकांकडून सुरू असलेल्या आरोप प्रत्यारोपांची माहिती मिळाली. मात्र महेश लांडगे यांनी गेल्या दहा वर्षात पिंपरी-चिंचवड शहरालगतच्या समाविष्ट गावांमध्ये केलेले काम मी पाहिले आहे.





"गेल्या 75 वर्षात आपल्या माय माऊलींसाठी शौचालय बांधण्याचे यांना सुचले नाही. राज्यातल्या प्रत्येक लाडक्या बहिणीसाठी दर महिन्याला ओवाळणी देणारे महायुतीचे सरकार आहे त्यामुळे महायुती सरकारचे हात बळकट करण्यासाठी भोसरी विधानसभेतून आमदार महेश लांडगे यांच्यासह प्रत्येक विधानसभेतील उमेदवार निवडून देणे ही आता लाडक्या बहिणींची जबाबदारी आहे."

— **पंकजा मुंडे,** आमदार, भाजपा नेत्या.

### महेशदादाची हॅट्रिक निश्चित...

● संविधान भवन, न्यायालय संकुल, संतपीठ यांसारखी कामे करून नागरिकांच्या हृदयात महेश लांडगे यांनी स्थान मिळवले आहे. कार्यकर्त्यांनी नागरिकांना या कामाची आठवण करून देणे गरजेचे आहे. सद्या महाविकास आघाडीकडे बोलायला मुदत नाही. त्यामुळे खोटं बोल पण रेटून बोल अशी त्यांची निवडणुकीतील जुमलेबाजी सुरू आहे. त्यांच्याकडे विकासाचा संकल्प राहिलेला नाही. राजकारणात हा सूर्य आणि हा जयद्रथ असेच काम दाखवावे लागते जे काम महेश लांडगे यांनी केलेले आहे. या विकासाच्या कामावरच यंदा त्यांची हॅट्रिक निश्चित आहे, असा विश्वास पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला.

### आंब्याच्या झाडाला दगडे मारले जातात...

● कुणीही कडुलिंब, बाभळीला नाही तर आंब्याच्याच झाडाला दगडे मारतात. पैलवानाने व्यथित होऊन नाही तर बलवान होऊन राजकारण करायचे आहे. बल बुद्धी आणि विद्या हे सर्व काही एका पैलवानाकडेच असते. असा गैरसमज आहे की पैलवानाला फक्त भावना कळतात नव्हे, तर पैलवान कोणत्या वेळेला शरीराचा कोणता स्नायू वापरून शत्रूला चिटपट करायचे हे ठरवत असतो. म्हणून आमदार महेश लांडगे यांनी राजकीय पैलवान होऊन टीकेला उत्तर न देता केलेले काम दाखवत आहेत. त्यामुळे विरोधक चितपट झाल्याशिवाय राहणार नाही, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

## पिंपरी विधानसभांतर्गत मेट्रोमध्ये मतदान जनजागृती



**पिंपरी :** मेट्रोमध्ये रोज लाखोंच्या संख्येने प्रवास करणा-या प्रवाशांनी २० नोव्हेंबर रोजी येणा-या विधानसभा निवडणूकीत सहभागी होऊन मतदान करावे असे आवाहन पिंपरी विधानसभा कार्यालयाचे स्वीप नोडल अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सुहास दिवसे यांचे निर्देशानुसार २०६, पिंपरी (अ.जा.) विधानसभा कार्यालयामार्फत कार्यक्षेत्रात व्यापक प्रमाणात मतदान जनजागृती करण्यात येत आहे.

त्यानुसार आज पिंपरी ते दापोडी दरम्यान धावत्या मेट्रोमध्ये मेट्रो प्रशासनाच्या सहकार्याने मतदान जनजागृती करण्यात आली, त्यादरम्यान निवडणूक विभागाच्या वतीने मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, २०६ , पिंपरी (अ.जा.) विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव, मेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनवणे, महा व्यवस्थापक कॅप्टन सणेर पाटील, मनोजकुमार डॅनियल,वाणिज्य सल्लागार दत्ता माने यांच्या सहकार्यातून मतदान जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात मेट्रो प्रवाशांनी " आम्ही भारतीय नागरीक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच आम्ही धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु" अशी शपथ घेऊन मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला. या मतदान जनजागृती स्वीप विभागाचे संदीप सोनवणे, महालिंग मुळे, दिनेश जगताप तसेच मेट्रोचे शुभम दळवी, विनोद सोळकंठी, अभिषेक शहादाणी आदी उपस्थित होते.

पुणे -पिंपरी परिसरात मेट्रोची एकूण ३० स्टेशन्स आहेत. त्यापैकी ५ भुयारी स्टेशन्स असून रोजच्या प्रवाशांची संख्या १लाख ८० हजारांपेक्षा जास्त असल्याची माहिती मेट्रो प्रशासनाने दिली. स्टेशनवर मतदान जनजागृतीपर फलक देखील लावण्यात आलेले आहेत.

## 35 लाखांची रोकड जप्त



**चिंचवड :** चाकणमध्ये बुधवारी (दि. 6) 36 लाख रुपयांची बेहिशेबी रोकड जप्त केल्यानंतर पिंपरी चिंचवड पोलिसांनी गुरुवारी (दि. 7) चिंचवडमध्ये अतिरिक्त 35 लाख रुपयांची रोकड जप्त केली. चिंचवड पोलिसांनी चाफेकर चौकात ही कारवाई केली.

सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे 1) डॉ विशाल हिरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, चिंचवड पोलीस स्टेशनच्या डीबीचे पाच अधिकारी परिसरात गस्त घालत असताना त्यांनी चाफेकर चौकात सकाळी 11 च्या सुमारास महिंद्रा बोलेरोला थांबवले. तपासाअंती अधिकाऱ्यांना वाहनात 35,11,220 रुपये बेहिशेबी रोकड आढळून आली. बाळू तापकीर, नितीन गायकवाड, नेहा लोहार आणि पूनम राठोड या चारही प्रवाशांना रोख रकमेबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही.

वरिष्ठ पोलीस अधिकारी, निवडणूक रिटर्निंग अधिकारी आणि आयकर विभागाला माहिती देण्यात आली असून रोख रकमेच्या मालकीचा तपास सुरू असल्याचे एसीपी डॉ हिरे यांनी सांगितले.

## चिंचवड विधानसभेत वातावरण पूर्णपणे फिरलं !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चिंचवड :** चिंचवड विधानसभा मतदार मतदारसंघातील भाजप-शिवसेना- राष्ट्रवादी- आरपीआय व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांचा बुधवारी पिंपळे सौदागर भागात गावभेट दौरा झाला. यावेळी आयोजित गावभेट दौऱ्या दरम्यान पदयात्रांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने त्यात सामीलही झाले.

माजी नगरसेवक नाना काटे, शत्रुघ्न (बापू) काटे, केशव घोळवे,निर्मला कुटे, शंकर काटे, प्रकाश झिंजुर्डे, भानदास काटे, उन्नती फाउंडेशनचे संजय भिसे, जगन्नाथ काटे, जयनाथ काटे, अनिल काटे, कैलास कुंजीर, शेखर कुटे, बाळासाहेब काटे, चंद्रकांत काटे, पोपट काटे, विकास काटे, दीपक नागरगोजे, गिरीश जाचक, अतुल पाटील, महेंद्र झिंजुर्डे, नानासाहेब निवृत्ती काटे, निलेश काटे, बाळासाहेब चौधरी, राजेंद्र जयस्वाल, विजय भिसे, सोमनाथ काटे, राजाराम काटे, संतोष काटे, ज्येष्ठ नागरिक संघाचे भागवत झोपे, रमेश वाणी, संकेत कुटे यांच्यासह पिंपळे सौदागर मधील ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी - आरपीआय मित्र पक्षातील आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात हिंद कॉलनी, यशवंत नगर, श्री स्वामी समर्थ कॉलनी, बापूसाहेब शिंदे कॉलनी, विश्वशांती कॉलनी, काटे वस्ती, भिसे पार्क या भागातुन गाव भेट दौरा करत पदयात्रा काढण्यात आली. "भारतीय जनता पार्टीचा विजय असो" "शंकर भाऊ जगताप तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है" अशा घोषणांनी पिंपळे सौदागर परिसर अक्षरशः दणाणून गेला होता. गाव भेटी दरम्यान घरोघरी महिलावर्गाकडून त्यांचे औक्षण करण्यात आले.

चिंचवड विधानसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला समजला जातो. गेल्या अनेक वर्षांपासून भाजपात निष्ठेने कार्यरत असलेले आणि चिंचवड विधानसभा मतदार संघात विविध विकासकामांमुळे चर्चेत आलेले स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पिंपळे सौदागर भागात विकासाची गंगा आणली.

थेटसामना

## काँग्रेसच्या स्नेह मेळाव्यात विजयाची वज्रमुठ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) काँग्रेसच्या वतीने आयोजित स्नेह मेळाव्यात महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासह विविध घटक पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विजयाची वज्रमुठ बांधत राहुल कलाटे यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचा निर्धार केला.

आकुर्डी येथील हॉटेल किरीयाडमध्ये हा स्नेह मेळावा संपन्न झाला.

यावेळी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी राहुल कलाटे यांचे स्वागत करून सन्मान केला. महाविकास आघाडीत काँग्रेसने कायम समन्वयाची भूमिका ठेवली आहे. लोकसभा निवडणुकीतही काँग्रेसने प्रचाराचे नियोजन केले होते. विधानसभा निवडणुकीला देखील काँग्रेस पूर्ण ताकदीने माविआ उमेदवारांचा प्रचार करेल असे मत यावेळी कदम यांनी व्यक्त केले. तसेच काँग्रेससह महाविकास आघाडीतील सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी विजयाचा संकल्प केला.

कार्यक्रमाला राहुल कलाटे यांच्यासह पिंपरी उमेदवार सुलक्षणा शीलवंत-धर, भोसरी उमेदवार अजित गव्हाणे, संग्राम तावडे, यांच्यासह विविध पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

सर्व सामान्य जनतेला केंद्रस्थानी धरून निर्णय घेणारे महाविकास आघाडीचे सरकार राज्यात आणण्यासाठी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षातील कार्यकर्ते पदाधिकारी जिवतोडून काम करत आहेत. मी सर्वांचा मनस्वी आभारी आहे. त्याचप्रमाणे राज्यात बिघडलेली कायदा व सुव्यवस्था सुधरवण्यासाठी, महागाई, बेरोजगारी संपविण्यासाठी केवळ महाविकास आघाडीला आपण निवडावे.

— **राहुल कलाटे**
उमेदवार, मविआ, शरद पवार गट

## काँग्रेस शहर अध्यक्ष कैलास कदम यांच्या राजीनाम्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** महाराष्ट्र विधानसभा २०२४ निवडणुकीचा विचार केला असता पिंपरी-चिंचवड शहरामध्ये विधानसभेचे चिंचवड २०५, पिंपरी २०६ आणि भोसरी २०७ असे तीन विधानसभा मतदार संघ आहेत. पिंपरी-चिंचवड शहराचे सध्याचे कॉग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष श्री. कैलास महादेव कदम यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहराला मे २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाला जागा मिळाली नाही. त्याच प्रमाणे सध्या चालू असलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये इतर पक्ष कमकुवत असूनही काँग्रेस पक्षाला तीन विधानसभा पैकी एकही जागा मिळालेली नाही. वास्तविक पाहता महाविकास आघाडीतील इतर पक्षाकडेही उमेदवार नव्हते. तरीही श्री. कैलास कदम यांची पक्षातील निकृष्ट व अकार्यक्षम कार्य पद्धतीमुळे पिंपरी-चिंचवड शहराला विधानसभेत एकही जागा मिळालेली नाही. कैलास कदम यांच्या अकार्यक्षम नेतृत्वाचा विचार करता असे दिसते कि २०२३ साली प्रांताध्यक्ष नानाभाऊ पटोले साहेब यांनी पुणे काँग्रेस भवन येथे आढावा बैठक घेऊन सांगितले होते कि प्रत्येक शहराध्यक्षांनी आपापल्या भागात बुथची बांधणी करून त्याचा सविस्तर रिपोर्ट सादर करावा.पिंपरी-चिंचवड महानगर -पालिकेचा विचार केला असता १६,१४,४९८ मतदार संख्या असलेल्या शहरात एकूण १४४२ बुथ आहेत. चिंचवड ५६१, पिंपरी ३९८, भोसरी ४८३ अशी विभागणी आहे. मा. श्री. नानाभाऊ पटोले साहेबांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीनंतर ४ महिन्याच्या कालावधीनंतर परत अशाच बैठकीत नानाभाऊ पटोले साहेबांनी बूथ लेवल एजंट संदर्भात विचारणा केली असता. लवकरात लवकर बूथ लेवल एजंट संदर्भात रिपोर्ट देतो असे सांगितले होते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये पदयात्रा जोमात

# नेत्यांचा थेट जनतेशी होतोय संवाद

### अण्णा बनसोडे यांच्या प्रचार फेरीला कासारवाडीत उदंड प्रतिसाद

पिंपरी, पिंपरी विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी कासारवाडी भागात भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. या प्रचारफेरीस नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. मतदार संघातील लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभाग निहाय जनसंपर्क कार्यालय उभारण्याची घोषणा यावेळी आमदार अण्णा बनसोडे यांनी केली.

कासारवाडी येथील सूर्यमुखी महादेव मंदिराचे दर्शन घेऊन प्रचार फेरी सुरुवात करण्यात आली. या प्रचार फेरीत माजी महापौर व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, माजी नगरसेवक श्याम लांडे, माऊली थोरात, स्वाती उर्फ माई काटे, किरण मोटे, उल्हास शेट्टी, राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या वर्षा जगताप, आरपीआयचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब भागवत, कष्टकरी कामगार नेते बाबा कांबळे, संजय अवसरमल, ॲड. आतिष लांडगे, ॲड. संजय दातीर पाटील, कुणाल लांडगे, बाळासाहेब लांडे, प्रकाश तात्या जवळकर, रघुनाथ जवळकर, प्रतिभा जवळकर, रवींद्र ओव्हाळ, शेखर कुटे, शेखर काटे, सीमा बोरसे, अमोल मोटे, सतीश लांडगे, बाळासाहेब रोकडे, तुकाराम बजबळकर, कुमार कांबळे, सुप्रिया काटे, सुनिता अडसुळे, महेश झपके आदींसह कासारवाडी परिसरातील महायुती घटक पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.



### ख्रिस्ती समाजाचा डॉ. सुलक्षणा शिलवंत यांना पाठिंबा

ख्रिस्ती समाजातील तरुणांना स्वतःच्या पायावरती उभे राहता यावे यासाठी आपण भारतरत्न मदर तेरेसा आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी प्रयत्न करू असे मत पिंपरी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवार डॉ. सुलक्षणा शिलवंत यांनी ख्रिस्ती बांधवांशी बोलताना व्यक्त केले. डॉ. सुलक्षणा शिलवंत म्हणाल्या की, पिंपरी चिंचवड शहरात ख्रिस्ती समाजाचे खूप मोठे योगदान आहे. परंतु त्यांना आजवर ज्या सन्मानाने सहकार्य करण्याची गरज होती ती केली गेली नाही. आपण मात्र या संदर्भात या समाजाच्या अडचणी दूर करण्यासाठी तसेच समाजातील तरुणांना युवकांना तसेच युवतींना स्वबळावर उभे करण्यासाठी मदर तेरेसा यांच्या नावाने आर्थिक विकास महामंडळ स्थापण्यासाठीचा प्रयत्न करणार आहोत. यावेळी बोलताना डॉ. सुलक्षणा शिलवंत म्हणाल्या की, या समाजाला त्यांच्या समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे व यासाठी भविष्यात आपण योग्य ते सहकार्य करणार आहोत.

यावेळी रीजनल ख्रिस्तीयन सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत उर्फ लुकास केदारी म्हणाले की, ख्रिस्ती समाजाच्या प्रश्नांची आजवर कोणी दखल घेतली नव्हती डॉ. सुलक्षणा शिलवंत यांनी पहिल्यांदा या प्रश्नांबाबत सहकार्याचे स्वतःहून आश्वासन दिले आहे.



भाजप राम राम

## माजी नगरसेवक चंद्रकांत नखातेंचा पक्षाला सोडचिट्ठी



**चिंचवड :** चिंचवड विधानसभा निवडणुकीसाठी तीव्र इच्छुक असलेले भाजपचे माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते यांनी भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्य पदाचा राजीनामा दिला आहे. कालच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्यासाठी काळेवाडीत जाहीर सभा घेतली. कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचा मंत्र दिला. त्याच्या दुसऱ्याच दिवशी नखाते यांनी राजीनाम्याचे पत्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवून भाजपला रामराम ठोकला आहे. त्यामुळे शहर भाजपमध्ये सर्वच आलबेल नसल्याचे समजत आहे. नखाते यांनी प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, " साहेब आजपर्यंत मी भारतीय जनता पक्षाचे पूर्ण वेळ काम केले. पक्षाच्या विचाराचा एक एक व्यक्ति सोबत घेवून मी पक्षाची विचारधारा तळागाळात रुजविण्याचे काम केले. दिवंगत आमदार स्व. लक्ष्मण जगताप यांना 2014 आणि 2019 अशा दोनवेळा मताधिक्य देण्यात सिंहाचा वाटा उचलला. त्यांच्या निधनानंतर पक्षाचा आदेश मानून त्यांच्याच पत्नीला पोटनिवडणुकीत निवडून आणले. तसेच, 2017 च्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीत रहाटणी प्रभागात पॅनल प्रमुख म्हणुन स्वतःच्या खांद्यावर जबाबदारी घेऊन भारतीय जनता पार्टीचे माझ्यासह 4 उमेदवारांना बहुमताने निवडून आणले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीची सता आली. सत्तेच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात जगताप कुटुंबियांनी पिंपरी चिंचवड महानगर पालिकेतील एकही पद मिळू दिले नाही. महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, पक्षनेता या मानाच्या पदासाठी इच्छुक असताना देखील मी पंधरा वर्षे नगरसेवक असून सुद्धा मला डावलून नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांना संधी देण्यात आली.

## बस, रेल्वे आणि खासगी ट्रॅव्हल्सला प्रचंड गर्दी

# दिवाळीत मेट्रोचे प्रवासी घटले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** दिवाळीच्या सुट्टीच्या काळात प्रवाशांना गावाला जाण्यासाठी पीएमपीसोबतच महामार्ग परिवहन (एसटी) महामंडळाची बस, रेल्वे आणि खासगी ट्रॅव्हल्सला प्रचंड गर्दी होती. मात्र, दुसऱ्या बाजूला पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांना जोडणाऱ्या मेट्रोत मात्र शुकशुकाट पाहायला मिळाला. मेट्रोच्या दोन्ही मार्गावर एरवी पावणेदोन लाख असलेली दैनंदिन प्रवासी संख्या कमी होऊन एक लाखाच्या खाली आली होती. विशेष म्हणजे स्थानकेही ओस पडली होती. दिवाळीमध्ये मेट्रोचा प्रवास वाढेल अशी अधिकाऱ्यांनी आशा व्यक्त केली होती मात्र ती फोल ठरली.

२८ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरदरम्यान पिंपरी ते स्वारगेट (लाइन १) आणि वनाज ते रामवाडी (लाइन २) या दोन्ही मार्गावर दैनंदिन प्रवासी संख्या आणि उत्पन्न घटल्याचे दिसून आले. प्रवासी रेल्वे स्थानकापर्यंत जाण्यासाठी मेट्रोचा वापर करतील अशी अपेक्षा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली होती. मात्र तसे काही निदर्शस आले नाही. उलट खाजगी ऑनलाइन वाहनांवर मोठ्या प्रमाणात नागरिकांनी भर दिला.

लाइन १ या मेट्रो मार्गावर दोन लाख ८७ हजार ५७ प्रवाशांनी, तर लाइन २ या मेट्रो मार्गावर दोन लाख ९४ हजार ९८२ प्रवाशांनी प्रवास केला.

या सहा दिवसांत सर्वात कमी लाइन १ वर २३ हजार ३८० आणि पुणे मेट्रोच्या लाइन १ या मेट्रो मार्गावर ९३ हजार ४५६ आणि लाइन २ या मेट्रो मार्गावर ९० हजार २४५ प्रवाशांनी २० ऑक्टोबर रोजी प्रवास केला होता. या दोन्ही मार्गावर एकाच दिवशी एकूण १ लाख ८३ हजार ७०१ प्रवाशांनी केला होता. १ नोव्हेंबरला केवळ ४४ हजार ६४८ प्रवाशांनी प्रवास केला. लाइन २ वर २१ हजार २६८ प्रवाशांनी प्रवास केला. दिवाळीनिमित्त शाळा, कॉलेज आणि कार्यालयांना असणाऱ्या सुट्या आणि शहरातील बहुतांश नागरिक गावी गेल्यामुळे प्रवासी संख्येत मोठी घट दिसून येते.

### एसटी, रेल्वेला गर्दी

● पिंपरी-चिंचवड आणि पुण्यात त्याचप्रमाणे आजूबाजूच्या परिसरात कामानिमित्त स्थायिक झालेल्या परजिल्ह्यांतील नागरिकांची संख्या जास्त आहे. यातील बहुतांश दिवाळीत गावी जाऊन सण साजरा करतात. त्यामुळे गावी जाणाऱ्या एसटी, रेल्वे आणि ट्रॅव्हल्सला प्रंचड गर्दी असते. मात्र, याच कालावधीत शहरात सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या मेट्रोत शुकशुकाट पाहायला मिळाला.

## हिंदू संस्कृतीवर घाला घालणाऱ्यांना वेळीच रोखा :स्वामी गोविंददेव गिरी महाराज



**चिंचवड :** देव, देश आणि धर्माच्या रक्षणासाठी आपली सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवावी लागेल. आगामी काळात सावध राहत हिंदू संस्कृतीवर घाला घालणाऱ्या फुटीरतावादी व संस्कृती विरोधी शक्तींना थारा देऊ नका, असे आवाहन अयोध्येतील श्रीराम मंदिराचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले.

स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांच्या शिवचैतन्य जागरण यात्रेमध्ये संस्कृती संवर्धन व विकास महासंघ पिंपरी चिंचवड आयोजित संतसंमेलनात ते बोलत होते. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित संमेलनाला व्यासपीठावर मोरया गोसावी मंदिराचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त श्री उमाप, संत तुकाराम महाराज संस्थान देहुचे मुख्य विश्वस्त ह.भ. प.पुरुषोत्तम महाराज मोरे, संस्कृती संवर्धन व विकास महासंघाचे पिंपरी चिंचवड अध्यक्ष ह.भ.प.किसन महाराज चौधरी त्याच बरोबर आळंदी देवाची संस्थान चे भावार्थ देखणे ही प्रामुख्याने उपस्थित होते. मठ, मंदिरे आणि आश्रम ही हिंदू समाजाची उर्जास्थाने असल्याची भूमिका गोविंददेव गिरी महाराज यांनी मांडली. ते म्हणाले, "छत्रपती श्री शिवाजी महाराज आपले आदर्श आहे. हिंदवी स्वराज्यात शास्त्र, साधू, संत, तीर्थस्थाने, तीर्थयात्रा या सर्वांच्या माध्यमातून संस्कृती संवर्धनाचे कार्य झाले. आज संविधानाच्या रक्षणासाठी संस्कृतीचे संवर्धन होणे गरजेचे आहे. हिंदू टिकला तर संविधान टिकेल. त्यामुळे संविधान आणि धर्माच्या रक्षणासाठी आपण १०० टक्के मतदान व्हायलाच हवे." १०० टक्के मतदान आणि संविधानीक मुल्यांच्या रक्षणातून आपला देश जगात सर्वश्रेष्ठ बनवूया असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातील शंखनाद व मातृशक्तीने औक्षण करून महाराजांचे स्वागत केले.प्रास्ताविक ह.भ.प.किसन महाराज चौधरी प्रार्थना डॉ.अजित जगताप, सूत्रसंचालन प्रसन्न देशपांडे यांनी केले. संत संमेलनाला साधु-संतांबरोबरच विविध मठ मंदिरांचे शेकडो प्रतिनिधी उपस्थित होते.

## सोनालिका ट्रॅक्टर्सची दमदार विक्री



**पिंपरी :** भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड म्हणून ओळख मिळवलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. यंदाच्या दिवाळीत सोनालिकाने ऑक्टोबर महिन्यात तब्बल २०,०५६ ट्रॅक्टरची विक्रमी विक्री केली आहे. सोनालिका ट्रॅक्टर्सच्या इतिहासातील ही सर्वात मोठी मासिक कामगिरी असल्याचे सांगण्यात येत आहे. सोनालिका ट्रॅक्टर्स शेतकऱ्यांमध्ये सतत परिवर्तन घडवून आणत आहे तसेच सर्वात शक्तिशाली हेवी-ड्युटी ट्रॅक्टर्ससह कृषी क्षेत्राला उन्नत करत आहे. कंपनीच्या वार्षिक 'हेवी ड्युटी धमाका' ऑफरमुळे शेतकऱ्यांसाठी सणासुदीच्या काळात वाजवी किंमतीत प्रगत तंत्रज्ञानावर चालणारे ट्रॅक्टर उपलब्ध करुन दिले होते . या ट्रॅक्टरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आयुष्यात पुढे जाण्यासाठी आधाराची महत्त्वपूर्ण यंत्रणा लाभली आहे.

# शर्वरी डिग्रजकर यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** स्वरसागर सांस्कृतिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची शर्वरी डिग्रजकर – पोफळे यांनी आपल्या शास्त्रीय गायनाची सुरुवात राग पुरिया कल्याणने केली. त्यानंतर मत्स्यगंधा नाटकातील नाट्यपद सादर केले. "आम्हा न कळे ज्ञान" या अभंगांने सांगता केली. त्यांच्या गायनाने उपस्थित रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. त्यांना तबल्यावर रोहित कुलकर्णी आणि हार्मोनियम साथ राजीव तांबे यांनी केली.

प्रारंभी स्नेहल सोमण यांच्या नृत्यरंग सादरीकरणाने झाली. सोमण यांची नृत्य शारदा कथक कला मंदिर ही संस्था आहे. स्नेहलजी आणि त्यांच्या शिष्यांनी प्रथम गणेश वंदनेने सादरीकरणाची सुरुवात केली. त्यानंतर शिखर अनवट ताल, ठुमरी, पंच महाभूत प्रस्तुती, सरस्वती वंदना, अष्टपदी आणि शेवट फ्यूजन प्रकाराने सादरीकरणाचा शेवट केला.

कार्यक्रमाच्या शेवटच्या सत्रात "स्वरस्वप्न" व्हायोलिन समुहाने आपले सादरीकरण केले. गुरू स्वप्ना दातार यांच्या सुश्राव्य निवेदनाखाली संपूर्ण शिष्यवर्गाने हा कार्यक्रम सादर केला. व्हायोलिनच्या समूह सादरीकरणाची सुरुवात "पंचतुंड नररुंड" या नांदीने झाली. त्यानंतर शिष्य समूहाने रागमाला, भूप, सूलताल, भीमपलास, किरवाणी, तुर्कीश मार्च सादरीकरण केले.

यानंतर भक्तीसंगीत अभंगाच, देशभक्तिपर गीते, फोक संगीत प्रकार आणि शेवटी सूरत पिया या प्रसिद्ध गाण्याने सांगता केली. प्रेक्षक व्हायोलिनच्या संगीतात रममाण झाले होते.

व्हायोलिन समूह वादनात श्रेयस, मानस, आरोही, सानविका, अर्जुन, कार्तिकेय, वेधा, मनस्वी, मंजिरी, अनुराग, आर्या, रिओना, सिद्धी, मल्हार, ईशा, रिया, पार्थ, आशिष, दिवीज, तनिष्का यांचा सहभाग होता. तबला साथ मनोज देशमुख, रोशन चांदगुडे, पखवाज भागवत चव्हाण, ताल वाद्य शुभम शहा, यांनी केले.

पान १ वरून

## भगवे वादळ

कर्नाटक, राजस्थान, तेलंगणात योजनांचे आश्वासन देऊन मागे फिरणारे, प्रिंटिंग मिस्टेक सांगणारे हे धोकेबाज लोक आहेत. 'हम देनेवाले वो लेने वाले है...! माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले याबाबतीत बोलताना त्यांनी स्थगितीशिवाय दुसरे काय केले? असा सवाल उपस्थित केला.

उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात कार शेड, मेट्रो, समृद्धी महामार्ग अशा विविध योजना, कामांना स्थगिती देण्याचे काम झाले. त्यामुळे त्यांना दुसरे काहीही येत नाही असा टोला लगावला.

मला पुण्याचा चेहरा मोहरा बदलायचा आहे. सीएम म्हणजे चिफ मिनिस्टर नसून कॉमन मॅन आहे. तर मला आता सुपर मॅन व्हायचे आहे. त्यासाठी तुम्ही जनतेने राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यासाठी साथ देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

आपण अडीच वर्षात विविध योजना राबवल्या परंतु यामध्ये लाडकी बहीण योजना ही सुपरहिट झाली आणि आमची ही योजना चोरण्याचे काम विरोधकांनी केले. विरोधकांनाकडे कुठेलही विकासाचे मुद्दे नसल्याने पायाखालची जमीन सरकली आहे .आम्ही अडीच वर्षांमध्ये केलेले काम जनतेला पसंतीस उतरले आहे. आम्ही पहिल्या टप्प्यातच मुरलीधर मोहोळ यांना आम्ही केंद्रीय मंत्रीपद देऊन पुण्याच्या हवाई मार्ग असेल किंवा इतर विकासाची कामे त्यांच्या माध्यमातून होतील या आशेने त्यांच्यावरती जबाबदारी दिली. ती जबाबदारी पुण्याच्या विकासाच्या दृष्टीने हिताची ठरेल यात शंका नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. व्यासपिठावर महायुतीचे सर्व उमेदवार तसे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ तसेच महायुतीचे सर्व नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिवस मोजणार..!

भाषणात प्रशंसा करून दाखवावी. पण युवराज कधीच सावरकरांची प्रशंसा करणार नाही. वीर सावरकरांचे काळ्या पाण्याचे शिक्षेचे दिवस, देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेला पण हे सगळे काँग्रेसला मान्य नाही. स्वातंत्र्याच्या लढाईत सावरकरांनी अनेक क्रांतीकारकांना प्रेरणा दिली. त्याविषयी आघाडीतील पक्षांनी काँग्रेसच्या तोंडून प्रशंसा करून दाखवावी, असे आव्हान मोदींनी ठाकरेंचे नाव न घेता दिले. देश आणि महाराष्ट्राच्या राजकारणात बाळासाहेब ठाकरेंचे योगदान अतुलनीय आहे. पण काँग्रेसच्या नेत्यांच्या तोंडून बाळासाहेबांच्या प्रशंसेचा एक शब्दही निघत नाही, अशी टीका करत मोदी म्हणाले, मी आघाडीतील काँग्रेसच्या मित्रांना हेही आव्हान देतो की, त्यांनी काँग्रेसचे नेते, युवराजांच्या तोंडून बाळासाहेब ठाकरेंची, त्यांच्या विचारधारेची सार्वजनिकपणे प्रशंसा करून दाखवावी, असे आव्हानही मोदींनी दिले. आज आठ नोव्हेंबर आहे. मी दिवस मोजणार आहे.

महाविकास आघाडीकडून उत्तराचे वाट पाहीन. ते सावरकर, बाळासाहेब ठाकरेंची प्रशंसा करतात की नाही, याची वाट पाहीन. महाराष्ट्रही पाहील, असेही मोदी म्हणाले. त्यामुळे आता उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडी मोदींच्या या आव्हानाला कसे उत्तर देणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. महाविकास आघाडीच्या गाडीला ना चाक आहेत ना ब्रेक आहे. चालकाच्या सीटसाठीही तिन्ही पक्षात रस्सीखेच सुरू आहे. आम्ही जनतेला ईश्वरांचे रुप मानतो.

जनतेची सेवा करण्यासाठी राजकारणात आलो आहे; मात्र महाविकास आघाडीतील नेते जनतेला लुटण्यासाठी राजकारणात आले आहेत, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. काँग्रेस धर्म, जात, तसेच विविध घटकांच्या नावाखाली समाजात विभागणी घडवण्याचे पाप करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. गेल्या अडीच वर्षात महायुती सरकारने विकासकामांचा नवा उच्चांक गाठला आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला गौरव पुन्हा मिळाला आहे. भाजप महायुती आहे, तर गती आहे आणि तरच महाराष्ट्राची प्रगती आहे, आम्ही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आम्ही पूर्ण केली.

दुसरीकडे काँग्रेसने राज्यात आणि केंद्रात सत्ता असताना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. हाच त्यांचा खरा चेहरा आहे, असे सांगून ते म्हणाले, की काँग्रेस जातीजातीत भेद निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे.

## सामूहिक बलात्कार

रहिवाशी आहेत. बलात्काराच्या घटनेमुळे घाबरलेल्या महिलेने राजस्थानात जाऊन पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानंतर हे प्रकरण स्वारगेट पोलिसांकडे सोपवण्यात आले. स्वारगेट पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडीत महिला स्वारगेट येथील एका वसाहतीत भाड्याने राहायला होती. ती आणि तिचा पती कामानिमित्त पुण्यात आले. दरम्यान, जून महिन्यात आरोपी सोहेल पीडिताच्या घरी आला आणि तिच्यावर बलात्कार केला. या घटनेबाबत कुठेही वाच्यता केल्यास मुलांना जीवे मारू, अशी धमकी त्याने पीडिताला दिली. यानंतर आरोपी कालू आणि सोहेल यांनी तिला धमकावून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला.बलात्काराच्या घटनेनंतर पीडिता आपल्या मूळ गावी निघून गेली. त्यावेळी तिसरा आरोपी दिलदारने फोनद्वारे पीडिताशी संपर्क साधला. तसेच या घटनेची पोलिसांना माहिती देऊ नको, अशी धमकी दिली.

## वैद्यकीय महाविद्यालयाला...

समजताच डॉ. मंदार करमरकर यांनी तातडीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. यानंतर भारती विद्यापीठ पोलिसांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय आणि वसतिगृह परिसराची तपासणी केली. यावेळी बीडीडीएस पथकालाही पाचारण करण्यात आले होते. बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ई-मेल आल्याच्या या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली होती. ई मेलची तांत्रिक तपासणी केली असता, तो परदेशातून आल्याचे माहिती समोर येत आहे. ई मेलमध्ये स्पष्टपणे अशी कोणतीही धमकी नव्हती. मेल करणाऱ्याला नक्की काय म्हणायचे हे पाठवलेल्या संदेशात कळत नव्हते. मात्र बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ई-मेल आल्यामुळे पोलिसांची धावपळ उडाली होती. याप्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक स्वप्नील पाटील करीत आहेत.

## Format C-1 (for candidate to publish in Newspapers, TV)
## Declaration about criminal cases

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate: **DATTATRAY BABAN KALBHOR**

**R/at: - Near Old Canol, 70, Raywadi, Loni Kalbhor, Tal. Haveli, Pune- 412201**

Name of political party: **INDEPENDENT**

Name of Election: **General Election to Legislative Assemblies of Maharashtra, 2024**

*Name of Constituency: 198 - **SHIRUR**

**I, Dattatray Baban Kalbhor,** a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal Cases**

| SI. NO | Name Of Court | Case No. & Dated | Status of Cases | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Before Hon"ble District Judge-4 Addl Session Judge Shri. Mudholkar Saheb. | Spl. Case No. ACB/ 31/2028 | Charge | Section 13(2), rw 13(1) (C) (d) of Prevention of Corruption Act As per the prosecution case, between 31/03/2014 to 24/12/2014 the Rahul Damodar Ghule along with his companions, through various various bogus loan cases prepared on the basis of fake documents, defrauded Union Bank of India, Br. Vishrantwadi, Pune to the tune of Rs. 13,50,00,000/-. In this case |
| | | | | the candidate is accused no. 64 as Suspect. |
| 2. | Before Hon"ble J.M.F.C, Khadki Contt. Shri. Dubale Saheb | Summary Criminal Case No. 15/2023 | Awaiting Summons | Section 138 of Negotiable Instruments Act The candidate is prosecuted by M/s Kirad Cement Agency for cheque bounce offence. In this case the candidate is appeared. |
| 3. | Before Hon'ble Jt. CJJD J.M.F.C, Pune Shri. Pandey Saheb | Summary Criminal Case No. 8086/2020 | Verific ation | Section 138, 143 of Negotiable Instruments Act The candidate is prosecuted by Jai Vaibhav Laxmi Finance for cheque bounce offence. In this case the candidate is appeared. |
| 4. | Before Hon'ble 13th Jt. CJJD & J.M.F.C, Pune Shri. Dornalpalle Saheb | Summary Criminal Case No. 1173/ 2019 | Appearan ce | Section 138 of Negotiable Instruments Act The candidate is prosecuted by Shree Warana Sahakari Bank for cheque bounce offence. In this case the candidate is appeared. |

(B) Details about cases of conviction for criminal offences

NOT APPLICABLE

Note: Due to insufficient information and confusion about publication of this declaration, for first time it will be published on 09/11/2024.

Pune
Date: 08/11/2024

शिक्का

श्री. भानुदास बळीराम भांड
ॲडव्होकेट
ऑफीस : प्लॅट नं. ८, ४ था मजला, Y2K अपार्टमेंट,
१८३५, सदाशिव पेठ, वंदे मातरम चौक, पुणे ४११०३०.
मो.नं. 97666 46244.

## शरद पवार यांना केले टार्गेट

# महाराष्ट्राचे पुढचे मुख्यमंत्री फडणवीस- शाह यांचे सूतोवाच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगली :** महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरलो. जनतेची एकच भावना आहे, की आपल्याला पुन्हा एकदा महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांना आणायचे आहे, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्राचा पुढचा मुख्यमंत्री कोण असेल, याचे सूतोवाच केले.

सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे आज शाह यांची सभा पार पडली. या सभेत शाह यांनी महाविकास आघाडीवर आणि विशेष करून शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली. शाह यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला शिराळा येथे समर्थ रामदास स्वामींना अभिवादन केले. तसेच २० नोव्हेंबर रोजी डबल इंजिनचे सरकार आणण्यासाठी महायुतीला



मतदान करण्याची भूमिका घ्या, असे सांगितले. औरंगाबाद जिल्ह्याचे नाव छत्रपती संभाजीनगर व्हायला हवे की नको? पण महाविकास आघाडीचे नेते याला विरोध करत आहेत. जे स्वतःला बाळासाहेब ठाकरेंचे वारसदार म्हणवून घेतात, ते उद्धव ठाकरेही या नामकरणाला विरोध करत आहेत. मी शरद पवारांना आज आव्हान देतो, तुम्ही कितीही जोर लावा; पण संभाजीनगरचे नाव छत्रपती संभाजीनगरच राहणार, असे आव्हान त्यांनी दिले.

शाह म्हणाले, की जम्मू-काश्मीरमध्ये आम्ही कलम ३७० हटविले. संपूर्ण देशाने याला पाठिंबा दिला; मात्र ठाकरे आणि पवार याला विरोध करत आहेत. मी आज पवार यांना आव्हान देतो, की तुमच्या चार पिढ्या आल्या तरी कलम ३७० पुन्हा आणू शकत नाहीत. शिराळामध्ये नागपंचमीनिमित्त खऱ्या नागांची पूजा केली जात असे; पण सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर या परंपरेवर बंदी घालण्यात आली आहे. परंपरागत नाग पूजा करण्यास आमचा विरोध नाही. नाग पूजा पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. याला कुणीही रोखू शकत नाही.

### मतपेढीसाठी टाळले दर्शन

● शरद पवार यांनी राम मंदिर निर्माणानंतर सांगितले, की मी नंतर दर्शनाला जाईल; पण ते अद्याप दर्शनाला गेले नाहीत. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि उद्धव ठाकरेही गेले नाहीत. ते का गेले नाहीत? हा प्रश्न महाराष्ट्राच्या जनतेने विचारावा. त्यांना आपली मतपेढी सांभाळायची आहे, म्हणून ते राम मंदिरात दर्शनासाठी गेले नाहीत. पण आम्ही त्यांच्या मतपेढीला घाबरत नाही, अशी टीका शाह यांनी केली.

### कळीचे मुद्दे आणि पृथ्वीराज बाबांच्या अपयशावर नेमके बोट

● भाजपा महायुतीचे उमेदवार अतुल भोसले यांनी यावेळी केवळ अडीच मिनिटांमध्ये संपूर्ण मतदारसंघाचा आढावा मांडला. प्रचार सभेमध्ये पुढे जाण्याची घाई असल्यामुळे अमित शहा यांनी त्यांना थोडक्यात भाषण करण्याची सूचना केली त्यावर अतुल बाबांनी कराडच्या एमआयडीसीला फाईव्ह स्टार एमआयडीसीची मान्यता द्यावी आणि लहान लहान सिंचन योजनाचे पुनर्गठण करावे तसेच गेल्या पन्नास वर्षापासून



अनेक कराडवासी यांना नसलेली पक्की घरे देण्यासाठी पंतप्रधान आवास योजनेची येथे अंमलबजावणी करावी असे नेमके मुद्दे मांडले. केंद्र सरकारच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या तीन कोटी घरांमध्ये कराडमधील मलकापूर आणि स्टेडियमच्या जवळील काही भागात ही अमलबंजावणी करावी अशी महत्वपूर्ण सूचना मांडली. अमित शहा यांनी त्यासाठी अनुमोदन दिले. ही मागणी मांडत असताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या बंगल्याच्याच शेजारी मोठी निर्वासितांचे वस्ती आहे. तेथील लोकांना अनेक वर्षांपासून पक्के घरे नाहीत. ही नेमकी दुखरी बाजू सांगत त्यांनी पृथ्वीराज चव्हाण यांच्या कार्यपद्धतीवर आणि निष्क्रिय राजकीय इतिहासावर नेमकेपणाने बोट ठेवले.

# फडणवीस यांच्याकडून बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान- राहुल गांधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राहुल गांधी लाल रंगाचे संविधान दाखवून शहरी नक्षलवादाला प्रोत्साहन देतात. देशात एकप्रकारे अराजकता परसवण्याचे काम राहुल आणि 'इंडिया' आघाडीचे नेते करत आहेत, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यांच्या टीकेला राहुल यांनी 'एक्स' या समाज माध्यमावर पोस्ट करत उत्तर दिले. महाराष्ट्रातील भाजपच्या माजी मुख्यमंत्र्यांच्या मते, बाबासाहेबांचे संविधान दाखवून जात जनगणनेसाठी आवाज उठवणे, ही नक्षलवादी कल्पना आहे. भाजपची ही विचारसरणी म्हणजे संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान आहे, असे राहुल म्हणाले. लोकसभा निवडणुकीत



महाराष्ट्रातील जनतेने संविधानासाठी लढून महाविकास आघाडीला मोठा विजय मिळवून दिला होता. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता हा बाबासाहेबांचा अपमान कधीही सहन करणार नाही. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही ते काँग्रेस आणि महाविकास आघाडीला समर्थन देतील आणि आपल्या संविधानावरील प्रत्येक हल्ल्याला पूर्ण ताकदीने उत्तर देऊन त्याचे रक्षण करतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

राहुल यांच्या नागपूरमधील संविधान सभेबाबत बोलताना फडणवीस यांनी महाविकास आघाडीला लक्ष्य केले होते. 'भारत जोडो' हा समूह तयार करण्यात आला आहे. या समूहामध्ये अनेक संघटना अतिशय डाव्या विचारांच्या आहेत. त्यांच्या कामाची पद्धत, ध्येय धोरणे ही अराजक पसरवणारी यंत्रणा आहे. एकीकडे राहुल एक पुस्तक आपल्याला दाखवतात. संविधानाचा सन्मानच केला पाहिजे; पण लाल संविधानच का? कोणाला तुम्ही इशारा देताय? लाल पुस्तक दाखवून कोणाला इशारा देताय? संविधानाचा अर्थ असतो ऑर्डर. तुम्ही अराजक पसरवत आहात,' असे फडणवीस म्हणाले होते.

# बदलापूरच्या 'त्या' शाळेत ब्लू फिल्म ; नाना पटोले यांचा गंभीर आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नांदेड :** बदलापूरच्या शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली. त्या प्रकरणाने संपूर्ण राज्यातील वातावरण ढवळून निघाले. आता या प्रकरणात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी खळबळजनक दावा केला आहे. त्यामुळे या प्रकरणाला पुन्हा एकदा नवे वळण मिळण्याची शक्यता आहे. बदलापूरच्या त्या शाळेत ब्ल्यू फिल्म बनवल्या जायच्या, असा आरोप त्यांनी केला. नांदेडमध्ये एका जाहीर सभेत ते बोलत होते. महायुती सरकारच्या काळातील राज्यातील परिस्थितीवर भाष्य करताना पटोले यांनी बदलापूरमधील घटनेचा उल्लेख केला. त्या शाळेत 'ब्ल्यू फिल्म' तयार केल्या जायच्या, अवयव विक्रीचे काम चालायचे,



असा गंभीर आरोप पटोले यांनी केला. 'ही शाळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आहे. या शाळेत लहान मुलींच्या अश्लील चित्रफिती तयार करण्याचे, अवयवांची विक्री करण्याचे उद्योग सुरू होते, असा आरोप त्यांनी केला. ती शाळा संघाशी संबंधित असल्यानेच सरकारने या शाळेवर मेहेरबानी केली, असे ते म्हणाले.

बदलापूरात चार-पाच वर्षांच्या मुलींवर अत्याचार झाले. दोनच नव्हे, तर असंख्य मुलींवर अत्याचार झाले. न्यायालयाने चौकशीचे आदेशदेखील दिले; पण शाळा संघाशी संबंधित असल्याने राज्य सरकारनं त्यांच्या संचालक मंडळावर कारवाई केली नाही. माहितीच्या अधिकारातून एका व्यक्तीने माहिती मागितली. त्या शाळेत ब्ल्यू फिल्म फिल्म, पिक्चर तयार करण्याचे, शरीराचे अवयव विकण्याशी संबंधित एक जनहित याचिका करण्यात आली आहे, असे पटोले नांदेडमधील भाषणात म्हणाले.

## » Selected

### अजितदादांच्या उमेदवारावर आचारसंहिता भंगाचा गुन्हा

**पुणे** : मावळ मतदारसंघात रात्री दहानंतर प्रचार सुरू ठेवल्याने मावळचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे उमेदवार आमदार सुनील शेळके आणि नामदेव दाभाडे यांच्यावर आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शिरगाव पोलिस ठाण्यात निवडणुक विभागाचे कर्मचारी दीपक भाऊराव राक्षे यांनी तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार, आमदार सुनील शेळके व नामदेव दाभाडे यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मतदानाच्या दिवशी शेअर बाजार बंद

**मुंबई** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यामुळे २० नोव्हेंबर रोजी शेअर बाजार बंद राहणार आहे. बीएसईदेखील या दिवशी सुट्टीची घोषणा करण्याची शक्यता आहे. कारण दोन्ही एक्सचेंज वेळ आणि सुट्ट्यांच्या बाबतीत एकत्रितपणे कार्य करतात. शनिवार आणि रविवारी एक्सचेंज बंद राहतील.

### विरारमध्ये दररोज पैशांचा पाऊस!

**मुंबई** : भुलेश्वर आणि शिवडीमध्ये आज सकाळी जवळपास चार ते पाच कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यात आता विरारची भर पडली आहे. विरारमध्ये आज दोन कोटी रुपये जप्त केल्याची माहिती मिळाली आहे. निवडणूक काळात वसई-विरार शहरात पैशांचा पाऊस सुरूच आहे. शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी विरारमध्ये दोन कोटी रुपयांची रोकड महापालिकेच्या भरारी पथकाने जप्त केली आहे. गुरूवारीदेखील नालासोपारा, मांडवी आणि मिरा रोड मध्ये ७ कोटी ८० लाखांची रोकड जप्त करण्यात आली होती. बँकेच्या एटीएम व्हॅनमधून हे बेहिशोबी पैसे नेण्यात येत होते.

### 'लाडकी बहीण'वरून संभाजीराजेंचा महायुती व आघाडीवर निशाणा

**कोल्हापूर** : महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीआधी लाडकी बहीण योजनेतून दीड हजार रुपये दिले. आता २१०० रूपये देणार म्हणत आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीने 3 हजार रूपये देण्याचे जाहीर केले आहे. सर्व काही खेळखंडोबा सुरू आहे. त्यांच्याकडे कोणतेही व्हिजन दिसत नाही. तुम्ही २०२९ आणि २०३४ ला काय देणार ? हे बोलत नाही. ते सोडून या दोन महिन्यात आम्ही काय देणार, हे ते बोलत आहेत, अशी टीका स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष व माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी महायुती आणि महाविकास आघाडीवर केली.

ते पुढे म्हणाले की, संत रामदास त्यांच्या ठिकाणी मोठे होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरु केवळ जिजामाता होत्या. समर्थ रामदास स्वामी यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सोबत जोडणे योग्य नाही, हे न पटणारे आहे. याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा काय बोलले आहेत. या संदर्भात मला कल्पना नाही. तिसऱ्या आघाडीतून आम्ही १२१ जागा लढवत आहोत. यात स्वराज्याच्या ३९ ते ४० जागा आहेत. ही लढाई प्रस्थापितांच्या विरोधात विस्थापितांची आहे. या 40 मध्ये आम्ही एकही प्रस्थापित उमेदवार घेतलेला नाही. कोणाला पाठिंबा देण्याचा प्रश्नच येत नाही, असे ते म्हणाले

# "फोडाफोडी करणाऱ्यांना घरी बसवा" राज ठाकरे यांची महायुतीवर टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** सध्या राज्यातील राज्यकर्ते आणि राजकारणी कसेही वागत आहेत. मतदारदेखील त्यांच्याकडे शांतपणे बघत आहेत. जोपर्यंत तुम्ही त्यांच्यात बदल करत नाही, त्यांना घरी बसवत नाही, तोपर्यंत विकास होत नाही. मागील पाच वर्षात या सर्व लोकांनी राजकारणात गोंधळ घातला. काही या पक्षातून त्या पक्षात गेले. काही पक्ष सोबत घेऊनच दुसरीकडे गेले. आम्ही हे सर्व बरोबर केले असल्याचा त्यांचा समज जनता जोपर्यंत चिडून, भडकवून दूर करत नाही, तोपर्यंत विकासाची स्वप्ने



विसरून जा, असा सल्ला महाराष्ट्र निर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी दिला. महायुतीवर टीका करताना जनतेलाही त्यांनी सुनावले.

मतदारांनी निवडून दिलेल्या नेत्यांनी काय केले? असा प्रश्न त्यांना विचारला जात नसल्याची खंत व्यक्त करून ते म्हणाले, की केवळ पर्यटनावर कोकणातील सिंधुदुर्गसह तीन जिल्हे हे अख्खा महाराष्ट्र पोसू शकतात. केवळ पर्यटन या विषयावर गोवा राज्य चालवले जात आहे. कोकणामध्ये कोणते उद्योग धंदे आणले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आता उद्योगधंदे आणू अशी ग्वाही विद्यमान आमदार, खासदार देतात. मग इतके वर्ष त्यांनी काय केले? असा प्रश्न त्यांना का विचारला जात नाही, असेदेखील राज म्हणाले आहे. कोकण इतका सुंदर करता येऊ शकतो, ते आतापर्यंत का झाले नाही? याचे कारण मतदारांनी त्याच त्याच लोकांना आणि त्याचत्याच पक्षांना निवडून दिले असल्याचे ते म्हणाले.

इथून आमदारांना आणि खासदार निवडून दिले, की ते दिल्लीत जाऊन काय करतात? कोणते प्रश्न मांडतात? कोकणातील आतापर्यंत कोणते प्रश्न त्यांनी दिल्लीत मांडले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## प्रचार रॅली...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पालघर :** मुरबे गावात प्रचार शिवसेनेच्या शिंदे गटाचे उमेदवार राजेंद्र गावित यांची रॅली सुरू असताना ग्रामस्थांनी काळे झेंडे दाखवत प्रचार रॅली रोखली. या वेळी गावित यांच्यासह महायुतीच्या धोरणांचा निषेध करण्यात आला.

# रोहित पवारांना ओबीसी संपवायचेत का ? रूपाली चाकणकर यांचा खडा सवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> " महाराष्ट्राच्या अनेक ओबीसी नेतृत्व बहुल असलेल्या मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने निवडून आपल्या सभा घेतल्या. आणि तिथून ओबीसी लीडरशिप संपविण्याचे कारस्थान रचले जात आहे. छगन भुजबळ यांच्यावर घाव घालत त्यांनी ही सुरुवात केली. रायगड मध्येही तोच प्रयोग केला. ओबीसी शक्ती संपविण्याचा एक अंतर्गत अजेंडा रोहित पवार राबवित आहेत"
>
> — **रूपाली चाकणकर,** अध्यक्षा, राज्य महिला आयोग, महराष्ट्र राज्य

**मुंबई :** महाराष्ट्रात जिथे जिथे ओबीसी समाजाचे मतदारसंघ आहेत तिथे तिथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने मेळावे घेऊन त्या उमेदवारांना विरोध करण्याचा एक छुपा अजेंडा राबविला जात आहे, असे निरीक्षण नोंदवत राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी ओबीसी समाजाच्या विरोधामध्ये एका सुडाच्या राजकारणाचा प्रवास सुरू होत असल्याचा घणाघाती आरोप केला.

चाकणकर यांनी सांगितले की, आज छगन भुजबळ यांच्या विरोधामध्ये मोठे नाट्य आरोप करून रोहित पवार यांनी ट्विट केले. हे ट्विट करत असताना छगन भुजबळ यांच्या तोंडी नसलेले विधाने घालत त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला.



महाराष्ट्रामध्ये येवला रायगड अशा अनेक ठिकाणी जेथे जेथे ओबीसी समाजाचे प्राबल्य आहे, तेथे मुद्दाम सभा घेऊन तिथल्या ओबीसी नेत्यांचे राजकारण संपविण्याचे षडयंत्र शरद पवार गटाने सुरू केले आहे. रोहित पवार हे त्याचे नेतृत्व करीत आहेत. रोहित पवार हे फेक नाट्य सेट करण्यामध्ये माहीर आहेत. कुठले तरी खोटे नाटे आरोप करायचे आणि तीच विचारसरणी पसरवायची यामध्ये त्याचा हातखंड आहे. त्यामुळे ईडीला घाबरून आम्ही महायुतीमध्ये गेलो अशा प्रकारचे विधान भुजबळ यांच्या तोंडी घालून त्याचा प्रचार करण्याचे काम ते सध्या करीत आहेत. मी या वक्तव्याचा तीव्र निषेध करते. छगन भुजबळ यांनी देखील त्यांच्यावरती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी मी करत आहे असेही शेवटी चाकणकर यांनी सांगितले.

# नवाब मलिक दाऊदचे साथीदार असू शकत नाहीत- अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अवघ्या १२ दिवसांवर येऊन ठेपली आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना रंगतो आहे. महाविकास आघाडीत शिवसेना (उद्धव ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार) आणि काँग्रेस असे तीन पक्ष आहेत. तर महायुतीत भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार ) असे तीन पक्ष आहेत. महायुतीतल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नवाब मलिक यांना तिकिट दिलं आहे. नवाब मलिक यांचा प्रचार करणार नाही अशी भूमिका देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंनी घेतली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी नवाब मलिकांवर दाऊदशी व्यवहार केल्याचे आरोप केले होते. आता अजित पवारांनी



मात्र नवाब मलिक दाऊदचे साथीदार असू शकत नाहीत असं म्हटलं आहे.

अजित पवार म्हणाले, हे बघा मी नवाब मलिक यांना मागची ३५ वर्षे ओळखतो. दाऊदची साथ ते देऊ शकत नाहीत. याआधी काही सेलिब्रिटींवरही दाऊदची साथ दिल्याचा आरोप झाला आहे. आरोप झाले आहेत, ते सिद्ध होईपर्यंत त्यांना दोषी ठरवणं हे काही योग्य नाही. असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे.

नवाब मलिकांनी कोट्यवधी रुपयांची जमीन केवळ ३० लाख रुपयांना विकत घेतली असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. १९९३ च्या बॉम्बस्फोटातील दोषी असलेला सरदार शाह वली खान या व्यक्तीकडून एका कंपनीच्या मार्फत नवाब मलिकांनी एलबीएस रोडवर जागा विकत घेतली आहे. सलीम पटेल हा दाऊदचा माणूस होता. याच सलीम पटेलकडून नवाब मलिकांनी जमीन विकत घेतली असा देवेंद्र फडवणीस यांनी आरोप केला होता.

## उद्धव ठाकरे यांची भाजप आणि शिंदे गटावर खरपूस टीका

# भगवा दरोडेखोरांच्या हातात शोभत नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बुलडाणा :** छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळे निर्माण केले होते. छत्रपती शिवरायांचा जो भगवा झेंडा आहे, तो मावळ्यांच्या हातात शोभतो. दरोडेखोरांच्या हातात शोभून दिसत नाही. आपल्या पक्षावर दरोडा घातला. चाळीस जणांची टोळी आली दरोडा घालून पक्ष चोरून नेला. आता म्हणत आहेत, की हा पक्ष आमचा आहे. गद्दारच आहेत ते. खोकेबाज आणि धोकेबाज आहेत, अशा शब्दांत शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिंदे गट आणि भाजपची पिसे काढली.

जयश्री शेळके यांच्या प्रचारार्थ



आज बुलडाण्यात ठाकरे यांनी सभा घेतली. या सभेत त्यांनी भाजप आणि शिंदे गटाचा चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा झेंडा मावळ्यांच्या हाती शोभून दिसतो दरोडेखोरांच्या नाही. मागच्या वेळी गद्दारांवर विश्वास ठेवला आणि चूक केली त्याबद्दल माफी मागतो. छत्रपती शिवरायांचा झेंडा घेऊन नाचवत आहेत, ते काही सगळेच मावळे नाहीत. गेल्या वेळी आपण चूक केली. मी निवडणुकीच्या प्रचारात फिरतो आहे, तर पाहिले की प्रत्येक ठिकाणी आपल्या विरोधात आपला गद्दार उभा राहिला आहे. साहजिकच आहे ही चूक माझी आहे कारण यांना तिकिट विश्वास ठेवून मी दिले होते. माझ्यावर विश्वास ठेवून तुम्ही त्या गद्दारांना निवडून दिले होते. आता त्या चुकीची पुनरावृत्ती करणार नाही.

पन्नास खोके आता नॉट ओके. आता यांनी एवढे कमावले आहे, की त्यांना हरवले, तरी काही फरक पडत नाही. एवढे त्यांनी कमावले आहे, असा आरोप ठाकरे यांनी केला. ५० खोके तर आता सुट्टे पैसे झाले आहेत, असे ते म्हणाले. भाजपवाल्यांची आणि मोदी यांची आम्हाला कमाल वाटते. चोर-दरोडेखोरांना घेऊन आमच्यावर कसे काय चालून येत आहात? असाही प्रश्न त्यांनी विचारला.

### तंगडे धरून फेकून देऊ

● हिंदुत्वाचा भ्रम तुम्ही निर्माण केलात. वर गेल्यानंतर आम्हाला लाथा घालू लागलात? ठीक आहे तुमचे तंगडे धरून तुम्हाला महाराष्ट्राच्या बाहेर भिरकावून दिले नाही, तर मी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय हे बोलणार नाही,' असा इशारा ठाकरे यांनी दिला.

#रा

## इंदापूर मतदारसंघाकडे तालुक्याचे लक्ष

# तिरंगी लढतीत कोण बाजी मारणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भवानीनगर :** इंदापूर तालुक्यामध्ये विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, या चुरशीच्या तिरंगी लढतीत कोण बाजी मारणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे.

इंदापूर

इंदापूर तालुक्यातील विधानसभेच्या निवडणुकीच्या तिरंगी लढतीमध्ये प्रवीण माने यांच्या कोऱ्या पाटीकडे अनेक मतदारांचे लक्ष वेधले आहे. इंदापूर तालुक्यामध्ये विधानसभेच्या निवडणुकीसाठी २४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून, त्यामध्ये दत्तात्रय भरणे, हर्षवर्धन पाटील व प्रवीण माने या तिघांमध्ये प्रमुख लढत होत आहे.

या तिन्ही उमेदवारांनी मोटार सायकलच्या रॅली काढून निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडवण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषदेच्या गटागटातून प्रत्येक गावामध्ये वाड्यावस्त्यांवर रॅलीच्या माध्यमातून पोचून गतिमान प्रचार करण्याचा प्रयत्न उमेदवार करीत आहेत. सुरुवातीला प्रवीण माने यांनी मोटार सायकल रॅली काढून प्रचाराला सुरुवात केली. त्यानंतर, हर्षवर्धन पाटील यांनी तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये रॅली काढण्यास सुरुवात केली आहे. नुकतीच सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटांमध्ये रॅली काढून पाटील यांनी गावांमध्ये घोंगडी बैठका घेण्यास सुरुवात केली आहे, तर दत्तात्रय भरणे यांनी तालुक्यातील नेतेमंडळींचा आपल्या पक्षांमध्ये जाहीर प्रवेश घेऊन प्रचारात आघाडी घेतली आहे.


दत्तात्रय भरणे प्रवीण माने हर्षवर्धन पाटील

सर्व उमेदवारांनी तालुक्याच्या पश्चिम भागामध्ये हाऊस टू हाऊस प्रचारावर भर दिला असून, प्रत्येक उमेदवारांचे कार्यकर्ते ग्रामस्थांच्या घरापर्यंत जाऊन निवडणुकीच्या प्रचाराचे पत्रक देऊन प्रचार करीत आहेत. घोंगडी बैठकीच्या माध्यमातून आरोप प्रत्यारोप सुरू झाले असून, कार्यकर्ते जोरदार आरोप प्रत्यारोप करीत आहेत. त्यामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. तिन्ही उमेदवारांचा जोरदार प्रचार सुरू झाल्यामुळे कोणता उमेदवार निवडून येईल, याबाबत आडाखे बांधले जाऊ लागले आहेत.

उमेदवारांनी प्रचार दौऱ्यामध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढवला असून, युवक वर्ग देखील प्रचारामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहे. ठीकठिकाणी तसेच चहाच्या हॉटेलमधून युवक वर्गांमध्ये आपआपल्या उमेदवारांविषयी जोरदार चर्चा करण्यात येत आहे. यात आपलाच उमेदवार कसा निवडून येणार, हे बोलून दाखवले जात आहे. विरोधी गटाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांविषयी काही वक्तव्य केल्यास, त्यास थेट उत्तर देण्यास युवक वर्ग कमी पडत नाही. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीप्रमाणे सध्या विधानसभेच्या निवडणुकीची परिस्थिती निर्माण झाली आहे. कार्यकर्त्यांमध्ये अत्यंत चुरशीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

दत्तात्रय भरणे, हर्षवर्धन पाटील व प्रवीण माने या तिन्ही उमेदवारांचे कार्यकर्ते निवडणुकीच्या प्रचारामध्ये जोरदार सक्रिय झालेले दिसत असून, उर्वरित २१ उमेदवार देखील निवडणुकीच्या प्रचाराचे नियोजन करीत आहेत. तालुक्यामध्ये चुरशीची तिरंगी लढत होत असल्यामुळे आता हे २१ उमेदवार कोणाला फटका देतात, याकडेही लक्ष आहे. या निवडणुकीत आजी नको व माजी नको अशी भूमिका काही लोकांनी घेतली असून, कोऱ्या पाटीच्या प्रवीण माने यांच्याकडे त्यांनी धाव घेतली आहे, असे मानले जाते.

# दिलीप मोहिते पाटील यांना मंत्रीपद

## अजित पवार यांचे आश्वासन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** चाकण शहरात जिल्हा रुग्णालय, नर्सिंग कॉलेज,पाणी पुरवठा योजना, अंतर्गत रस्ते, औद्योगिक वसाहतीतील कामगारांसाठी हॉस्पिटल यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच प्रत्यक्षात कामे देखील सुरु झाली आहेत. ही सर्व कामे आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्यामुळेच झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलीप मोहिते पाटील यांना तुम्ही निवडून द्या मी त्यांना मंत्री करतो, असे जाहीरसभेत सांगितले आहे.

खेड




तालुक्याला चालून आलेली मंत्रिपदाची संधी तसेच चाकणचा पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासारखा विकास करण्यासाठी आम्ही दिलीप आण्णासोबतच असल्याची ग्वाही चाकण येथील नागरिकांनी दिली. खेड आळंदी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार दिलीप मोहिते पाटील यांच्या प्रचाराच्या निमित्ताने गाठीभेटींना चाकण परिसरात उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

चाकण शहरातील व्यापारी, व्यवसायिक, ग्रामस्थ यांनी महायुतीचे उमेदवार दिलीप मोहिते पाटील यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. मोहिते पाटील यांना चौथ्यांदा आमदार करण्याचा त्यांनी निर्धार केला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर, भाजपा जिल्हाध्यक्ष शांताराम भोसले, शिवसेना जिल्हा समन्वयक अक्षय जाधव यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच चाकण शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी प्रचाराच्या निमित्ताने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील उपबाजार आवारातील व्यापारी, आडते, मापाडी शेतकरी याच्याशी संवाद साधला. त्यांनी देखील सोबत असल्याची ग्वाही दिली.

# दिलीप वळसे पाटील यांच्या विजयासाठी श्रीसिद्धेश्वराला साकडे



**साकडे :** आंबेगाव शिरुर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांच्या अष्टविजयासाठी पारगाव ग्रामस्थांनी आळंदीत सिद्धेश्वराला साकडे घातले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** आंबेगाव - शिरूर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांचा या निवडणुकीत अष्टविजय व्हावा, यासाठी पारगाव (ता. आंबेगाव ) गावातील ग्रामस्थांनी श्रीक्षेत्र आळंदी येथे जाऊन श्रीसिद्धेश्वराला साकडे घातले.

आंबेगाव

दिलीप वळसे पाटील हे गेले ३५ वर्षे मतदारसंघाचे नेतृत्व करत असून, तालुक्यात त्यांनी कोट्यावधी रुपयांची विकास कामे मार्गी लावली आहेत. त्यांनी केलेल्या विकासकामांचा पुढील पिढ्यांना देखील उपयोग होणार आहे. त्यामुळे पुन्हा वळसे पाटील यांच्याकडेच तालुक्याचे नेतृत्व जावे, या भावनेतून पारगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर अस्वारे, राजूशेठ ढोबळे, हभप निवृती महाराज लोखंडे व माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी श्रीक्षेत्र आळंदी येथे जाऊन श्री सिद्धेश्वराच्या मंदिरात जाऊन अभिषेक केला. तसेच वळसे पाटील निवडून येण्यासाठी साकडे घातले. निवडून आल्यानंतर आपण वळसे पाटील यांना श्री संत ज्ञानेश्वर महाराज तसेच सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी आळंदीला घेऊन येऊ, असे विठ्ठल ढोबळे यांनी सांगितले.

Select RURAL

rashtrasanchar.com

## मोहटादेवी संस्थानकडून श्रीखंडेरायाला मानाची वस्त्रे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील श्री जगदंबा देवी संस्थान मोहटा ट्रस्टच्या वतीने श्रीक्षेत्र जेजुरी येथील खंडेरायाला मानाचे वस्त्रे अर्पण करण्यात करण्यात आली. श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटेचे (मोहटादेवी संस्थान) विश्वस्त डॉ. श्रीधर देशमुख यांनी सर्व विश्वस्त मंडळाच्या वतीने भगवती म्हाळसादेवीसाठी पैठणी व खंडेरायाचे साठी महावस्त्र, महाप्रसाद अर्पण केले.



दीपावलीनिमित्त मोहटे ट्रस्टचे विश्वस्त डॉक्टर श्रीधर देशमुख यांनी सहकुटुंब विधिवत खंडोबा देवाला अभिषेक पूजा केली. यावेळी राष्ट्रीय युवा पुरस्कार विजेते रवी घाटे, मनिषा खेडेकर, श्रीकृष्ण बराटे, डॉ. ज्योती देशमुख, जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त डॉ राजेंद्र खेडेकर, पदाधिकारी गणेश डिखळे, दादा खोमणे, राहुल झगडे आदी उपस्थित होते.

राज्यातील मंदिराला मंदिर जोडण्याचा हा एक अभिनव संकल्प घेऊन हा उपक्रम सुरू झालेला आहे. श्री मार्तंड देव संस्थांच्या वतीने यापूर्वीच काही मंदिरांची जोडणी सुरू आहे. असे श्री मार्तंड देव संस्थांचे विश्वस्त डॉक्टर राजेंद्र खेडेकर यांनी सांगितले.

जेजुरी गडावर सुरू असलेले विकासकामे, गर्दीचे नियोजन,स्वच्छ अन्नछत्र, तसेच जेजुरी देवसंस्थानच्या वतीने सुरू असलेले डायलिसिस सेंटर ची डॉ श्रीधर देशमुख यांनी पाहणी करून विकास कामांचे कौतुक केले. व दरवर्षी मोहाटे देवसंस्थानच्या वतीने खंडोबा देवाला वस्त्रे अर्पण करण्याचा धार्मिक विधी सुरू राहील असे सांगितले.

## संत नामदेव महाराज यात्रेचे बुधवारी आगमन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** भागवत धर्म प्रसारक मंडळ, पालखी सोहळा पत्रकार संघ, नामदेव समाजोन्नती परिषद व समस्थ नामदेव शिंपी समाजाच्या वतीने आयोजित केलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या संत नामदेव महाराज रथ व सायकल यात्रेचे बुधवारी (दि . १३) रोजी दुपारी ३ वाजता सासवड येथे आगमन होणार असल्याची माहिती भागवत धर्म प्रसारक मंडळाचे खजिनदार मनोज मांढरे व सासवड शिंपी समाज मंदिर अध्यक्ष गोविंद बोत्रे यांनी दिली.

संत ज्ञानदेव व संत नामदेव महाराज यांनी १२ व्या शतकात उत्तर भारतात जावुन श्री विठ्ठल भक्तीचा व भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला आहे. संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची घुमाण येथे वस्त्र समाधी आहे. मुगल सम्राट मोहंमद तुघलक यांचे नातु फिरोजशा तुघलक यांनी घुमाण येथे संत नामदेव महाराज यांचे भव्यदिव्य मंदिर उभारले आहे. हा विठ्ठल भक्तीचा व शांती, समता व बंधूता हा भागवत धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी प्रतिवर्षी ही यात्रा काढली जाते. यात्रेचे हे तिसरे वर्ष असून यंदाच्या वर्षी यात्रेत १५० सायकल यात्री व भाविक सहभागी झाले आहेत. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा व पंजाब राज्यातून प्रवास करीत ही यात्रा सोमवारी (दि . २ डिसेंबर) रोजी चंदिगड पंजाब येथे पोहोचणार आहे. पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया हे पंजाब राज्यात राजभवन येथे या यात्रेचे स्वागत करणार आहेत

» Selected

## ३ आरोपींना जामीनाअभावी कारावास

**जेजुरी :** सामाजिक शांतता भंग होवू नये, यासाठी जेजुरी पोलीस स्टेशनच्या वतीने, जेजुरी परिसरातील तीन आरोपींवर कारावासाची कारवाई करण्यात यावी, असा प्रस्ताव बारामती अप्पर पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आला होता. त्या नुसार तिघा आरोपींना जामीन अभावी येरवडा कारागृहात पाठविण्यात आले आहे, अशी माहिती जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी दिली. केतन उर्फ मोत्या बाळासाहेब सस्ते, विवेक ऊर्फ गोट्या तानाजी बहिरट, जीवन उर्फ पिंट्या अशोक देवकर, अशी या आरोपींची नावे आहेत. जेजुरी पोलीस स्टेशनच्या वतीने भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १२९ प्रमाणे जेजुरी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी दीपक वाकचौरे यांनी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांच्याकडे या तिघा आरोपींच्या गैरकृत्याना आळा बसावा म्हणून प्रतिबंधात्मक कारवाई चा प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

## उत्तमराव चौधरी यांचे निधन

**उरुळी कांचन :** उरुळी कांचन (ता. हवेली) येथील सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव बबन चौधरी यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सूना, दोन बंधू, पुतणे, नातु असा मोठा परिवार आहे. उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान गुप्रचे प्रमुख तथा बांधकाम व्यावसायिक संतोष चौधरी यांचे ते चुलते होत.

## बिबटला जीवदान

**म्हाळुंगे :** खेड तालुक्यातील सुपे सातकरवाडी या ठिकाणी गावकी च्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीत बिबट्या पडल्याचे नागरिकांच्या लक्षात आल्याने सुपे गावच्या सरपंच व पोलीस पाटील यांनी चाकण वनविभाग यांना माहिती दिली. वन परिशेत्र अधिकारी संतोष कंक व चाकण रेस्क्यू टीम यांनी लगेच धाव घेतली व एक ते दीड वर्षाच्या बिबट्याला जीवदान दिले. यावेळी संतोष कंक यांच्या मार्गदर्शनाखाली वन अधिकारी यांनी मोलाचे योगदान देऊन त्या बछड्याला जीवदान दिले.

## शिल्लक बटाटे उकरून कुटूंबांचा उदरनिर्वाह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बटाटा काढणीची कामे जोरात सुरू आहेत. आता बटाटे काढणी झालेल्या शेतांमध्ये जमिनीत शिल्लक राहिलेले बटाटे उकरून ते बटाटे आजूबाजूच्या गावांमध्ये विकून अनेक कुटूंबांचा उदरनिर्वाह सुरु आहे. यातून महीला, पुरुषांना चांगला रोजगार मिळत आहे.

**बटाट्यांना गृहीणींकडून मोठी मागणी**

- जमिनीत उरलेले हे बटाटे खराब नसतात. बाजारपेठांच्या तुलनेत हे बटाटे स्वस्त मिळत असल्याने गृहिणींकडून मोठी मागणी आहे. या गृहीणी बटाटे मोठ्या प्रमाणात खरेदी करून वर्षभर पुरेल इतके वेफर्स, बटाट्याचा कीस हे पदार्थ बनवून ठेवतात.

तालुक्याच्या पूर्व भागात थोरांदळे, नागापूर, रांजणी या गावांमध्ये बटाटा काढणीची कामे वेगात सुरू आहेत. दरवर्षी या भागात बटाटा काढणीच्या वेळी फासे पारधी, कातकरी, ठाकर, भिल्ल या जमातींमधील कुटुंबे बटाटे गोळा करण्याचे काम करतात. यातून त्यांना चांगले पैसे देखील मिळतात. या जमातींमधील महिला, पुरुष, मुले बटाटे काढलेल्या शेतांमध्ये जाऊन जमिनीत उरलेले बटाटे गोळा करतात. अलिकडे ट्रॅक्टरच्या सहाय्याने बटाटे काढणी केली जाते. त्यामुळे जमिनीत जास्त बटाटे शिल्लक राहतात. हे बटाटे गोळा करून आजूबाजूच्या गावांमध्ये ग्राहकांना विकले जातात. बटाट्याला बाजारात जो दर मिळतो, त्यापेक्षा कमी दराने हे बटाटे घरपोच ग्राहकांना मिळतात.

## आरोपीला अटक

**राजगुरूनगर :** येथील पानमळा परिसरातील विठठल गोरख सांडभोर याने गाडीवर दगड मारले या कारणावरून भगवान हरिभाऊ सांडभोर (वय ५२) यास पोटात लाथाबुक्यांनी मारहाण केली. भगवान हे अंध व शाररिक दुर्बल होते. त्यांना उलट्या होऊन ते गतप्राण झाले. यानंतर आरोपी विठ्ठल सांडभोर फरार झाला होता. याप्रकरणी वामन सांडभोर यांनी खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तपास अधिकारी स्नेहल गुरव यांच्या पथकाने गुरुवारी (दि. ७) आरोपीस अटक केली.

# राजगुरुनगर बँकेच्या कडूस शाखेचा वर्धापन दिन उत्साहात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** "खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील अनेक तरुणांच्या उद्योग व रोजगार उभारणीसाठी राजगुरुनगर सहकारी बँकेच्या कडूस शाखेचे मोठे योगदान आहे. बँकेच्या उद्योग व्यवसायासाठी अनुदान पात्र कर्ज योजनेचा जास्तीत जास्त नवउद्योजकांनी लाभ घ्यावा," असे आवाहन बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल यांनी केले. राजगुरुनगर सहकारी बँकेच्या खेड तालुक्यातील कडूस शाखेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी बँकेचे अध्यक्ष ओसवाल यांनी बँकेचे ग्राहक, सभासद व कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना ओसवाल बोलत होते. यावेळी बँकेचे संचालक किरण आहेर, विजया शिंदे, समीर आहेर, विजय डोळस, दत्ता भेगडे, सुरेश कौदरे, सचिन मांजरे, सरपंच हेमलता खळदकर, विविध कार्यकारी सोसायटीचे उपाध्यक्ष अशोक बंदावणे, डायनॅमिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या व्यवस्थापिका जयश्री गारगोटे, समीर कालेकर व बँकेचे वरिष्ठ अधिकारी अमृत टाकळकर, शंकर कोल्हे, दीपक तनपुरे यांच्यासह ग्राहक, सभासद व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

ओसवाल म्हणाले की, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत उभारण्यात येणाऱ्या उद्योग व्यवसायासाठी अनुदान पात्र कर्ज योजना सुरू करणारी जिल्ह्यातील पहिली नागरी सहकारी बँक म्हणून राजगुरुनगर सहकारी बँकेची ओळख आहे. पश्चिम भागातील अनेक होतकरू नवउद्योजकांना याचा लाभ मिळवून दिला आहे. अजूनही ग्रामीण भागातील दूध उत्पादक शेतकरी व गायी, म्हशी व शेळ्या पालक शेतकरी, तसेच नवीन व्यवसाय उभारणाऱ्या इच्छुक होतकरू तरुणांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अशा नवउद्योजक, व्यावसायिक व शेतकऱ्यांना बँकेच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.

### साखर कारखान्यांच्या धोरणाने शेतकरी बांधव पिकापासून वंचित

# गाळप हंगाम लांबल्याने गहू हरभरा नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भवानीनगर :** यावर्षी साखर कारखान्यांचा गाळप हंगाम एक महिन्याने लांबल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना गहू हरभऱ्याच्या पिकापासून वंचित राहावे लागणार आहे.

यावर्षी साखर कारखान्यांचा गाळप हंगाम दरवर्षीपेक्षा एक महिना उशिराने सुरू होत आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना गहू हरभऱ्याचे पीक घेता येणार नाही. गहू हरभऱ्याच्या पिकाला थंडीची आवश्यकता असते. त्यामुळे साखर कारखान्याचा गाळप हंगाम एक महिना उशिराने सुरू झाल्यामुळे गाळप हंगाम मार्चऐवजी एप्रिलपर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे. सर्वसाधारणपणे साखर कारखान्यांचा गाळप हंगाम एक नोव्हेंबरला सुरू होतो. गेल्या वर्षीच्या दुष्काळी परिस्थितीमुळे साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात उसाची उपलब्धता कमी आहे, त्यामुळे यावर्षी उसाची कमतरता लक्षात घेऊन मंत्री समितीने १५ नोव्हेंबर पासून, साखर कारखान्यांना गाळप हंगाम सुरू करण्याची परवानगी दिली. मात्र, विधानसभेची निवडणूक सुरू असल्यामुळे व विधानसभेच्या निवडणुकीचे मतदान २० नोव्हेंबरला होणार असल्याने, बहुतांश साखर कारखान्यांवर ऊस तोडणी करणारे मजूर येण्यास विलंब झालेला आहे. ऊस तोडणी करणारे मजूर मतदानामुळे कारखान्यांवर दाखल होऊ शकलेले नाहीत. काही साखर कारखान्यांवर मजूर आलेले आहेत. परंतु मतदानामुळे हे मजूर पुन्हा २० नोव्हेंबरला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आपआपल्या तालुक्यामध्ये गावामध्ये जाणार आहेत. त्यामुळे बहुतांश साखर कारखान्यांचा गाळप हंगाम वेळेत सुरू होणार नाही. अनेक साखर कारखान्यांवर २० नोव्हेंबर नंतरच ऊस तोडणी करण्यासाठी मजूर दाखल होणार आहेत.

साखर कारखान्याचा गाळप हंगाम पूर्ण क्षमतेने सुरू होण्यासाठी एक डिसेंबर उजाडणार आहे. १ नोव्हेंबर ते १ डिसेंबर असा एक महिन्यांनी साखर कारखान्यांचा गाळप हंगाम यावर्षी पुढे जात आहे. १ नोव्हेंबरला साखर कारखाने सुरू झाल्यानंतर, शेतकरी शेतातील उसाची तोडणी झाल्यानंतर, लगेच गहू हरभऱ्याची पिके घेतात. या काळामध्ये थंडीची सुरुवात होत असल्यामुळे त्याचा पिकांना देखील चांगला फायदा होतो. मात्र, यावर्षी नोव्हेंबर मध्ये तुटणारा ऊस गाळप हंगाम लांबल्याने आता डिसेंबर मध्ये तुटणार आहे.




# बटेंगे तो कटेंगे चालणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती:** विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीत अजित पवारांचे सूर बदलले दिसून येत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ महाराष्ट्रात प्रचार सभा घेत आहेत. मात्र, बारामतीत मला कुणाची सभा नको, असे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी थेट सांगितले आहे. तसेच योगी आदित्यनाथ यांच्या बटेंगे तो कटेंगे, या घोषणेला महाराष्ट्रातील जनता स्वीकारणार नाही, असेही रोखठोक प्रतिपादन अजित पवार यांनी केले आहे.

बारामती

महाराष्ट्र हा शिव, शाहू, फुले आंबेडकर यांचा आहे. तुम्ही इतर राज्यांची तुलना महाराष्ट्राशी करू नका. महाराष्ट्रातल्या लोकांना हे अजिबात आवडत नाही. महाराष्ट्रातील लोकांनी सातत्याने जातीय सलोखा ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे बाहेरचे लोक येतात, त्यांचा विचार करून बोलून जातात. परंतु महाराष्ट्रातील लोकांनी हे कदापि मान्य केले नाही, हा आजवरचा महाराष्ट्रातील निवडणुकांचा इतिहास आहे, असे अजित पवारांनी सांगत, योगी आदित्यनाथ यांच्या बटेंगे तो कटेंगे या घोषणेबाबत स्पष्ट केले.

## बहुमत नसेल तर नवी समीकरणे

● निकालानंतर पुढचे काही सांगणे आता कठीण आहे. एका बाजूला आघाडी, दुसऱ्या बाजूला युती आहे. दोन्हीकडे ३-३ पक्ष आहेत. उद्या आघाडी सरकार येते की युती सरकार हे थोडावेळ बाजूला ठेवू, पण प्रत्येक पक्षाचे किती आमदार निवडून येतील हे पाहावे लागेल. त्यानंतर त्याचे खरे गणित जुळवले जाईल. त्यात कदाचित निवडणुकीच्या निकालानंतर काही समीकरणे बदलूही शकतात. निकालानंतर बहुमताचे गणित जुळत नसेल तर सरकार आणण्यासाठी गणित जुळवावे लागेलच. काही ना काही करावे लागेल. ६ पक्ष आहेत. केवळ २-३ पक्ष नाहीत. त्यामुळे ६ पक्षांचे गणित जुळवण्यासाठी भरपूर वाव आहे, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिलीप वळसे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केले आहे.



# कलमोडीचे काम निवडणूकीनंतर

## दिलीप वळसे पाटील यांचे आश्वासन



**पुणे :** सातगाव पठार भागातील कलमोडी प्रकल्प सुरू होण्यास आता काही अडचणी राहील्या नाहीत. कलमोडी प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देखील मिळाली आहे. निवडणुकीनंतर या प्रकल्पाचे काम सुरू होऊन सातगाव पठारावरील गावांमधील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास आंबेगाव - शिरूर विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केला.

आंबेगाव

सातगाव पठार भागातील पेठ, कारेगाव, भावडी, पारगाव तर्फे खेड आदी गावांमध्ये आंबेगाव शिरूर विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांनी गावभेट दौरा करून मतदारांशी संवाद साधला. यावेळी कोपरासभेत ते बोलत होते. याप्रसंगी माजी खासदार म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, भाजपाचे जिल्हा संपर्कप्रमुख जयसिंग एरंडे, अरुण गिरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सचिन पानसरे, शरद सहकारी बँकेचे संचालक संतोष धुमाळ, उद्योजक भाऊसाहेब सावंत, भाजपाचे डॉ. ताराचंद कराळे, भावडीच्या सरपंच कमल कातळे, उपसरपंच सोपान काळे, पारगावच्या सरपंच नंदा पानसरे, पेठचे सरपंच संजय पवळे, अशोक बाजारे,शिवाजीराव मोरे, जयसिंग घेवडे, सुशांत नवले, रमेश सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

दिलीप वळसे पाटील म्हणाले की, गेली ३५ वर्षे तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना अनेक मंत्री पदांवर देखील मला संधी मिळाली. त्यामुळे राज्याचे प्रश्न सोडवत असताना, मी मतदारसंघाकडे दुर्लक्ष केले नाही. या भागात कार्यक्रमांमध्ये, सुखदुःखांच्या कार्यक्रमात मला सहभागी होता आले नाही, तरीदेखील मला या भागातील प्रश्नांची जाण असतेच. त्या दृष्टीने मी काम करतो. या भागातील सौरंग्या रस्त्याच्या दुरुस्ती कामासाठी दहा लाख रुपये मंजूर झाले आहेत. हा रस्ता अधिक चांगला होण्यासाठी मुख्यमंत्री रस्ते योजनेतून एक कोटी रुपये मंजूर झाले आहेत. निवडणुकीनंतर या कामाला सुरुवात होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

### डिंभे धरण बोगद्याला वळसे पाटील यांच्यामुळेच स्थगिती

● दिलीप वळसे पाटील यांनी आंबेगाव शिरूर तालुक्याचे पाणी शाबूत राहावे, यासाठी डिंभे धरणाच्या बोगद्याला कडाडून विरोध केला. त्यानंतर सातत्याने उपमुख्यमंत्री व पाटबंधारेमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, अधिकाऱ्यांशी यांच्याशी बैठका घेऊन डिंभे धरणाच्या बोगद्याला स्थगिती आणली. याचे श्रेय पूर्णपणे वळसे पाटील यांनाच जाते.



# दादांचे काम जनतेच्या समोर

## खासदार सुनेत्रा पवार यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती:** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे काम जनतेच्या समोर असून, ही आख्यायिका नाही, तर वस्तुस्थिती आहे. प्रत्येकाला माहिती आहे की, बारामतीत काय घडले आहे. तसेच प्रत्येकाच्या आयुष्यात त्याचा प्रभाव काय पडला, हेही जनतेला माहीत आहे. त्यामुळेच, आपल्याला काय करायचे आहे, हे बारामतीकरांना नेमके माहिती असल्याचा दावा खासदार सुनेत्रा पवार यांनी केला. विधानसभा निवडणूक पवार कुटुंबियांच्या भोवतीच फिरत आहे का, या प्रश्नाला उत्तर देताना त्या बालत होत्या.



बारामती

उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विरोधात आजवर जे जे उमेदवार उभे राहिले त्यांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. आता काय होईल, या प्रश्नावर खा. सुनेत्रा पवार म्हणाल्या की, याबाबत बारामतीकर ठरवतील काय करायचे ते..! याबाबतचा सर्व निर्णय बारामतीकरांचा आहे. तसेच विरोधकांकडून भावनिकतेचा मुद्दा उपस्थित केला जात असून, बारामतीची जनता खूप हुशार आहे. ती मतदानातून आपल्याला दाखवून देईल, असा दावाही त्यांनी केला. सुनेत्रा पवार या काही दिवसांपासून अजित पवार यांच्या प्रचारासाठी बारामती तालुक्यातील गावोगावी फिरत आहेत. आतापर्यंत त्यांनी ४५ गावांचा दौरा केला आहे. बारामती तालुक्यातील जनता हुशार असून, ती मतदानातून दादांचे काम दाखवून देईल, अशा शब्दांत त्यांनी अजित पवार यांच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला.

### लाडकी बहीण योजनेचा फायदा

● गेले २० दिवस मी प्रचार करते आहे. जनतेचा उदंड प्रतिसाद आहे. लाडकी बहीण योजनेचाही मोठा फायदा या निवडणुकीत दिसून येईल. गेली ३५ वर्ष मी स्वतः उमेदवार नसताना किंवा कोणताही उमेदवार असला तरी प्रचार करत होते. त्यामुळे मला प्रचाराचा अनुभव आहे.

# सदाभाऊ खोतांनी माफी मागावी

## हर्षवर्धन पाटील यांची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** महायुतीचे नेते सदाभाऊ खोत यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर खालच्या पातळीवर केलेल्या टीकेला माजी मंत्री व महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटलांनी टीका केली. हर्षवर्धन पाटील बारामतीच्या दौऱ्यावर आले होते, यावेळी त्यांनी पत्रकारांची संवाद साधला.

इंदापूर

माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी शरद पवार यांच्याबद्दल खालच्या पातळीवर वक्तव्य केले आहे, या घटनेचा मी तीव्र शब्दात निषेध व धिक्कार करतो. सदाभाऊ खोत यांनी शरद पवार यांची तसेच राज्याची माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. एखाद्या व्यक्तीबद्दल इतक्या खालच्या पातळीवर जाऊन बोलणे... तेही ऐन निवडणुकीच्या तोंडावर... मला असे वाटते की यामागे काहीतरी षडयंत्र असू शकते. याचा बोलवता धनी दुसरा कोणी आहे का..? असा प्रश्न पाटील यांनी उपस्थित केला.

लोकशाहीत वेगवेगळ्या प्रकारे टीका होऊ शकतात. मात्र पवार साहेबांसारख्या नेत्यावर बोलणे, हे वैचारिक दिवाळखोरीचे लक्षण आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत इंदापुरातील निमगाव केतकी येथे अनेकांनी अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीत प्रवेश केला. या प्रवेशात महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांचे मामा आप्पासाहेब जगदाळे यांनीही अजित पवारांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला. याबाबत विचारले असता पाटील म्हणाले की, माझ्या सत्तेच्या काळात ऐन निवडणुकीच्या तोंडावर काही ठराविक कार्यकर्त्यांना उचलून आणले, त्यांना पद दिली. हे सगळे दिल्यानंतर ऐन निवडणुकीच्या तोंडावर सोडून जाणे, हे चिंताजनक आहे.



# युवा संवाद अभियानाला उत्स्फुर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी:** बंधुनो-भगिनींनो आपले वळसे पाटील साहेब आठव्यांदा विधानसभेसाठी उभे आहेत. वळसे पाटील साहेबांचे कार्यकर्तृत्व तुम्हाला सांगायला नको, येत्या २० तारखेला होणाऱ्या निवडणुकीत साहेबांना आठव्यांदा विधानसभेत भरघोस मतांनी पाठवा, असे आवाहन राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेच्या संचालिका व सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या कन्या पूर्वाताई वळसे पाटील या आंबेगाव तालुक्यात खेडोपाडी जाऊन युवक युवतींना व मतदारांना करत आहेत. त्यांच्या या युवा संवाद अभियानाला तालुक्यात मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

सकाळीच नऊ वाजता प्रत्येक खेड्यात पुर्वाताई आपल्या सहकाऱ्यांसोबत हजर होतात. अतिशय नम्रतेने दोन्ही हात जोडत, त्यांचा खेड्यातल्या दौरा सुरू होतो. त्यांचे सहकारी आबालवृद्धांना पूर्वा ताई आल्यात, असे पुढे जाऊन सांगतात. महिला हातातील काम ठेवून औत्स्युक्याने त्या बाहेर येतात. अतिशय आनंदाने महिला पुर्वाताईच्या डोक्यावरून हात फिरवतात. त्यांना औक्षण करतात, तेवढ्याच आदबीने व तत्परतेने पूर्वाताई त्या ज्येष्ठांच्या पायाला वाकून हात लावून त्यांचे आशीर्वाद घेतात. या खेड्यापाड्यातल्या महिलांना अप्रूप वाटते की, राजाची लेक आमच्या घरापर्यंत आली. साखर देऊन त्या पूर्वा ताईंचे तोंड गोड करतात. १९९० पूर्वीचा दुष्काळी तालुका कसा होता व साहेब आमदार झाल्यावर त्यांनी कसा तालुक्यात बदल केला, हे पूर्वा ताई सांगतात.



# शिरूर, जुन्नर मतदारसंघात एक नवा उत्साह

## आपला माणूस माऊली कटके

शिरूर

### उरुळी कांचन



शिरूर-हवेली विधानसभा निवडणुकीत एक नवा रंग आणि जोश दिसू लागला आहे. या वेळी पक्ष, प्रचारधोरणे किंवा साधारण राजकीय समीकरणं बाजूला ठेवून, मतदार आपला माणूस शोधत आहेत. या बदलत्या संकल्पनेचे केंद्रस्थान आहे ते म्हणजे माऊली आबा कटके. 'आपला माणूस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माऊली कटके यांच्याभोवती तरुणाई, महिलावर्ग आणि सर्वसामान्य जनता एकजूट झाली आहे. माऊली कटके यांनी ज्या प्रकारे सामाजिक नाळ सामान्य जनतेशी घट्ट जोडली, त्यातून लोकांना ते सहज उपलब्ध होत आहेत. साध्या वागण्या-बोलण्याने, सहजपणे लोकांमध्ये मिसळण्याच्या पद्धतीमुळे जनतेला ते खऱ्या अर्थाने आपलेसे वाटू लागले आहेत. राजकीय पायरीवरून वर चढताना त्यांनी नेहमीच गावखेड्यातील लोकांच्या गरजा समजून घेतल्या, त्यांना आधार दिला, आणि हेच जनतेला माऊलींची खरी ओळख पटवून देत आहे. माऊली कटके यांच्या या आगळ्या वेगळ्या प्रचारामुळे, शिरूर मतदारसंघात एक नवा उत्साह निर्माण झाला आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवणारा तरुण वर्ग, महिलावर्ग, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर त्यांच्या पाठीशी उभे आहेत. निवडणुकीचा अंतिम निकाल काय असेल हे पाहणं औत्सुक्याचं ठरेल. सध्या शिरूर मतदारसंघात माऊली यांच्या नावानेच एक नवा विश्वास दिसतो आहे.

## आमदार अतुल बेनके यांची नारायणगावात रॅली

जुन्नर

### नारायणगाव



जुन्नर विधानसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि विद्यमान आमदार अतुल बेनके यांनी नारायणगाव शहरात प्रचार रॅली काढून व्यापाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी तरुण कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने प्रचार रॅलीत सहभागी झाले होते.

नारायणगावचे ग्रामदैवत श्री हनुमान देवस्थान, श्री मुक्ताई देवस्थान, पूर्वेशीवरील श्री छत्रपती शिवाजी महाराज, बस स्थानकावरील तमाशा सम्राज्ञी विठाबाई भाऊ मांग यांच्या पुतळ्याला हार घालून आशीर्वाद घेतले.

प्रचार रॅलीत ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष सुजित खैरे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष रोहिदास केदारी, श्रीराम पतसंस्थेचे उपाध्यक्ष शशिकांत वाजगे, संचालक अनिल थोरात, अनिल डेरे, सुनील श्रीवत, मंगेश रासने,अजिंक्यतारा पतसंस्थेचे चेअरमन गणेश वाजगे, किरण चौधरी, मंगेश नलावडे, स्वप्निल डेरे, सागर दरंदळे, राजेंद्र नाईकवाडी, अजित वाजगे, शुभांगी पाटे, दिपाली खैरे, वैजयंती कोऱ्हाळे, स्नेहा डेरे, सारिका कोऱ्हाळे, अनिकेत कोऱ्हाळे, बाबू विटे, आशिष वाजगे, जुबेर आतार, गौतम औटी,गौरव पाटे, ऋषी वाजगे, प्रवीण पाटे, विलास पानसरे, कैलास पानसरे, सोपान खैरे, माऊली रासने, निलेश मेहता, शेखर शेटे, नितीन शेटे, बबन खैरे, शंकर जाधव, योगेश पानसरे, बाळा शिवले, अजित दरंदळे आदी उपस्थित होते.

#रा

विधानसभा निवडणुक
कसबा

# बंडखोरीचा फटका

## किरण दगडे आणि आशा बुचके यांचा राजीनामा





**पुणे:** भारतीय जनता पक्षाचे भोर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख किरण दत्तात्रय दगडे आणि जुन्नर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रमुख आशा बुचके यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा तसेच पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला. या दोघांचेही राजीनामे पक्षाने स्वीकारल्याचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. दगडे यांनी भोरमध्ये, तर बुचके यांनी जुन्नरमध्ये बंडखोरी केली आहे. भोरमध्ये राष्ट्रवादीकडून शंकर मांडेकर यांना महायुतीची अधिकृत उमेदवारी असूनही दगडे यांनी बंडखोरी केली. जुन्नरमध्ये राष्ट्रवादीचे आमदार अतुल बेनके यांना महायुतीची अधिकृत उमेदवारी दिली असतानाही बुचके यांनी बंडखोरी केली. दोन दिवसांपूर्वी केलेल्या कारवाईत भाजपने या नेत्यांवर कारवाई केली नव्हती.

## संविधान वाचवण्याचा लढा सुरूच ठेवण्याचे प्रतिपादन

# भाजप आदिवासींना वनवासी ठेवू इच्छितो : राहुल गांधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**रांची :** आम्ही तुम्हाला आदिवासी म्हणतो, भाजप तुम्हाला वनवासी म्हणतो. राज्यघटनेत वनवासी हा शब्द नाही. आदिवासी हे देशाचे पहिले मालक आहेत. त्यांचा जल, जंगल, जमीन यावर पहिला हक्क असायला हवा. आदिवासींनी केवळ वनवासी म्हणून राहावे, अशी भाजपची इच्छा आहे, अशा शब्दांत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपवर निशाणा साधला. भाजप आणि आमची विचारांची लढाई असून, त्यांना संविधान नष्ट करायचे आहे, तर आम्हाला वाचवायचे आहे, असे ते म्हणाले.

आपल्या भाषणादरम्यान राहुल यांनी उपस्थित लोकांना संविधानाचे पुस्तकही दाखवले. राहुल यांनी 'लव्ह यू' म्हणत भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, की देशात दोन विचारसरणींमध्ये लढा सुरू आहे. आम्ही संविधान वाचवत आहोत आणि ते ते नष्ट करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अदानी-अंबानींना घटनेतील तरतुदी रद्द कराव्यात असे वाटते. वनवासी या शब्दावर भाजपला घेरताना ते म्हणाले, की आदिवासींचा मुलगा डॉक्टर किंवा इंजिनिअर होऊ नये, असे त्यांना वाटते. उच्च शिक्षणात आदिवासी समाजाचा सहभाग कमी आहे.

**राहुल म्हणाले,**

- आम्ही जातीवर आधारित जनगणना करू.
- ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण लागू करणार.
- प्रत्येक कुटुंबाला १५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा
- एससी-एसटी, ओबीसींचे आरक्षण वाढव
- अग्निवीर योजना संपुष्टात आणू
- ४०० रुपयांना सिलिंडर देणार

राहुल विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या जमिनी हिसकावल्या जात असल्याचा आरोप करून राहुल म्हणाले, की तुमच्या जमिनीवर कारखाना उभारला तर तुमच्या मुलांना तिथे नोकऱ्या मिळाव्यात, अशी आमची इच्छा आहे.

देशात एससी, एसटी, अल्पसंख्याक आणि ओबीसींची संख्या ९० टक्के आहे; परंतु घटनात्मक संस्थांमध्ये त्यांचा सहभाग खूपच कमी आहे. माध्यमांमध्ये आदिवासी आणि ओबीसींचा सहभागही कमी आहे. पंतप्रधान नरेंद्रन मोदी यांनी केवळ २५ लोकांचे १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले; परंतु जेव्हा आपण शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल बोलतो तेव्हा ते म्हणतात की आम्ही सवय मोडत आहोत.

## » Selected

### रिक्षा विहिरीत पडून दोघांचा मृत्यू

**औरंगाबाद :** बिहारमधील औरंगाबाद जिल्ह्यातील देव पोलिस ठाण्याच्या हद्दीत ई-रिक्षा विहिरीत पडल्याने दोन मुलांचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत. ई-रिक्षातील लोक बऱ्हेटा गावात अर्घ्य दिल्यानंतर मुलाचे मुंडन करण्यासाठी सूर्यनगरी देवाकडे जात होते. या वेळी इगुनिया तांडजवळ दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात ई-रिक्षावरील नियंत्रण सुटून ती विहिरीत पडली. या घटनेत दोन मुलांचा मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत.

### बिहारमध्ये छट उत्सवात तलावात बुडून दोघांचा मृत्यू

**पाटणा :** बिहारमधील छपरा येथे छठ उत्सवादरम्यान तलावात बुडून दोघांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छपरा तरैया पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पाचभिंडा गावात छठ उत्सवादरम्यान काही मुलांनी छठपूजेसाठी बोटीवर चढून खेळायला सुरुवात केली. यादरम्यान बोट अचानक बुडाली. खड्डा खोल असल्याने दोघांचा बुडून मृत्यू झाला. मृत्यूमुळे गावात शोककळा पसरली आहे. दुसरीकडे रोहतासमध्येही असाच एक अपघात झाला असून छठ पूजेच्या तिसऱ्या दिवशी सोन नदीत बुडून सात जणांचा मृत्यू झाला असून त्यात ३ उपवास करणाऱ्यांचा समावेश आहे.

### भाजप खासदारावर गुन्हा दाखल

**बेंगळुरू :** कर्नाटकातील हावेरी जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या जमिनीची मालकी वक्फ बोर्डाने घेतल्याचा दावा केल्या प्रकरणी भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. वक्फ बोर्डाने एका शेतकऱ्याची जमीन हडपली. त्यामुळे त्याने जीवन संपवले, अशी माहिती भाजप खासदार तेजस्वी सूर्या आणि दोन कन्नड न्यूज पोर्टलच्या संपादकांनी शेअर केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खासदार सूर्या यांनी त्यांच्या 'एक्स'वरील हटवलेल्या पोस्टमध्ये म्हटले होते, की कर्नाटकातील हावेरी जिल्ह्यातील रुद्रप्पा चन्नाप्पा बालिकाई या शेतकऱ्याची जमीन वक्फ बोर्डाने कर्जाचा 'हप्ता' न दिल्याने घेतली. त्यामुळे शेतकऱ्याने आत्महत्या केली. सूर्या यांनी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि मंत्री बीझेड जमीर अहमद खान यांच्यावर 'आपत्तीजनक परिणाम' द्वारे राज्यातील शेतकऱ्यांवर संकट ओढवल्याचा आरोपही ट्विटमधून केला होता. हावेरी पोलिस अधीक्षकांनी जानेवारी २०२२ मध्ये झालेल्या शेतकऱ्याची आत्महत्या जमिनीच्या मालकीच्या प्रश्नांऐवजी कर्जाचा बोजा आणि पिकाच्या नुकसानीमुळे झाल्याचे स्पष्ट केल्यानंतर एफआयआर दाखल करण्यात आला. पोलिसांनी सांगितले, की अनैसर्गिक मृत्यूच्या तपासाच्या प्रक्रियेशी संबंधित असलेल्या कलम १७४ सीआरपीसी अंतर्गत अंतिम अहवाल सादर केल्यानंतर हे प्रकरण आधीच बंद करण्यात आले होते.

## अमेरिकन फेडरलकडून व्याजदरात कपात



**न्यू यार्क :** अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'ने व्याजदरात २५ आधार अंकांनी (०.२५ टक्के) कपात केली आहे. आता व्याजदर ४.५० ते ४.७५ टक्क्यांदरम्यान असतील. यापूर्वी १८ सप्टेंबर रोजी 'फेडरल रिझर्व्ह'ने व्याजदरात ५० बेसिस पॉइंट (०.५%) कपात केली होती.

'फेडरल रिझर्व्ह'ने मार्च २०२० नंतर सप्टेंबर २०२४ मध्ये व्याजदरात कपात केली होती. चलनवाढ नियंत्रित करण्यासाठी, सेंट्रल बँक ऑफ अमेरिकाने मार्च २०२२ ते जुलै २०२३ दरम्यान ११ वेळा व्याजदर वाढवले होते. २०२३ मध्ये सलग तिसऱ्यांदा व्याजदर अपरिवर्तित ठेवले. गेल्या वर्षी, 'फेडरल रिझर्व्ह'ने आपल्या धोरणात्मक निर्णयात सलग तिसऱ्यांदा व्याजदर अपरिवर्तित ठेवले. २६ जुलै २०२३ रोजी, 'फेडरल रिझर्व्ह'ने बाजाराच्या अपेक्षेनुसार धोरण दर ५.२५ टक्के ते ५.५ टक्क्यांच्या श्रेणीत अपरिवर्तित ठेवले होते. तथापि, 'फेडरल रिझर्व्ह'ने असेही सूचित केले होते, की २०२४ मध्ये दर कपात दिसून येईल आणि ते ४.६ टक्क्यांपर्यंत खाली येऊ शकते.

महागाईचा सामना करण्यासाठी 'फेडरल रिझर्व्ह'ने मार्च २०२२ पासून दर वाढवण्यास सुरुवात केली. गेल्या वर्षी जुलैपर्यंत हे दर २३ वर्षांतील सर्वोच्च पातळीवर गेले होते. बँका एकमेकांवर किती व्याज आकारतील याचा दर 'फेडरल रिझर्व्ह' ठरवते.

## चीनमधील महापालिका कर्जबाजारी

**बीजिंग :** चीनने स्थानिक प्रशासन संस्थांना म्हणजेच महापालिकांना ६ लाख कोटी युआन इतके अवाढव्य पॅकेज जाहीर केलेले आहे. डॉलरमध्ये बोलायचे झाली तर ही रक्कम तब्बल ८४० अब्ज इतकी होते. छुप्या कर्जाच्या समस्यांतून महापालिकांना दिलासा देण्यासाठी ही योजना राबवली जात आहे. विकासाला गती देण्यासाठी चीन सरकारने हा निर्णय घेतला आहे.

हा कार्यक्रम २०२६पर्यंत राबवला जाईल. म्हणजेच दरवर्षी २ लाख कोटी युआन इतकी रक्कम खर्च केली जाईल. अर्थमंत्री लान फोआन यांनी ही घोषणा केलेली आहे. चीनमधील स्थानिक प्रशासन संस्थांवर १४.३ लाख कोटी युआन इतके कर्ज आहे.

## पुरुष टेलरला महिलांच्या कपड्याचे माप घेण्यास मनाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनऊ :** उत्तर प्रदेश महिला आयोगाने महिलांच्या सुरक्षेसाठी आणि सन्मानाबाबत एक महत्त्वाचा प्रस्ताव दिला आहे. यापुढे पुरुष टेलर महिलांच्या कपड्यांचे माप घेऊ शकणार नाहीत, असा निर्णय आयोगाने घेतला आहे. महिलांवरील विनयभंगाच्या घटना पाहता हे पाऊल उचलण्यात आले आहे.

आयोगाचे म्हणणे आहे, की पुरुष टेलरकडून महिलांची मापे घेताना अनेकदा विनयभंगाच्या घटना घडतात. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. उत्तर प्रदेश महिला आयोगाने जारी केलेल्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये महिलांवरील गुन्ह्यांबाबत अनेक महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत. आयोगाने विशेषत: ज्या ठिकाणी महिलांचे सार्वजनिक व्यवहार होतात, अशा ठिकाणी सुरक्षा वाढवण्याचा प्रस्ताव दिला आहे. याअंतर्गत जिम, योग केंद्र, कोचिंग सेंटर, बुटीक आणि इतर सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा व्यवस्था कडक करण्याची सूचना करण्यात आली आहे.

महिला जेव्हा पुरुष टेलरकडे कपड्यांचे माप घेण्यासाठी जातात, तेव्हा विनयभंगासारख्या घटना घडतात, असे आयोगाचे म्हणणे आहे. या घटना टाळण्यासाठी पुरुष टेलरला महिलांच्या कपड्यांचे माप करण्याची परवानगी देऊ नये, असा प्रस्ताव आयोगाने मांडला आहे. यामुळे महिलांना सुरक्षा मिळणार आहे.


**शिफारसी**

- स्कूल बसमध्ये महिला असणे आवश्यक
- स्वच्छतागृहांमध्ये योग्य व सुरक्षित व्यवस्था असावी
- नाट्य केंद्रे आणि विशेष दुकानांवर महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती



## रश्दींच्या 'सॅटनिक व्हर्सेस' आयातीवरील बंदी मागे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने सलमान रश्दी यांच्या 'द सॅटॅनिक व्हर्सेस' या वादग्रस्त पुस्तकाच्या आयातीवर १९८८ साली घातलेली बंदी उठवली आहे. बंदी घालणारी अधिसूचना अधिकारी सादर करू शकत नसल्यामुळे ती अस्तित्वात नाही, असे गृहीत धरले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायमूर्ती रेखा पल्ली आणि न्यायमूर्ती सौरभ बॅनर्जी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. २०१९ मध्ये संदीपन खान नावाच्या व्यक्तीने पुस्तक आयात करण्यासंदर्भात याचिका दाखल केली होती. संदीपन म्हणाले, त्यांनी 'द सॅटॅनिक व्हर्सेस' या पुस्तकाची ऑर्डर दिली होती; मात्र ३६ वर्षांपूर्वी सीमा शुल्क विभागाने जारी केलेल्या अधिसूचनेमुळे हे पुस्तक आयात करता आले नाही. तथापि, ही अधिसूचना कोणत्याही अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध नव्हती किंवा त्यासंबंधीची कागदपत्रे कोणत्याही संबंधित अधिकाऱ्याकडे उपलब्ध नव्हती.

'द सॅटॅनिक व्हर्सेस' या कादंबरीचा हिंदीतील अर्थ 'शैतानी आयतें' असा आहे. या पुस्तकाच्या नावावरच मुस्लिम धर्माच्या लोकांनी आक्षेप नोंदवला होता. या पुस्तकात रश्दींनी एक काल्पनिक कथा लिहिली आहे. कथा अशी आहे, की दोन चित्रपट कलाकार विमानाने मुंबईहून लंडनला जात आहेत. त्यातील एक म्हणजे फिल्मी दुनियेचा सुपरस्टार जिब्रिल आणि दुसरा म्हणजे 'व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट' सलाउद्दीन. मध्यंतरी, एका शीख दहशतवाद्याने विमानाचे अपहरण केले. यानंतर विमान अटलांटिक महासागरातून जात असताना दहशतवाद्यांनी प्रवाशांशी वाद घालण्यास सुरुवात केली. संतप्त झालेल्या दहशतवाद्याने विमानात बॉम्बचा स्फोट केला.

या घटनेत जिब्रिल आणि सलादीन दोघेही समुद्रात पडून बचावले आहेत. यानंतर दोघांचेही आयुष्य बदलते. मग एके दिवशी, एका विशिष्ट धर्माच्या संस्थापकाच्या जीवनाशी संबंधित काही कथा जिब्रिलच्या स्वप्नात येतात, जो वेडेपणाकडे जात आहे. यानंतर तो त्या धर्माचा इतिहास नव्या पद्धतीने मांडण्याचा विचार करतो. रश्दीं यांच्या कथेतील जिब्रिल आणि सलादीन या पात्रांच्या कथा लिहिण्याची पद्धत निंदनीय मानले गेले.

## सूर्याला अर्घ्य

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पाटणा :** चार दिवसीय छटपूजेची सांगता गंगा नदीत स्नान करून, सूर्याला अर्घ्य देऊन करण्यात आली.

## अनिल अंबानींची बोगस बँक हमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** अनिल धीरुभाई अंबानी समूहाच्या 'रिलायन्स एनर्जी पॉवर' या कंपनीने 'सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'ला (एसईसीआय) बनावट बँक गॅरंटी देण्याचा प्रकार उघडकीस आलेला आहे. त्यानंतर 'सेकी'ने रिलायन्स पॉवर आणि तिची उपकंपनी 'रिलायन्स एनयू बेस' ला निविदा प्रक्रियेत भाग घेण्यापासून बंदी घातली आहे. ही बंदी ३ वर्षांच्या कालावधीसाठी असणार आहे.

'सेकी' च्या वतीने २००० मेगावॅट क्षमतेची 'बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम' उभी करायची आहे. त्यासाठी 'रिलायन्स एनयू बेस' ने निविदा भरली होती; पण ही निविदा भरताना दिलेली बँकहमी बनावट असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर 'सेकी'ने या कंपनीवर तसेच 'रिलायन्स पॉवर' या कंपनीवर निर्बंध लादल्याची घोषणा केली. 'सेकी'चे म्हणणे आहे, की या कंपनीने निविदांच्या नियमांचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे भविष्यातील निविदा प्रक्रियेत कंपनीला भाग घेण्यास बंदी घातली आहे. या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक क्षमता 'रिलायन्स एनयू बेस'ला मातृ कंपनी असलेल्या 'रिलायन्स पॉवर'कडून मिळाली होती. त्यामुळे 'रिलायन्स एनयू बेस' कंपनीने घेतलेले धोरणात्मक निर्णय हे मूलतः मातृ कंपनीचे होते. त्यामुळे 'रिलायन्स पॉवर लिमिटेड' या कंपनीवरही भविष्यातील निविदा प्रक्रियेत भाग घेण्यावर निर्बंध घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## हिमाचलात समोसे प्रकरणामुळे वाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सिमला :** गेल्या काही दिवसांपासून हिमाचल प्रदेशमध्ये प्रशासकीय व राजकीय वर्तुळात चर्चा चालू आहे.ती म्हणजे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग यांच्यासाठी मागवण्यात आलेल्या सामोश्यांची! मुख्यमंत्र्यांसाठी मागवलेले सामोसे त्यांना मिळालेच नाहीत आणि आरोप हा आहे की हे सामोसे त्यांच्या स्टाफनेच फस्त केले! आता 'सीआयडी'या प्रकरणाची 'सखोल' चौकशी करत आहे!

हा प्रकार आहे २१ ऑक्टोबरचा. सुखू हे 'सीआयडी'च्या एका कार्यक्रमासाठी त्यांच्या मुख्यालयात प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित होते. ठरल्याप्रमाणे मुख्यमंत्री तिथे पोहोचले. कार्यक्रमही पार पडला; पण कार्यक्रमानंतर चर्चा कार्यक्रमातल्या गोष्टींची न होता सुरू झाली ती सामोश्यांची! कारण मुख्यमंत्र्यांसाठी नजीकच्या रेडिसन ब्लू हॉटेलमधून तीन बॉक्स समोसे मागवले होते; पण कार्यक्रम संपल्यानंतरदेखील मुख्यमंत्र्यांना हे सामोसे मिळाले नाहीत. हे सामोसे मुख्यमंत्र्यांच्या स्टाफने खाल्ल्याचे समोर आले.

## अतिरेक्यांनी जाळली घरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



अतिरेक्यांनी आदिवासी बहुल गावातील घरे जाळली.

**इंफाळ :** मणिपूरच्या जिरीबाम जिल्ह्यातील आदिवासी बहुल गावात सशस्त्र अतिरेक्यांच्या गटाने किमान सहा घरे जाळली आणि गावकऱ्यांवर हल्ला केला. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले, की गुरुवारी संध्याकाळी जारोन हमर गावात ही घटना घडली. अतिरेक्यांच्या एका गटाने सहा घरांना आग लावली.

प्रारंभिक अहवालात असे सूचित होते, की अनेक गावकरी हल्ल्यादरम्यान पळून जाण्यात यशस्वी झाले आणि त्यांनी जवळच्या जंगलात आश्रय घेतला. जाळपोळीमुळे किमान सहा घरांचे मोठे नुकसान झाले असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. कुकी समुदायांनी दावा केला, की या हल्ल्यात गावातील एका महिलेचा मृत्यू झाला; परंतु जिल्हा पोलिसांनी या वृत्ताला दुजोरा दिला नाही. मणिपूरमध्ये गेल्या वर्षी मे महिन्यापासून जातीय हिंसाचार सुरू आहे आणि आतापर्यंत २०० हून अधिक लोक मारले गेले आहेत.

मैतेई समुदायाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याच्या मागणीच्या निषेधार्थ ३ मे २०२३ रोजी पहाडी जिल्ह्यांमध्ये 'आदिवासी एकता मार्च' काढण्यात आला, तेव्हा हिंसाचार झाला.

## सर्वोच्च न्यायालयाचा निकाल; आणखी एक खंडपीठ निर्णय घेणार

# अलीगड विद्यापीठाला अल्पसंख्याक दर्जा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अलीगढ मुस्लिम विद्यापीठ हे अल्पसंख्यांक असल्याचा दावा करू शकत नाही, हा १९६७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल सर्वोच्च न्यायालयाने स्वतःच बदलला. अलीगड मुस्लिम विद्यापीठ हे अल्पसंख्यांक आहे की नाही? हे ठरविण्यासाठी आता तीन न्यायमूर्तींचे वेगळे खंडपीठ स्थापन केले जाणार आहे.

अझीज बाशा विरुद्ध भारतीय संघराज्य या खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते, की अलीगड मुस्लिम विद्यापीठ कायद्याद्वारे स्थापन झाले असल्यामुळे ते अल्पसंख्यांक दर्जा मिळविण्यासाठी दावा करू शकत नाही. शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने आपलीच जुनी भूमिका बदलली. सरकारने नियमन आणि शासन करण्यासाठी आणलेल्या कायद्यामुळे एखाद्या संस्थेला त्यांचा अल्पसंख्याक दर्जा गमावता येणार नाही, असा निकाल सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ४:३ अशा बहुमताने दिला. सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने याप्रकरणी सुनावणी घेतल्यानंतर हे प्रकरण आता तीन न्यायमूर्तींच्या नियमित खंडपीठाकडे पाठविण्याचा निकाल दिला. यामुळे अलीगड मुस्लिम विद्यापीठ हे अल्पसंख्याक आहे की नाही? याचा निर्णय घेतला जाईल.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड हे १० नोव्हेंबर रोजी निवृत्त होत आहेत. काल त्यांचा कामकाजाचा शेवटचा दिवस होता. अलीगड मुस्लिम विद्यापीठाच्या खटल्याची सुनावणी त्यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने केली.

**अलीगड मुस्लिम विद्यापीठ**

- भारतातील प्रमुख विद्यापीठांपैकी एक असे हे विद्यापीठ आहे. याची सुरुवात १८७५ मध्ये झाली. ब्रिटिश काळात केम्ब्रिज विद्यापीठाच्या धरतीवर भारतात अलीगड मुस्लिम विद्यापीठाची उच्च शिक्षणासाठी स्थापना करण्यात आली होती. त्या वेळी खासगी विद्यापीठांना परवानगी नव्हती. त्यामुळे आधी शाळेच्या स्वरुपात विद्यापीठ सुरू केले.



#रा



'स्पोर्टिंग बियॉन्ड' या माझ्या नवीन व्यवस्थापकीय टीम सोबत नवीन सुरुवात करताना मला खूप आनंद होत आहे. ही टीम काही काळापासून माझ्यासोबत काम करत आहे.' 'स्पोर्टिंग बियॉन्ड टीम माझी उद्दिष्टे आणि पारदर्शकता, सचोटी आणि खेळावरील प्रेम आणि माझी मूल्ये या सर्वांशी बांधील आहे.

— विराट कोहली

माझा विश्वास आहे की अंतिम निर्णय क्रिकेट ऑस्ट्रेलियाला घ्यावा लागेल. मला वाटते की भारतीय संघ या उन्हाळ्यात ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार आहे आणि त्यामुळे हे प्रकरण लवकरात लवकर बंद करण्यात आले.

— डेव्हिड वार्नर



### राष्ट्रीय टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत आराध्य, राघव, वरद,

## प्रज्ञेश, श्रावी उपांत्य फेरीत दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** ईएमएमटीसी तर्फे आयोजित व एटीएफ, एआयटीए व एमएसएलटीए यांच्या मान्यतेखाली ईएमएमटीसी - एमएसएलटीए एआयटीए १४ वर्षाखालील क्ले कोर्ट राष्ट्रीय टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत मुलींच्या गटात श्रावी देवरे हिने तर, मुलांच्या गटात आराध्य म्हसदे, राघव सरोदे, वरद उंद्रे, प्रज्ञेश शेळके या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

ईएमएमटीसी टेनिस कॉम्प्लेक्स छत्रपती संभाजी नगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉच्या एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या आराध्य म्हसदेने दिल्लीच्या सातव्या मानांकित विराज चौधरीचा 6-0, 6-1 असा पराभव करून आपली विजयी मालिका कायम राखली. तेराव्या मानांकित महाराष्ट्राच्या राघव सरोदेने पाचव्या मानांकित आपला राज्य सहकारी दक्ष पाटीलचा ६-२, ५-७, ७-५ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव केला. महाराष्ट्राच्या नवव्या मानांकित वरद उंद्रेने पंधराव्या मानांकित आरव छल्लानीचा ६-२, ६-३ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. अकराव्या मानांकित प्रज्ञेश शेळकेने कर्नाटकच्या पुनीत एमचे आव्हान ६-२, ६-२ असे संपुष्टात आणले.

मुलींच्या गटात राजस्थानच्या अव्वल मानांकित आराध्या मीना हिने आठव्या मानांकित हरियाणाच्या ख़ुशी कडीयनचा ६-४, ६-२ असा पराभव करून उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. महाराष्ट्राच्या श्रावी देवरेने आरोही देशमुखला ६-३, ६-१ असे पराभूत केले. तिसऱ्या मानांकित गुजरातच्या जेन्सी कानबर हिने कर्नाटकच्या नवव्या मानांकित पुजा नागराजवर ६-२, ६-२ असा विजय मिळवला. दुसऱ्या मानांकित कर्नाटकच्या सृष्टी किरण हिने महाराष्ट्राच्या बाराव्या मानांकित व्रण्डिका राजपूतचा ६-०, ६-४ असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली.

दुहेरीत मुलांच्या गटात तामिळनाडूच्या अयान शंकरने पश्चिम बंगालच्या संकल्प सहानीच्या साथीत तिसऱ्या मानांकित दिल्लीच्या विराज चौधरी व महाराष्ट्राच्या प्रज्ञेश शेळके यांचा ६-३, ६-१ असा पराभव केला. महाराष्ट्राच्या अव्वल मानांकित वरद उंद्रे व दक्ष पाटील यांनी तेलंगणाच्या निकुंज खुराना व लेमुल अल्लादी यांचा ६-२, ७-५ असा पराभव केला.

### इकोल टी-२० करंडक

## राजस्थान रॉयल्सचा सलग दुसरा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** निलय नेवासकरने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर राजस्थान रॉयल्स अकादमी संघाने रिक्रिएशन क्लब संघाला १०९ धावांनी पराभूत करताना इकोल टी-२० करंडक स्पर्धेतील दुसऱ्या विजयाची नोंद केली.

शिंदे हायस्कुल मैदानावर झालेल्या लढतीमध्ये राजस्थान संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ७ बाद २०९ धावा केल्या. यामध्ये स्वप्नील फुलपगारने २५ चेंडूत ३ चौकार व ३ षटकार लगावताना ५२ धावांची खेळी केली. स्वप्नीलला स्नेहल खामणकरने ४२ तर रवींद्र जाधवने ३३ धावांची खेळी करताना सुरेख साथ दिली. साहिल कडने २ तर शुभम शिंदे, संतोष दाभाडे व श्रेयस जिवने यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

निलय नेवासकरच्या भेदक गोलंदाजीसमोर रिक्रिएशन संघाचा डाव १७.५ षटकांत १०० धावांमध्ये संपुष्टात आला. अनोश भोसलेने २१ धावांची खेळी करताना लढत देण्याचा प्रयत्न केला. इतर फलंदाज त्याला साथ देऊ शकले नाही. निलय नेवासकरने १७ धावांच्या मोबदल्यात तर निमिर जोशीने १८ धावांच्या मोबदल्यात प्रत्येकी ३ गडी बाद केले.सुनील यादवने २ तर स्नेहल खामणकर व केदार बजाजने प्रत्येकी १ गडी बाद केला.

### किल्ले सरसगड



सेवा मित्र मंडळाने साकारलेली सुंदर सरसगडाची प्रतिकृती . यासाठी सुरेश तरलगट्टी, संदीप दुडम, रविंद्र काची, हर्ष गांधी, स्पृहा तरलगट्टी, शर्व तरलगट्टी, स्वराज शिंदे व तनय चव्हाण या कलाकारांनी परिश्रम घेतले.


## २८ वर्षानंतर पाकिस्तान जिंकला! रौफच्या ५ विकेट्स



**नवी दिल्ली :** पाकिस्तान संघाने २८ वर्षानंतर ऑस्ट्रेलियाला एडिलेडवर वन डे सामन्यात हरवले. हॅरिस रौफ, ज्याची ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत विराट कोहलीने धुलाई केली होती, तो आजच्या सामन्यात चमकला. रौफने २९ धावा देताना ५ विकेट्स घेतल्या आणि ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ १६३ धावांत तंबूत परतला. सईम आयुब व अब्दुल्लाह शफिक यांच्या अर्धशतकी खेळीने पाकिस्तानला २६.३ षटकांत विजय मिळवून दिला. पाकिस्तानने ९ विकेट्स व १४१ चेंडू राखून दुसरा सामना जिंकला आणि मालिका १-१ अशी बरोबरीत आणली. हॅरिस रौफ व शाहीन शाह आफ्रिदी यांच्या भेदक माऱ्यासमोर ऑस्ट्रेलियाचा डाव ३५ षटकांत १६३ धावांवर गडगडला. मॅथ्यू शॉर्ट ( १९) व जॅक फ्रेझर-मॅकगर्क ( १३) हे अपयशी ठरल्यामुळे ऑस्ट्रेलियाची अवस्था २ बाद ४१ अशी झाली होती. स्टीव्ह स्मिथ व जॉश इंग्लिस यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु हॅरिस रौफने पाच विकेट्स घेतल्या. इंग्लिस ( १८), मार्नस लाबुशेन ( ६), आरोन हार्डली ( १४), ग्लेन मॅक्सवेल ( १६), कर्णधार पॅट कमिन्स ( १३) यांना बाद केले. स्मिथने ४८ चेंडूंत ५ चौकार व १ षटकारासह ३५ धावांची खेळी केली आणि मोहम्मद हस्नैन याने ही विकेट मिळवून दिली. नसीम शाहने मिचेल स्टार्कला ( १) बाद केले आणि पाठोपाठ शाहीनने झम्पाची ( १८) विकेट घेतली.

### बांगलादेश दोनदा ऑलआऊट

## कानपूरच्या आउटफिल्डला खराब रेटिंग, डिमेरिट पॉईंटही



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमच्या आउटफिल्डला आयसीसीने खराब रेटिंग दिले आहे. एवढेच नाही तर स्टेडियमच्या खात्यात एक डिमेरिट पॉइंटही जमा झाला आहे. मात्र, परिषदेने ग्रीन पार्कच्या खेळपट्टीला समाधानकारक मानांकन दिले आहे.

येथे भारत आणि बांगलादेश यांच्यात कसोटी मालिकेतील दुसरा आणि शेवटचा सामना खेळला गेला, जो भारतीय संघाने अवघ्या अडीच दिवसांच्या खेळात ७ गडी राखून जिंकला. सामन्याच्या पहिल्या दिवशी केवळ 35 षटकेच खेळता आली, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी एकही षटक टाकता आले नाही. तेही तिसऱ्या दिवसाच्या खेळाच्या वेळी पाऊस नसताना. जवळपास अडीच दिवसांचा खेळ पावसाने वाहून गेला असतानाही, भारताने १२१.२ षटकात बांगलादेशच्या सर्व २० विकेट्स घेतल्या आणि ५२ षटकांत ७.३६ च्या धावगतीने ३८३ धावा करून विजय मिळवला.

### तिसरी 'स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा

## क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमी संघाने पटकावले सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या 'स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत शौर्य देशमुख याच्या शतकी खेळीच्या जोरावर क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीने स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमीचा ७ गडी राखून पराभव करत सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले.

सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमीने ४० षटकामध्ये २१२ धावांचे आव्हान उभे केले. सर्वेश रासकर याने नाबाद ६४ धावांची खेळी केली. याशिवाय ऋत्विक पारेख (४५ धावा), सफल थोरात (३४ धावा) आणि अन्शुमन पोतदार (नाबाद २७ धावा) यांनी संघाच्या डावाची बांधणी केली. हे लक्ष्य क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीने ३७ षटकात व ३ गडी गमावून पूर्ण केले.

यामध्ये शौर्य देशमुख याने ११९ चेंडूत २२ चौकारांसह नाबाद १२७ धावांची खेळी केली. त्याला श्रवण देसाई याने ४० धावा करून उत्तम साथ दिली. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी १३२ चेंडूत ११८ धावांची भागिदारी रचून संघाला विजय मिळवून दिला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता गंधार खारपुडीकर याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंटचे संचालक आणि स्पर्धेचे संचालक सनी मारवाडी आणि अमित काळे तसेच सहभागी संघाचे खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक आदि उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्या क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमी संघाला आणि उपविजेत्या स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट अॅकॅडमी संघाला करंडक देण्यात आली.

## "अपील करायला लाज वाटली पाहिजे...",

**नवी दिल्ली :** सध्या रणजी ट्रॉफीचे सामने खेळवले जात आहेत आणि प्रत्येक सामने मोठे रंजक होत आहेत. महाराष्ट्र वि रेल्वे सर्विसेस यांच्यात सामना खेळवला जात आहे. महाराष्ट्र क्रिकेट संघाचा खेळाडू ऋतुराज



गायकवाड मात्र सध्या ऑस्ट्रेलियात आहे. यादरम्यानच भारतीय अ संघ ऑस्ट्रेलिया अ संघाविरूद्ध ऑस्ट्रेलियात सामने खेळत आहे, या संघाचा ऋतुराज गायकवाड कर्णधार आहे. पण ऑस्ट्रेलियात असूनही ऋतुराजची नजर महाराष्ट्रात होणाऱ्या रणजी सामन्यावर आहे. याबाबत त्याने एक इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. रणजी ट्रॉफीत महाराष्ट्र आणि सर्विसेसमध्ये सामना सुरू आहे. पहिल्या डावात सर्विसेसन २९३ धावा केल्या. तर दुसऱ्या डावात महाराष्ट्रचा संघ १८५ धावांवर सर्वबाद झाला आहे. यादरम्यानच्या एका कॅचचा व्हीडिओ ऋतुराजने आपल्या इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. या व्हीडिओच्या कॅप्शनमध्ये ऋतुराज म्हणाला, या कॅचवर फलंदाजाला बाद कसं काय दिलं गेलं, तेही लाईव्ह सामन्यात? झेल टिपल्याचे अपील करायला पण लाज वाटली पाहिजे. हे किव येण्यासारखं आहे. आणि खाली रणजी आणि महाराष्ट्र वि सर्विसेस सामन्याचे हॅशटॅग त्याने दिले आहेत.

## बीसीसीआयने घेतला मोठा निर्णय! पाकिस्तानला झटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ संदर्भात मोठी बातमी समोर येत आहे. टीम इंडियाने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला मोठा धक्का दिला आहे. एका रिपोर्टनुसार भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानला जाणार नाही. टीम इंडिया आपले सामने दुबईत खेळू शकते. मात्र, त्याची अधिकृत घोषणा अद्याप व्हायची आहे. वृत्तानुसार, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानेही पाकिस्तानात न जाण्याचे कारण दिले आहे. बीसीसीआयने सुरक्षेचे कारण सांगितले आहे.

इंडियन एक्सप्रेसमधील एका बातमीनुसार, पुढील वर्षी होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघ पाकिस्तानला जाणार नाही. अलीकडेच बीसीसीआयने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाशी चर्चा केली. यामध्ये बीसीसीआयने सुरक्षेचे कारण सांगितले आहे. भारतीय संघ आपले सर्व सामने दुबईत खेळू शकतो. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर नुकतेच पाकिस्तानला गेले होते. यानंतर टीम इंडियाचीही बरीच चर्चा झाली. पण आता पाकिस्तानला धक्का देणारी बातमी समोर आली आहे.

वृत्तानुसार, चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानने भारताला मनवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. बीसीसीआयने सुरक्षेचे कारण देत सर्व प्रस्ताव फेटाळले. टीम इंडिया पाकिस्तानमध्ये न गेल्याने पीसीबीला मोठा फटका बसणार आहे. यामुळे त्याचे आर्थिक नुकसानही होईल.

### टेनिस अकादमी

## ब्राँझ सिरीज २०२४ स्पर्धेत ६८ खेळाडूंचा सहभाग

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए मानांकन बाऊन्स टेनिस अकादमी १२ वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२४ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा बाऊन्स टेनिस अकादमी, लॉ कॉलेज रोड येथील टेनिस कोर्टवर ९ ते ११ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत होणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना करंडक व प्रशास्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात येणार आहे.

### चॅम्प्स करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत

## योगेश इलेव्हन संघाचा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत शिवराज घाटे(३-११), विराज केंजळे(३-१६) यांनी केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर योगेश इलेव्हन संघाने केपी क्रिकेट अकादमी संघाचा ९ गडी राखून पराभव करत दुसरा विजय मिळवला.

धायरी येथील स्टार स्पोर्टस मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत योगेश इलेव्हनच्या शिवराज घाटे(३-११), विराज केंजळे(३-१६), आदित्य शिंदे(२-३८), पार्थ रांका(१-१७) यांनी केलेल्या सुरेख गोलंदाजीपुढे केपी क्रिकेट अकादमी संघाचा डाव २४ षटकात सर्वबाद ११७ धावावर संपुष्टात आला. यात इस्माईल बेग २५, रिषभ पवार २२, प्रणव कुलये १२, यांनी थोडासा प्रतिकार केला.

## मोहम्मद नबी घेणार निवृत्ती

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानचा अनुभवी क्रिकेटपटू मोहम्मद नबी पुढील वर्षी पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेणार आहे. मोहम्मद नबी सध्या आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा अष्टपैलू खेळाडू आहे. त्याने २००९ मध्ये स्कॉटलंडविरुद्ध वनडेमध्ये पदार्पण केले आणि गेल्या १५ वर्षांपासून तो अफगाणिस्तानकडून या ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये खेळत आहे. मोहम्मद नबीने ५ वर्षांपूर्वी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. मात्र, मोहम्मद नबी अफगाणिस्तानकडून टी-२० क्रिकेट खेळत राहणार आहे. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नसीब खान यांनी मोहम्मद नबीच्या निवृत्तीचा खुलासा केला आहे. क्रिकबझच्या वृत्तानुसार, नबीने एसीबीला आपल्या निवृत्तीच्या निर्णयाची माहिती दिली आहे, जी बोर्डानेही मान्य केली आहे. 'नबीने मला काही महिन्यांपूर्वी सांगितले होते की, त्याला चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर वनडे करिअर थांबवायचे आहे

## शम्स मुलानीच्या ६ विकेट्स! मुंबईकडे ३१७ धावांची आघाडी; ओडिसाला दिला फॉलो ऑन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** ओडिसाविरुद्धच्या सामन्यात मुंबईने पहिल्या डावात ६०२ धावांवर डाव घोषित केला. प्रत्युत्तरात उतरलेल्या ओडिसाला मुंबईने २८५ धावांवर गुंडाळले. ज्यामध्ये मुंबईचा फिरकीपटू शम्स मुलानीने महत्वाची भुमिका बजावली. शम्सने ओडिसाचा निम्मा संघ बाद केला. मुंबईने पहिल्या डावानंतर सामन्यात ३१७ धावांची तगडी आघाडी घेतली आणि दुसऱ्या डावासाठी ओडिसाला फॉलो ऑन दिला.

श्रेयस अय्यरच्या द्विशतकीय (२३३) व सिद्धेश लाडच्या दीडशतकी (१६९) खेळीच्या मदतीने मुंबईने पहिल्या डावात ४ बाद ६०२ धावा केल्या. ज्यामध्ये सलामीवीर अंगक्रिश रघुवंशीने ९२ धावांचे योगदान दिले. सुर्यांश शेडेने ३६ चेंडूत ७९ धावांची नाबाद खेळी केली. सुर्यांशने या खेळीत ७ चौकार व ६ षटकार ठोकले.

ओडिसाची सुरुवात खराब झाली. ओडिसाने अवघ्या ३ धावांवर पहिला विकेट गमावला. सलामीवीर स्वस्तिक समल शून्यावर माघारी परतला. त्यानंतर अनुराग सारंगी व संदीप पटनाईकच्या जोडीने ओडिसाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी दुसऱ्या विकेट्साठी १०७ धावांची शतकी भागीदारी केली. पुढे ३१ व्या षटकात हिमांशु सिंगने अनुराग सारंगीला बाद केले आणि त्यांची शतकी भागीदारी तुटली. त्यानंतर आलेले दोन फलंदाज शून्यावर मघारी परतले. पण दुसऱ्या बाजूने फटकेबाजी करत असलेल्या संदीप पटनाईकने आपली शतकी खेळी पुर्ण केली.

### मैदान सोडले होते, वेस्ट इंडिज संघ १० क्षेत्ररक्षकांसह खेळत राहिला

## कर्णधाराशी वाद घातल्यामुळे जोसेफवर २ सामन्यांची बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफवर २ सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे. क्रिकेट वेस्ट इंडीजने कर्णधार शाई होपवर फिल्ड प्लेसमेंटवरून वाद घातल्याबद्दल बंदी घातली आहे. २७ वर्षीय वेगवान गोलंदाज जोसेफने सामन्याच्या मध्यभागी मैदान सोडले.

क्रिकेट वेस्ट इंडीजने गुरुवारी एका निवेदनात म्हटले आहे - जोसेफचे वर्तन CWI च्या व्यावसायिकतेच्या मानकांनुसार नव्हते. CWI चे क्रिकेट संचालक माइल्स बास्कोम्बे म्हणाले, 'अल्झारीचे वर्तन क्रिकेट वेस्ट इंडिजच्या मूलभूत मूल्यांशी सुसंगत नव्हते. अशा वर्तनाकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

जोसेफने कर्णधार, संघ आणि चाहत्यांची माफी मागितली सीडब्ल्यूआयच्या विधानात जोसेफच्या माफीचाही समावेश होता, ज्यामध्ये जोसेफने असे म्हटले होते की,मी कर्णधार शाई होप आणि माझे सहकारी आणि व्यवस्थापन यांची वैयक्तिक माफी मागितली आहे. मी वेस्ट इंडिजच्या चाहत्यांसाठी माझी मनापासून माफी मागतो, कृपया समजून घ्या की निर्णयात थोडीशी चूक देखील दूरगामी परिणाम करू शकते आणि कोणत्याही निराशाबद्दल मला मनापासून खेद आहे.

काय आहे संपूर्ण प्रकरण?

वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफ वेस्ट इंडिज-इंग्लंड तिसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान कर्णधार शेन होपशी वाद घालताना दिसला. कर्णधार शेन होपने सेट केलेले क्षेत्ररक्षण त्याला पटले नाही, जेव्हा त्याने कर्णधाराला ते बदलण्यास सांगितले तेव्हा होपने नकार दिला. त्यामुळे तो संतापून मैदानाबाहेर पडला. यानंतर वेस्ट इंडिजचा संघ एका षटकापर्यंत १० क्षेत्ररक्षकांसह खेळत राहिला. मात्र, नंतर तो मैदानात परतला.

#रा